सोलापूर

Solapur Tarun Bharat

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १३० | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com





**छत्रपती संभाजीनगर** – पांडे आयर्न अॅण्ड ट्रेडींग कं., शहा स्टील ट्रेडर्स, रॉयल ट्रेडर्स, वाय.के.ट्रेडर्स, **नारेगाव** – एन.के.ट्रेडर्स, **हर्सुल** – सुरेश ट्रेडर्स अँड हार्डवेअर, **बेरीबाग** – सारा ट्रेडर्स, **सावंगी** – अंजनी ट्रेडर्स, **पिसादेवी** – देवदत्त ट्रेडर्स, **शेंद्रा एमआयडीसी** – निशांत ट्रेडर्स, **करमाड** – साई बिल्डींग मटेरिअल अॅण्ड सप्लायर्स, **आडुळ** – शिवकृपा ट्रेडर्स, **वाळुजगाव** – चंद्रपुष्प इंटरप्राईजेस, **पडेगाव** – कमलेश ट्रेडींग कं, **वैजापूर** – राजाराम स्टील ट्रेडर्स, **लोणी**– बाबा ट्रेडर्स, **देवगाव रंगारी** – मराठवाडा ट्रेडर्स, **खंडाळा** – रविराज अॅग्रो एजन्सीज, **लासूर स्टेशन** – साई ट्रेडिंग कंपनी (मढीकर), **लिंबेजळगाव** – श्री.विठ्ठल कृपा ट्रेडर्स, **महालगाव** – महालक्ष्मी स्टील ट्रेडर्स, **शिऊर बंगला** – जलाल ट्रेडर्स, **पैठण** – संजय ट्रेडर्स, **बिडकीन** – मानधने स्टील ट्रेडर्स, **वासडी** – संतोष ट्रेडर्स, **पिशोर** – रेणुका ट्रेडर्स, **सिल्लोड** – विशाल एजन्सी, सहारा ट्रेडर्स, **गोळेगाव** – सागर ट्रेडर्स, **उंडणगाव** – श्री.गणेश ट्रेडर्स, **अंधारी** – विशाल ट्रेडर्स, **आळंद** – गजानन ट्रेडर्स, **फुलंब्री** – शिव ट्रेडर्स, **पाल फाटा** – योगराज ट्रेडींग कंपनी, श्री.जगदंबा स्टील ट्रेडर्स, **बोरगाव गणपती** – संजय हार्डवेअर, **कन्नड** – मोरया ट्रेडर्स, **शिऊर** – विठ्ठल ट्रेडर्स, **औराळा** – बालाजी ट्रेडर्स, **पाणपोईफाटा** – भगवती स्टील, **पाचोड** – श्रीनाथ ट्रेडर्स अॅण्ड हार्डवेअर, **अंभाई**– गणेश ट्रेडर्स, **सावंदगाव**– मानकेश्वरी हार्डवेअर, **खादगाव** – श्री.साई हार्डवेअर, **म्हसलाफाटा**– गुरूकृपा ट्रेडर्स, **चापानेर** – श्री. सेल्स ट्रेडींग, **झरीफाटा**– श्री. लक्ष्मी नरसिंग ट्रेडर्स, **कसाबखेडा फाटा**– मन्सुरी ट्रेडर्स.

आयकॉन स्टील

टीएमटी बार


# ‘काही लोकांना भारताची प्रगती पाहवत नाही’: संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

भोपाळ: बीईएमएलच्या नवीन रेल्वे कोच फॅक्टरीचे भूमिपूजन कार्यक्रमादरम्यान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतावर लादण्यात आलेल्या ५०% टॅरिफ संदर्भात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यावर अप्रत्यक्षरित्या निशाणा साधला आहे. ते म्हणाले की भारत हा जगातील सर्वात वेगाने विकसित होणारा देश आहे, जो काही लोकांना आवडत नाही.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातील आयातीवर ५० टक्के कर लादल्याच्या वादाच्या पार्श्वभूमीवर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी रविवारी भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात मजबूत आणि गतिमान अर्थव्यवस्था असल्याचे वर्णन केले आणि म्हटले की सबके बॉस तो हम हैं अशी वृत्ती असलेल्या काही देशांना ते आवडत नाही.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह भोपाळमध्ये झालेल्या भूमिपूजन समारंभात आले होते, यादरम्यान ते म्हणाले की भारत हा जगातील सर्वात वेगाने विकसित होणारा देश आहे. मात्र,असे काही लोक आहेत ज्यांना भारताचा विकास आवडत नाही. ते स्वतःला जगाचा मालक मानतात. त्यांना समजत नाही की भारत इतक्या वेगाने कशी काय प्रगती करत आहे? ते पुढे म्हणतात की, बरेच लोकं आपली अर्थव्यवस्था



अडचणीत आणण्याचा प्रयत्न करताना दिसून येत आहे. भारतात बनवल्या जाणाऱ्या वस्तू इतर देशांमध्ये गेल्यानंतर त्या, त्या देशांमध्ये बनवलेल्या वस्तूंपेक्षा महाग कशा होतील, जेणेकरून जगातील लोकं त्या वस्तु खरेदी करणार नाहीत ते पाहत आहेत. मात्र आज भारत ज्या वेगाने प्रगती करत आहे, त्याच वेगाने एक दिवस भारत जगातील एक मोठी शक्ती बनेल.

ही भारताची ताकद आहे: राजनाथ सिंह

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ऑपरेशन सिंदूरबद्दलही भाष्य केले. त्यांनी सांगितले की दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून मारले परंतु भारताने दहशतवाद्यांची कृत्ये पाहून त्यांना प्रत्युत्तर दिले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, संरक्षण क्षेत्राबद्दल बोलायचे झाले तर तुम्हाला हे जाणून आनंद होईल की आता आपण २४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या संरक्षण वस्तू निर्यात करत आहोत. ही भारताची ताकद आहे, हे नवीन भारताचे नवीन संरक्षण क्षेत्र आहे आणि निर्यात सतत वाढत आहे...

अमेरिकेने भारतावर ५० टक्के कर का लादला?

भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने अमेरिकेने अलीकडेच भारतीय वस्तूंवर २५ टक्के कर आणि २५ टक्के अतिरिक्त दंड लादला. भारत रशियाच्या युद्ध प्रयत्नांना निधी देत असल्याचा आरोप वॉशिंग्टनने केल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले. यासोबतच, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी भारताची अर्थव्यवस्था मृत म्हटले आणि आणखी शुल्क वाढवण्याची धमकीही दिली.

# आता अपात्र जाहीर झालेल्या २६ लाख लाडक्या बहिणींची चौकशी होणार

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत वर्षभरापासून एक कोटी पेक्षा जास्त महिलांना दरमहा पंधराशे रुपयांची आार्थिक मदत दिली जात आहे. पण विधानसभा निवडणुकीनंतर लाभार्थ्यांची कठोर छाननी सुरू झाली आहे. या छाननीत अपात्र ठरलेल्या २६ लाख महिलांना चौकशीला सामोरे जावे लागणार आहे. सरकारी अधिकारी घरोघरी जाऊन चौकश करणार आहेत.

रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात जुलै २०२५ चा १५०० रुपयांचा हप्ता जमा झाला आहे. हा हप्ता जमा केल्यानंतर राज्य शासनाने अपात्र ठरलेल्यांच्या चौकशीचे संकेत दिले आहेत. चौकशी करण्यासाठी महिला बालकल्याण विभागाकडून जिल्हा प्रशासनाला आदेश देण्यात आला आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाला आदेशाचं पत्र देण्यात आलं आहे.

जिल्हा पातळीवरील महिला आणि बालकल्याण विभागाच्या अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून ही अपात्र लाभार्थी महिला शोधण्याची मोहीम आता सुरु करण्यात आली आहे. लाडकी बहीण योजनेत एकाच घरातील दोन पेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. मात्र दोन पेक्षा जास्त आणि २१ ते ६५ वर्षे वयोगटात न बसणाऱ्या तब्बल २६ लाख महिलांना या योजनेचा लाभ घेतल्याची माहिती समोर आली होती. या महिलांची यादी महिला आणि बालकल्याण विभागाने तयार केली आहे.

लाडकी बहीण योजना पुढील पाच वर्ष सुरुच राहणार, मुख्यमंत्र्यांची घोषणा


मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पाच वर्षे सुरूच राहणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. लाडक्या बहिणींना मिळत असलेल्या १,५०० रुपयांच्या हप्त्यात लवकरच आणखी वाढ करण्यात येणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. मोदी सरकारच्या लखपती दीदी योजनेचाही राज्यातील महिलांना लाभ होत आहे. महाराष्ट्रात २५ लाख लखपती दीदी झाल्या आहेत. लवकरच ही संख्या एक कोटींवर नेणार आहोत, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# क्रीडा क्षेत्राला निधी देऊन आंतरराष्ट्रीय क्रीडापटू घडविणार - पालकमंत्री बावनकुळे

अमरावती, १० ऑगस्ट : बदलत्या काळानुसार मातीवरील कुस्ती आता मॅटवर खेळायला सुरुवात झाली आहे. मातीवरील कुस्तीला महत्त्व असले, तरी आंतरराष्ट्रीय स्तरावर मॅटवरील कुस्तीला महत्त्व आहे. त्यामुळे येत्या काळात आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्यासाठी क्रीडा क्षेत्राला पुरेपूर निधी घेऊन सक्षम करण्यात येईल, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

विभागीय क्रीडा संकुलात आज कुस्ती मॅट आणि इतर क्रीडा साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, रवी राणा, राजेश वानखेडे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, अमरावतीला पुण्याशी जोडण्यासाठी वंदे भारत रेल्वे सुरू करण्यात आली आहे. हा विकसित भारताला संकल्प राहणार आहे. येत्या काळात विमानानेही पुण्याला जोडण्याचा प्रयत्न राहणार आहे. आज शेकडो खेळाडू पुण्याशी जोडल्या गेले आहे. त्यामुळे या दोन शहरादरम्यान वाहतुकीची गतिमान सुविधा होणे गरजेचे आहे. आज भारतात प्रत्येक क्षेत्रात इतिहास घडवत असून क्रीडाक्षेत्रही मागे राहिले नाही. त्यामुळे दर्जेदार



क्रीडा सोयीसुविधा उपलब्ध करून अमरावतीला क्रीडा क्षेत्रात न्यायचे पुढे आहे.जागतिक बुद्धिबळमध्ये १९ वर्षीय दिव्या देशमुख यांनी इतिहास घडवला आहे. ती भारताची ८८ ग्रॅण्डमास्टर ठरली आहे. अशा प्रकारचा इतिहास अमरावतीमध्ये घडवणे गरजेचे आहे. महाराष्ट्र केसरीमुळे कुस्तीला महत्त्व आले असून ऑलम्पिक स्पर्धांमध्येही हा खेळ गेला आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर कुस्तीगीर घडत आहे. विभागीय क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला निधी देण्यात येईल. तसेच येत्या काळात व्यायाम शाळेसाठी १५ लाख, व्यायाम शाळा बांधकामासाठी १५ लाख आणि क्रीडांगण दुरुस्तीसाठी २५ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. तसेच इको टुरिझममधून एका ठिकाणच्या कामासाठी ३० कोटींचा निधी देण्यात येणार आहे. त्यामुळे विदर्भाचे नंदनवन असलेल्या चिखलदरा येथे कोलकाससह चार कामे प्रस्तावित करण्यात आली आहे.यावेळी ज्येष्ठ क्रीडापटूंच्या सत्कार करण्यात आला. तसेच खेळाडूंना क्रीडा साहित्याची वाटप करण्यात आले. कुस्तीगीर परिषदेतर्फे पालकमंत्री यांना चांदीची गदा देऊन सत्कार करण्यात आला. जिल्हा क्रीडा अधिकारीग णेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ९४ लाख रुपये किमतीचे क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले.

# नव्याने बांधण्यात आलेल्या सदनिकांचे उद्या पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

नवी दिल्ली, १० ऑगस्ट : पंतप्रधान नरेंद्र मोदी ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता नवी दिल्लीतील बाबा खरक सिंग मार्गावर संसद सदस्यांसाठी नव्याने बांधलेल्या टाइप-७ बहुमजली १८४ सदनिकांचे उद्घाटन करतील. यावेळी पंतप्रधान निवासी परिसरात सिंदूरचे रोप लावतील. पंतप्रधान यावेळी श्रमजीवींशी संवादसुद्धा साधणार आहेत. ते उपस्थितांना देखील संबोधित करतील.

या संकुलाची रचना स्वयंपूर्ण होण्याच्या उद्देशाने केली आहे तसेच संसद सदस्यांच्या कार्यात्मक गरजा पूर्ण करण्यासाठी आधुनिक सुविधांच्या संपूर्ण श्रेणीने ते सुसज्ज आहे. हरित तंत्रज्ञानाचा समावेश करून, हा प्रकल्प गृह ३-तारांकित श्रेणीच्या मानकांवर आधारभूत आहे तसेच राष्ट्रीय इमारत संहिता (एनबीसी) २०१६ चे पालन करतो. या पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत वैशिष्ट्यांमुळे ऊर्जा संवर्धन, अक्षय्य ऊर्जा निर्मिती आणि प्रभावी कचरा व्यवस्थापनात योगदान मिळणे अपेक्षित आहे. प्रगत बांधकाम तंत्रज्ञानाचा वापर - विशेषतः ल्युमिनियम झडपांसह मोनोलिथिक काँक्रीट - संरचनात्मक टिकाऊपणा सुनिश्चित करताना प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यास सक्षम ठरले आहे. हे संकुल दिव्यांग-अनुकूल देखील आहे, जे सर्वसमावेशक रचनेप्रती वचनबद्धता दर्शविते.

संसद सदस्यांसाठी पुरेशा घरांच्या कमतरतेमुळे या प्रकल्पाचा विकास करणे आवश्यक होते. जमिनीच्या मर्यादित उपलब्धतेमुळे, जमिनीचा वापर अनुकूल करण्यासाठी आणि देखभाल खर्च कमी करण्यासाठी अनुलंब स्वरुपात घरांच्या विकासावर सातत्याने भर दिला जात आहे.

प्रत्येक निवासी युनिटमध्ये अंदाजे ५,००० चौरस फूट चटई क्षेत्र आहे, ज्यामुळे निवासी आणि कार्यालयीन कामांसाठी पुरेशी जागा उपलब्ध होते. कार्यालये, कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी समर्पित जागा आणि सामुदायिक केंद्र यांचा समावेश संसद सदस्यांना जनप्रतिनिधी म्हणून त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास सहाय्यभूत ठरेल.

आधुनिक रचनात्मक संरचना नियमांनुसार, संकुलातील सर्व इमारती भूकंप-प्रतिरोधक स्वरूपाच्या बांधण्यात आल्या आहेत. सर्व रहिवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी एक व्यापक आणि मजबूत सुरक्षा यंत्रणा उभारण्यात आली आहे.

# सोमवारपासून अतिमुसळधार

मुंबई : पुढील आठवड्यात बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. १२ ऑगस्टला कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊ शकतो, १३ ऑगस्टला हे क्षेत्र आणखी मजबूत होईल. सध्याची हवामानस्थिती या कमी दाबाच्या पट्ट्याला अनुकूल आहे.

त्यामुळे पुढील आठवड्यात देशभरात अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे, असे स्कायमेटने म्हटले आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत होऊ शकते, नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



# कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन दोन दिवस बंद

कोल्हापूर : कोल्हापुरच्या देवी अंबाबाईचे दर्शन दोन दिवस बंद राहणार आहे. सोमवार आणि मंगळवार हे दोन दिवस मूर्तीवर संवर्धन प्रक्रिया करण्यात येणार असल्याने भाविकांसाठी दर्शन बंद राहणार आहे. दोन दिवसाच्या कालावधीत भाविकांना देवीच्या उत्सवमूर्ती व श्रीकलशाचे दर्शन घेता येईल. यानंतर म्हणजेच बुधवार १३ ऑगस्ट २०२५ पासून कोल्हापुरच्या



देवी अंबाबाईचे दर्शन पुन्हा सुरू होणार आहे. देवी अंबाबाईच्या मूर्तीवर संवर्धन प्रक्रिया केली जाणार आहे. या प्रक्रियेसाठी सोमवार ११ आणि मंगळवार १२ ऑगस्ट रोजी कोल्हापुरच्या देवी अंबाबाईचे दर्शन बंद असेल. या कालावधीत भाविकांनी पितळी उंबऱ्याच्या बाहेरून श्रीकलश व श्रींच्या उत्सवमूर्तींचे दर्शन घेऊन, देवस्थान व्यवस्थापन समितीला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कोल्हापुरच्या देवी अंबाबाईचे दर्शन बुधवार १३ ऑगस्ट २०२५ पासून पुन्हा सुरू होणार आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून परवानगी घेतल्यानंतरच देवी अंबाबाईच्या मूर्तीवर संवर्धन प्रक्रिया करण्याचा निर्णय झाला आहे. मूर्ती दीर्घकाळ सुस्थितीत ठेवण्याच्या उद्देशानेच संवर्धन प्रक्रिया केली जाणार आहे.मूर्ती संवर्धनासाठी गाभाऱ्यामध्ये फक्त तज्ज्ञांनाच प्रवेश दिला जाईल. श्रावणी सोमवार आणि मंगळवार या दोन्ही दिवशी भाविकांनी पितळी उंबऱ्याच्या बाहेरून श्रीकलश व श्रींच्या उत्सवमूर्तींचे दर्शन घेऊन देवस्थान व्यवस्थापन समितीला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# काश्मीरमधील घोडेवाला सय्यद आदिल हुसैन शाहच्या कुटुंबियांनी घेतली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट

## शिवसेना आपल्या पाठीशी कायम उभी राहील असे शिंदेंकडून आदिलच्या कुटुंबियांना आश्वासन

जम्मू आणि काश्मीर: पहलगाममध्ये भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांकडून झालेल्या हल्ल्यादरम्यान त्यांचे जीव वाचवताना मृत्युमुखी पडलेल्या घोडेवाला सय्यद आदिल हुसैन शाहच्या कुटुंबियांने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. यावेळी या हल्ल्यानंतर आदिलच्या बलिदानाची दखल घेऊन आपल्या कुटुंबियांना मदत केल्याबद्दल त्यांनी एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. शिंदे काश्मीर दौऱ्यावर असताना ही भेट झाली, यादरम्यान शिवसेना आपल्या पाठीशी कायम उभी राहील असे शिंदेंकडून आदिलच्या कुटुंबियांना आश्वासन देण्यात आले.

पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. दहशतवादी भारतीय नागरिकांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घालत होते. त्याचवेळी घोडेवाला म्हणून काम करणाऱ्या सय्यद आदिल हुसैन शाहने



त्यांना मज्जाव करण्याचा प्रयत्न केला. तसेच आपल्यासोबत आलेल्या काही पर्यटकांचा जीव वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र या दहशतवाद्यांनी त्याचे तोंड बंद करण्यासाठी त्यालाही गोळ्या घालून ठार केले. त्याने दाखवलेल्या या धाडसाची देशभर चर्चा झाली.

पर्यटकांचा जीव वाचवता वाचवता त्याचा जीव गेल्याने सय्यद कुटुंबातील कमावता हात कायमचा हिरावून घेतला गेला होता. अखेर त्याने दाखवलेल्या धाडसाची दखल घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपले अधिकारी आणि पक्षाचे पदाधिकारी पाठवून त्यांना पाच लाखांची मदत देऊ केली होती. या मदतीची जाण ठेवून त्यांनी आज उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेत त्यांचे आभार मानले.

यावेळी बोलताना शिंदे यांनी, आपण आपला मुलगा या हल्ल्यात गमावला असून त्यापुढे आम्ही केलेली मदत ही नगण्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच ही मदत देऊन आपण देशवासीयांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे शिवसेना पक्ष हा आपल्या पाठीशी ठामपणे उभा असून यापुढेही आपल्याला लागेल ती मदत नक्की करू असे त्यांना वचन दिले.

तसेच पहलगाम हल्ल्यानंतर काश्मीरमधील परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी केंद्र शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. देशभरातील पर्यटकांनी पुन्हा काश्मीरमध्ये यावे आणि ही जागा पुन्हापूर्वीसारखी नंदनवन व्हावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र शासन इथे जागा घेऊन सुसज्ज असे महाराष्ट्र भवन उभारणार असून त्याद्वारे जास्तीत जास्त पर्यटकांचे पाय पुन्हा एकदा जम्मू आणि काश्मीरकडे वळतील असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. तसेच येथील हॉटेलवाले, घोडेवाले, टुरिस्ट गाईड, छोटे मोठे दुकानदार यांना पुन्हा एकदा हक्काचा रोजगार मिळेल असे दिवस आणण्यासाठी सारे एकत्र राहून पुन्हा प्रयत्न करू असेही त्यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.




सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## गोकुळ राजपूत यांच्या वतीने मोठ्या महादेवाला जाणाऱ्या भाविकांसाठी फराळ वाटप



खुलताबाद प्रतिनिधी - नांदगाव तालुक्यातील मोठा महादेव जातेगाव येथे तिसऱ्या सोमवारी दर्शनासाठी हजारो भाविक राज्यभरातून वेरूळ येथील शिवालय तीर्थकुंडातून जल घेऊन अभिषेक करण्यासाठी जात असतात. रविवार ता.१० रोजी वेरूळ येथील नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु अक्काताई महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत गोकुळ भाऊ राजपूत यांच्या वतीने पळसवाडी येथील भाविकांच्या वतीने दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी फराळ पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी हर हर महादेव, शंभो शंकरा च्या जयघोषाने परिसर दणाणून गेला होता व आलेल्या भाविकांचे मनोभावे स्वागत करून फराळ वाटप करण्यात आले. यावेळी नवनाथ गुलाब व्यवहारे, कृष्णा केशव राठोड, सचिन काशिनाथ गायके, नारायण कारभारी जाधव, वसंत कल्याण ठेगडे, गणेश ज्ञानेश्वर ठेंगडे, राहुल हिवाळे, निलेश संजय व्यवहारे, साईनाथ बर्डी, योगेश विठ्ठल राजपूत, विठ्ठल शिवलाल राजपूत, चरण विठ्ठल राजपूत यांनी सहकार्य केले.

## खडकपूर्णामधून पूर्णा नदीपात्रात पाण्याच्या विसर्गाची शक्यता : नदी काठावरील गावांना इशारा

परभणी,दि. १० (प्रतिनिधी) : खडकपूर्णा प्रकल्पामधून कोणत्याही क्षणी पूर्णा नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग केला जाईल, असा इशारा खडकपूर्णा प्रकल्प व्यवस्थापन उपविभागाने दिला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा या मोठ्या सिंचन प्रकल्पात ९ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजेपर्यंत ७२ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला. दुपारपर्यंत या पाणीसाठ्यात पाणलोट क्षेत्रातून पाण्याची आवक सुरुच होती. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस होईल, त्यामुळे खडकपूर्णा प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात तासागणिक वाढ होईल. त्यामुळे प्रकल्पातील पाणीसाठा जर ८५ टक्क्याच्या वर गेला तर निश्चितच नदीपात्रात पाण्याचा विसर्ग करावा लागेल, त्यामुळे पूर्णा नदीच्या काठावरील ग्रामस्थांनी नदीपात्रात आपआपली गुरेढोरे सोडू नये, शेती उपयोगी वस्तू तात्काळ सुरक्षित स्थळी हलवाव्यात, तसेच पुराच्या पाण्यापासून सावध रहावे, असे आवाहन पाटबंधारे खात्याने केले आहे.

## आता आंदोलनाऐवजी रस्ते कामाचा शुभारंभ होणार; बांधकाम खाते व ग्रामस्थांच्या संयुक्त बैठकीतून तोडगा




परभणी,दि. १० (प्रतिनिधी) : परभणी ते पेडगाव या मार्गावरील पेडगाव फाट्यापासून रेल्वे क्रॉसिंग ते जांब पर्यंत जाणार्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ सोमवार ११ ऑगस्ट रोजी होणार आहे.

पेडगांव येथील ग्रामस्थांनी भयावह अवस्थेतील या रस्त्याच्या कामाच्या मागणीसाठी ११ ऑगस्ट रोजी जोरदार रास्तारोको आंदोलन करण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्या आंदोलनाची ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जीवन राजगुरु व पोलिस कॉन्स्टेबल अशोक भिकाने यांच्या पुढाकाराने संतोष देशमुख व निखिल मांडे तसेच जिल्हा परिषदेचे उपअभियंता दयानंद सोनकांबळे यांची ग्रामीण पोलिस ठाण्यात एक बैठक झाली. त्या बैठकीतून त्या रस्ते कामाचा शुभारंभ सोमवारी केला जाईल, असे आश्वासन उपअभियंता सोनकांबळे यांनी दिले. त्यामुळे सोमवारी रस्ते कामासाठी होणारे हे आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, या रस्ते कामाच्या शुभारंभाकरीता ग्रामस्थांनी सोमवारी सकाळी ११ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संतोष देशमुख यांनी केले आहे.

## पिंपळदरीत आज डोंगरीविकास परिषद

परभणी,दि.१०(प्रतिनिधी) : गंगाखेड तालुक्यातील पिंपळदरी या गावी सोमवार ११ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता डोंगरी विकास परिषद आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती या परिषदेच्या आयोजन समितीने दिली. पिंपळदरी येथील श्री संत मोतीराम महाराज तीर्थक्षेत्र परिसरात डोंगरी विकास परिषदेचे जनक भाई ज्ञानोबा मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या परिषदेचे उद्घाटन पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांच्याहस्ते, आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या अध्यक्षतेखाली व खासदार संजय जाधव, माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती सरपंच पंडीतराव मुंढे, उपसरपंच जयश्री मंगेश मुंढे, श्रीराम मुंढे, हनुमंत मुंढे, आनंद मुंढे, व्यंकट मुंढे, कार्तिक मुंढे, केशर मुंढे, दीपक मुंढे, सुधाकर मुंढे आदींनी दिली.

## तुटलेल्या विजेच्या तारेचा शेतकऱ्यास करंट लागून मृत्यू; कुऱ्हाडी शेतशिवारातील घटना



जिंतूर प्रतिनिधी/

तालुक्यातील बामणी पोलिस ठाणे हद्दीतील पिंपळगाव काजळे तांडा येथील अल्पभूधारक शेतकरी विजय विनायक पवार (वय ३५) यांचा कुऱ्हाडी शिवारात तुटलेल्या विजेच्या तारेचा करंट लागून मृत्यू झाल्याची घटना ९ ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली. पिंपळगाव तांडा येथील ग्रामस्थ माधव राठोड यांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय पवार हे ८ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे ११ वाजता टेकुळ घेण्यासाठी शेतात गेले होते. ते संध्याकाळपर्यंत परत न आल्याने नातेवाईक व ग्रामस्थांनी शोधाशोध केली, मात्र काहीच निष्पन्न झाले नाही. अखेर ९ ऑगस्ट रोजी सकाळी सहाच्या सुमारास रंगनाथ राठोड यांच्या शेताशेजारील ओढ्यात त्यांचा मृतदेह आढळला.घटनास्थळी महावितरणच्या पोलवरील तार तुटून पडल्याने करंट लागून मृत्यू झाला असावा, अशी प्राथमिक शक्यता आहे. घटनेची माहिती माधव राठोड यांनी बामणी पोलिसांना दिली. त्यानंतर बीट जमादार चव्हाण व पथकाने पंचनामा करून ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह ग्रामीण रुग्णालयात हलवला. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रमोद पारवे रुग्णकक्षसेवक गंगाधर पालवे यांनी शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले.या घटनेची माहिती महावितरणला देण्यात आली असली तरी अद्याप कोणताही अधिकारी घटनास्थळी पोहोचलेला नाही, अशी स्थानिकांची माहिती आहे. मृतकाच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

# मनमाड ते परभणी रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचे श्रेय लाटण्याचा पालकमंत्र्यांनी प्रयत्न करु नये

### खासदार संजय जाधव यांचे प्रतिपादन : तो निर्णय सरकारचा, त्यासाठी आमचाही पाठपुरावा

परभणी,दि. १० (प्रतिनिधी) : मनमाड ते संभाजी नगर तेथून परभणी पर्यंतच्या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाच्या निर्णयाचे श्रेय परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी लाटण्याचा प्रयत्न करु नये, त्यासाठी आपण व अन्य खासदारांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. तेव्हा सरकारने तो निर्णय घेतला आहे, असे मत शिवसेनेचे खासदार संजय जाधव यांनी व्यक्त केले.

खासदार जाधव यांनी पत्रकारांशी बोलतांना मनमाड ते परभणी पर्यंतच्या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाकरीता मोठा खर्च अपेक्षित होता. त्यामुळे तत्कालीन केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे आपण त्या विषयाच्या अनुषंगाने तगादा सुरु केला तेव्हा एका टप्प्यातील कामाकरीता एवढ्या मोठ्या रक्कमेस मंजूरी मिळणार नाही, असे दानवे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे मनमाड ते संभाजीनगर असा पहिला टप्पा व संभाजीनगर ते परभणी असा दुसरा टप्पा ठरवून त्यासाठी दोन्ही टप्प्यातून निधी मंजूरीसाठी प्रयत्न झाला.

आता दुसर्या टप्प्याकरीता केंद्र सरकारने २ हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. याचे श्रेय कोणीही लाटू नये, पालकमंत्र्यांनी तर श्रेय लाटण्याचा विषयच नाही, असे नमूद करीत केंद्रीय रेल्वे मंत्री व केंद्रीय रेल्वे राज्यमंत्र्यांना आपण प्रत्यक्ष भेटून काही विषय मार्गी लावण्याचा प्रयत्न केल्याची माहिती दिली.

करोना आपत्तीच्या काळात गंगाखेड रेल्वेस्थानकावर थांबणार्या चार ते पाच एक्सप्रेस बंद करण्यात आल्या होत्या. त्या एक्सप्रेसला पुन्हा थांबा द्यावा यासाठी आपण रेल्वे मंत्र्यांना साकडे घातले आहे. तसेच निजामाबाद ते पंढरपुर या रेल्वेत सर्वतोपरि सुविधा उपलब्ध कराव्यात, सद्यस्थितीत या रेल्वेगाडीकडे रेल्वे विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष आहे. सांडपाण्यापासून स्वच्छता किंवा अन्य गोष्टींबाबत अक्षरशः बोंबाबोंब आहे. या रेल्वेगाडीची बेवारस सारखी अवस्था आहे, हे आपण रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले, असे ते म्हणाले.

पूर्णा बायपास होऊ देणार नाही...

पूर्णा येथील जंक्शनला अनन्यसाधारण असे महत्व होते. परंतु, या रेल्वे जंक्शनचे महत्व कमी व्हावे या दृष्टीने दाक्षिणात्य अधिकार्यांनी सातत्याने प्रयत्न केले. आता पूर्णा जंक्शनचे महत्व अधिकच कमी व्हावे म्हणून बायपास काढण्याचा फंडा अवलंबविण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे पूर्णा ऐवजी रेल्वे गाड्या थेट अकोल्याकडे वळविण्याचा डाव खेळला जातो आहे, असे खासदार जाधव यांनी नमूद करीत दाक्षिणात्य अधिकार्यांचे हे प्रयत्न आपण पूर्ण होऊ देणार नाही, पूर्णा रेल्वेस्थानकावर २०० एकर जमीन उपलब्ध आहे. त्या जमीनीवर ऐनकेन प्रकल्प उभे राहु शकतात. विशेषतः ईलेक्ट्रीकल शेडही उभा राहु शकतो. त्यामुळे त्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत, असे ते म्हणाले.

नांदेड विभागाला स्वतंत्र दर्जा द्या....

दक्षिण मध्य रेल्वे विभागांतर्गत नांदेड विभागालाही स्वतंत्र सेंटर म्हणून मान्यता द्यावी, अशी मागणी खासदार जाधव यांनी केली. दक्षिणेत रेल्वेचे दोन विभाग करण्यात आले आहेत. त्या प्रमाणेच मराठी माणसांचा आग्रह ओळखून नांदेड विभाग दक्षिणेच्या अधिपत्त्यापासून दूर करावा, असे ते म्हणाले.

## जि.प. पुंगळा शाळेत रोडचे पाणी गेल्याने विद्यार्थ्यांची तारांबळ

जिंतूर

तालुक्यात आज झालेल्या मुसळधार पावसाने पुंगळा जिल्हा परिषद शाळा जिंतूर-औंढा रोडवर राष्ट्रीय महामार्गावर असल्याने रोडचे काम झाले असून सदरील साईटने नाली न काढल्यामुळे सदरील रोडचे पाणी शाळेत गेल्याने विद्यार्थ्यांची एकच तारांबळ उडाली.



जिंतूर -औंढा रोडचे काम मागील एक वर्षापासून चालू असून सदरील पुंगळा गावांमध्ये दोन्ही साईटने नाल्यांचे इस्टिमेट नसल्यामुळे गुत्तेदारांनी सदरील नाल्याने करण्यास नकार दिला असता गावकऱ्यांनी रोडचे काम थांबले होते . ग्रामपंचायत पुंगळ्याच्या वतीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे निवेदनाद्वारे सदरील नाली बांधकामाची मागणी केली होती. परंतु त्या मागणीला शासनाच्या वतीने अद्यापही मंजुरी मिळाली नाही. परंतु शासनाच्या वतीने हालचाली न केल्यामुळे आज झालेल्या अचानक मुसळधार पावसामुळे रोडच्या साईटला नाली नसल्याने सदरील एक साईट रोडचे पाणी सरळ शाळेच्या गेटमधून शाळेत गेल्याने शाळेला तळ्याचे स्वरूप आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना ये- जाय करण्यासाठी तारांबळ उडाली होती. पाऊस थांबल्यानंतर सदरील शाळेतले पाणी वसरल्या त्यानंतरच विद्यार्थ्यांना प्रवेश करावा लागला. या गंभीर समस्ये कडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सदरील रोडच्या साईटची नाडी करावी .अशी मागणी गावकरी व जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग जिंतूर, गटशिक्षणाधिकारी परभणी, शिक्षण विभाग जिंतूर, गटविकास अधिकारी जिंतूर ,ग्रामपंचायत कार्यालय पुंगळा यांना देखील निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहेत . नालीचे बांधकाम न झाल्यास १४ ऑगस्ट रोजी नागरिक , पालक, शिक्षण समिती उपोषण करण्यात येणार असल्याचेही दैनिकाशी बोलताना यांनी सांगितले.

## पैठणमध्ये पोलिसांना आणि वृक्षांना बांधल्या राख्या

तभा वृत्तसेवा

पैठण दि १० : जि.प.प्रशाला मुलांची पैठण येथे शासनाच्या परिपत्रका अनुसार स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत २ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान विविध उपक्रमा अंतर्गत कार्यक्रम आयोजित करण्याचे शासनाचे निर्देश आहेत त्या निर्देशाच्या अनुषंगाने ८ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांनी स्वतः राख्या बनविने व त्या राख्या आपल्या देशाचे रक्षण करते,सीमेवर सेवा देणारे आपले सैनिक, तसेच कायदा व सुव्यवस्था राखणारे समाजाचे रक्षण करणारे पोलीस प्रशासन यांना राखी बांधून



रक्षाबंधन साजरा करणे व आपल्या शाळेत लावलेल्या वृक्षांना राख्या बांधने व वृक्षाचे संवर्धन करणे तसेच चित्रकला स्पर्धेचे आयोजन करणे आदी. या कार्यक्रमा अंतर्गत प्रशालेतील विद्यार्थ्यांनी पैठण पोलीस स्टेशन मध्ये जाऊन पोलीसांना राख्या बाधल्या व प्रशालेतील झाडांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरा करण्यात आला.

तसेच प्रशालेत रांगोळी स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक अंकुश गाढे,एन.सी.सी प्रमुख ताराचंद हिवराळे,समशेर पठाण,राजेश पाखरे,दिलीप तांगडे,शेख यास्मिन,वैशाली कुटे,अर्चना चव्हाण, व प्रशालेतील विद्यार्थी उपस्थित होते.

## ढाकणे शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांची शासकीय पदांवर निवड

अ. नगर : शेवगाव तालुक्यातील राक्षी येथील ढाकणे शैक्षणिक संकुलात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहा विद्यार्थ्यांनी मोठे यश संपादन केले आहे.

कठोर परिश्रम, जिद्द व चिकाटीच्या जोरावर संकुलातील विद्यार्थी हिमांशू कबाडी, रोहन मुखेकर, स्नेहा वाघमारे व नरेंद्र लंगोटे या चार विद्यार्थ्यांची महावितरणमध्ये विद्युत सहाय्यकपदी तर ऋषिकेश चेमटे याची स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदी निवड झाली आहे. याचबरोबर संकुलातील विद्यार्थी ऋषिकेश केदार याची भारत सरकारच्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) येथे निवड झाली आहे. संकुलातील २४२ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यू दरम्यान विविध



पदांवर निवड झाली आहे.

या निवडीबद्दल ढाकणे शैक्षणिक संकुलाचे संस्थापक अध्यक्ष एकनाथराव ढाकणे, संस्थेच्या सचिव जया रहाणे, उपाध्यक्ष श्रीकांत ढाकणे, विश्वस्त ऋषिकेश ढाकणे, प्राचार्य डॉ. अंबादास डोंगरे, प्राचार्य डॉ. आर एच अत्तार, प्रा. प्रवीण नागरगोजे, प्रा. महेश मरकड, प्रा. सुनील औताडे, प्रा. सचिन म्हस्के, प्रा. संतोष आंधळे, विभागप्रमुख प्रा. राजकुमार गुजर, प्रा. संकेत मोताळे, प्रा. विश्वास घुटे, प्रा. संदीप बोराळे, प्रा. अश्विनी गोरे, प्रा. संपदा उरणकर, इन्स्ट्रक्टर महेश खरड, प्रा. योगेश्वर शिरसाट यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

संस्थेच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश कौतुकास्पद असून यामुळे ग्रामीण भागातील अन्य होतकरू विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळेल असा विश्वास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ ढाकणे यांनी व्यक्त केला.

## बायपास झालेल्या रुग्णावर रोटा-कट अँजिओप्लास्टी यशस्वी

### गुंतागुंतीच्या कॅल्शियमयुक्त ब्लॉकेजवर प्रगत तंत्रज्ञानचे सहाय्य, मेडिकव्हर हॉस्पिटल येथे यशस्वी उपचार

छत्रपती संभाजीनगर, ८ ऑगस्ट :

पूर्वी बायपास शस्त्रक्रिया झालेल्या ५० वर्षीय रुग्णाच्या हृदयातील अत्यंत कठीण आणि पूर्णपणे कॅल्शियमयुक्त नळीतील अडथळ्यावर रोटा-कट अँजिओप्लास्टी पद्धतीने यशस्वी उपचार करण्यात आले. ही प्रक्रिया छत्रपती संभाजीनगर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल येथे पार पडली. या यशस्वी उपचाराबाबत माहिती हृदयरोगतज्ञ डॉ., कुलदीप तोटावार यांनी दिली.

डॉ., कुलदीप तोटावार यांनी सांगितले की, सदर रुग्णाला मागील दोन महिन्यांपासून छातीत वेदना व दम लागणे अशी ॲन्जिना लक्षणे जाणवत होती. यापूर्वी त्यांच्यावर कोरोनरी आर्टरी डिसीज साठी बायपास शस्त्रक्रिया करण्यात आली होती. तपासणीत हृदयाच्या समोरील भिंतीत हालचाल कमी (हायपोकिनेसिया) असल्याचे व हृदयाची कार्यक्षमता म्हणजेच इजेक्शन फ्रॅक्शन केवळ ३५ टक्के असल्याचे निदर्शनास आले.



सीटी कोरोनरी अँजिओग्राफी

सीटी कोरोनरी ॲन्जिओग्राफी) मध्ये हृदयाच्या मूळ रक्तवाहिन्यांमध्ये तीन ठिकाणी अडथळे म्हणजेच ट्रिपल व्हेसल डिसीज आढळले. डाव्या बाजूचा एल आय एम ए ग्राफ्ट बंद झाला असून उजव्या बाजूचा आर एस व्ही जी ग्राफ्ट कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले.

कोरोनरी अँजिओग्राफी मध्ये समोर आले की, डाव्या बाजूच्या प्रमुख रक्तवाहिनीत म्हणजे एल ए डी आर्टरी मध्ये ९५ टक्के तीव्र आणि पूर्णपणे कॅल्शियमयुक्त अडथळा आहे. हा मार्ग उघडणे अत्यावश्यक होते. यासाठी हृदयरोग विभागाच्या टीममध्ये सखोल चर्चा झाली. उच्च धोका असलेली दुसऱ्यांदा बायपास सर्जरी टाळून, ॲन्जिओप्लास्टी हा अधिक सुरक्षित आणि प्रभावी पर्याय निवडण्यात आला.

प्रक्रियेतील आव्हाने आणि प्रगत तंत्रज्ञानाचा वापर

प्रक्रियेच्या दरम्यान सर्वसामान्य बॅलून देखील ब्लॉकेजमधून पुढे जाऊ शकत नव्हते. त्यामुळे रुग्णाच्या नातेवाइकांना समजावून सांगून प्रगत उपाययोजना वापरण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी रोटा-ब्लेशन हे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरले गेले. याद्वारे कॅल्शियमयुक्त अडथळा यशस्वीरित्या 'ग्राइंड' करून दूर करण्यात आला. यानंतर कटिंग बॅलून अँजिओप्लास्टी वापरून रक्तवाहिनी विस्तृत करण्यात आली व त्यामध्ये औषधयुक्त स्टंट (ड्रग इल्यूटिंग स्टंट) घालण्यात आला. रोटा-ब्लेशन ही पद्धत कठीण आणि कॅल्शियमयुक्त अडथळे दूर करण्यासाठी वापरली जाते. ही प्रक्रिया केल्याने स्टंट योग्य प्रकारे रक्तवाहिनीत बसवता येतो आणि रक्तप्रवाह सुरळीत होतो.

उपचार यशस्वी - रुग्णाची प्रकृती स्थिर

ही संपूर्ण प्रक्रिया शंभर टक्के यशस्वीझाली असून, रुग्णाची प्रकृती सध्या स्थिर आहे. वेळेवर केलेले निदान, योग्य निर्णय आणि प्रगत तंत्रज्ञानामुळे बायपास शस्त्रक्रियेची गरज न पडता रुग्णाचे प्राण वाचविणे शक्य झाले, असे डॉ. कुलदीप तोटावार यांनी सांगितले.

## समाजासाठी सेवा हीच खरी भक्ती - आ. संजना जाधव

### नरेंद्र महाराज संप्रदायातर्फे मोफत रुग्णवाहिकेचे लोकार्पण



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि. १० ऑगस्ट - कन्नड येथे जगद्गुरू रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्य महाराज संप्रदायाच्या वतीने रस्त्यावरील अपघातग्रस्त व गरजू रुग्णांसाठी मोफत रुग्णवाहिकेचे लोकार्पण सोहळा आमदार संजना जाधव यांच्या हस्ते पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार संजना जाधव होत्या. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, समाजासाठी सेवा करणे हीच खरी भक्ती आहे. नरेंद्राचार्य संप्रदायाने राबवलेली ही रुग्णवाहिका सेवा म्हणजे समाजाप्रती असलेली बांधिलकीची प्रचिती आहे. वेळेवर मिळणारी वैद्यकीय मदत म्हणजे अनेकांचे प्राण वाचवणारा आधार असून, अशा कार्यातूनच धर्माचा खरा अर्थ लोकांपर्यंत पोहोचतो. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृ.उ.बा. सभापती डॉ. मनोज राठोड, खरेदी विक्री संघ सभापती ज्ञानेश्वर निकम, भाजप नेते मनोज पवार, सरचिटणीस डॉ. संजय गव्हाणे, संचालक साईनाथ आल्हाड, निरीक्षक गिरीश कुलते, जिल्हाध्यक्ष सुरेश गव्हाणे, डॉ. सदाशिव पाटील, रत्नाकर पंडित, भाजप मंडळाध्यक्ष गणेश घुगे, बन्सीधर निकम, बंटी सुरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. सिकंदर कुरेशी, सरपंच अशोक दाबके, संतोष पवार, राम पवार आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, गुरूपूजन आणि आरतीने झाली. यावेळी संप्रदायामार्फत जिल्ह्यात ८ आणि कन्नड तालुक्यात १ अशा एकूण ९ रुग्णवाहिकांचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाला संप्रदायाचे जिल्हाध्यक्ष गणेश सांगळे, तालुकाध्यक्ष नंदकिशोर परदेशी, महिला तालुकाध्यक्ष उषा थोरात, गोरखनाथ आल्हाड, तालुका प्रसिद्धी प्रमुख गोपाल घुगे, संतोष जाधव, सचिन घुगे, कैलास कांबळे, दीपक रहाणे, सुनीता बावरे, विजय जाधव, गणेश वायड, चंद्रकांत बोराडे यांच्यासह तालुक्यातील शेकडो भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रुग्णवाहिका सेवेच्या माध्यमातून अपघातग्रस्त व गंभीर रुग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळेल, अशी आशा व्यक्त करत, उपस्थितांनी संप्रदायाचे आभार मानले.

## कर्करोग तपासणी वाहनद्वारे जिल्ह्यात रुग्णांची होत आहे तपासणी



परभणी, दि. १० -- राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत कर्करोग जागतिक तपासणी मोहीम परभणी जिल्ह्यात प्रभावीपणे राबविली जात आहे. या मोहिमेत दि. ३० ऑगस्टपर्यंत शहरी भाग, तालुका व ग्रामीण पातळीवर फिरत्या कर्करोग तपासणी वाहन द्वारे रुग्णांची तपासणी केली जात आहे. यामधून संशयित रुग्णांची निवड करून रुग्णांचे नमुने (बायोप्सी) तपासणी करण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत कर्करोग जागतिक तपासणी मोहीम अंतर्गत जिल्ह्यातील शहरी भाग, तालुका, व ग्रामीण स्तरावर फिरती कर्करोग निदान मोबाइल वाहन द्वारे विविध ठिकाणी कर्करोग शिबिरे आयोजित करण्यात आली.

१ ते ३० ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या या मोहिमे अंतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सारिका बडे, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यसंपर्क) डॉ. कल्याण कदम, स्त्री रोग तज्ञ डॉ. जयश्री यादव, यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या मोहिमे ची सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमे दरम्यान मुख कर्करोग, स्तन कर्करोग, गर्भाशय मुख कर्करोग तपासणी केली जात आहे. सदर तपासणी करिता स्त्री रोग तज्ञ डॉ. आरती सूर्यवंशी, डॉ. चैताली नामेवाड, दंत शल्य चिकित्सक डॉ. जगदीश भालेराव, डॉ. प्रतीक्षा रोडगे, डॉ. संदीप भस्के, डॉ. फिरोज इकबाल, डॉ. अमृता नागरे ह्या तज्ञ डॉक्टर ची नियुक्ती करण्यात आली आहे. ह्या मोहिमे साठी जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. सोनाली कांबळे यांचा मोलाचा सहभाग आहे.

कर्करोगाची लक्षणे --

मुख कर्करोग - लक्षणांमध्ये तोंडात चट्टे, खवखव, जखम बरी न होणे, तोंड उघडताना अडचण होणे यांचा समावेश आहे

स्तन कर्करोग - लक्षाणांमध्ये स्तनात गाठ जाणवणे, त्वचेमध्ये बदल, स्तनातून स्त्राव येणे हि प्रमुख लक्षणे आहेत. गर्भाशय मुख कर्करोग मध्ये अनियमित रक्तस्त्राव, पाठदुखी, थकवा.

अधिकाधिक रुग्णांनी या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार यांनी केले. कर्करोगाचे निदान लवकर झाले तर उपचार यशस्वी होण्याची शक्यता अधिक असते.

शस्त्रक्रिया, किमोथेरपी, रेडीयेशन थेरपी अशा विविध पद्धतीने उपचार केले जातात. तंबाखू, गुटखा, बिडी, सिगारेट, यांचे सेवन टाळावे. नियमित वैद्यकीय तपासणी करणे, एचपीव्हीलस घेणे, योग्य आहार व व्यायाम हे कर्करोगापासून बचावाचे उपाय आहेत.

## भरधाव जडवाहनाच्या धडके एक ठार

जिंतूर : जिंतूर - जालना रस्त्यावर एलआयसी ऑफिस समोर पदाचारी नागरिकास जड वाहनाने चिरडले ही घटना आठ ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास एलआयसी ऑफिस समोर जालना रोड देशी दारूच्या दुकानाच्या बाजूला हा अपघात झाला पायी चालणाऱ्या इसमास जड वाहनाने चिरडले हा अपघात भिषण झाला की पदचारी ईसमास हा जागीच मृत्यू झाला अपघात झाल्याचे समजताच आजु बाजु चे नागरिक मोठ्या संख्येने जमा झाले नंतर त्या व्यक्ती ला नागरिक त्या अवस्थेत जिंतूर ग्रामीण रुग्णालय या ठिकाणी देण्यात आले तेथील डॉक्टरांनी मृत्यू घोषित केल मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव विशाल कुमार कांबळे असे असून वय ४० वर्षे तो अंगणवाडीऑफिसमध्ये नोकरीला होता असे समजले हे वृत्तलेपर्यंत जिंतूर पोलिसात कुठल्याही प्रकारचा गुन्हा नोंद झालेला नव्हता

## ग्राम संसद कार्यालय जंरडी येथे पर्यावरण पुरक रक्षाबंधन साजरी करण्यात आली

फर्दापूर दि १०- ग्राम संसद कार्यालय जंरडी येथे रक्षाबंधन निमित्त पर्यावरण पुरक रक्षाबंधन साजरी करण्यात आली यावेळी ग्राम संसद कार्यालय येथे मोठ्या प्रमाणावर औपधी युक्त झाडे लावली आहेत त्याच प्रमाणे मोठ मोठे वृक्ष लागवड आहे त्यात वड, पिंपळ, उंबर, बांबू,साग, आवळा यांसारखे झाडे लावली असून ग्राम विकास अधिकारी सुनील मगरुळे यांच्या नेतृत्वाखाली रक्षाबंधन हे वनसंपदा मध्ये झाडे यांना राखी बांधून साजरी करण्यात आली कारण की या झाडाविषयी म्हणून आपल्याला मोफत ऑक्सिजन, सावली अशा प्रकारे फार मोठ्या प्रमाणात आपल्या गरजा पूर्ण करतात यामुळे पर्यावरण पुरक रक्षाबंधन साजरी करण्यात आली

सोलापूर तरुण भारत

dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## कर्तृत्वाचे आकाश

निकिता गावंडे/९९७०६६३८१३

# रंग माझा वेगळा

मराठी शाळेनं मला घडवलं. आज मराठी शाळा बंद होत आहेत याची मला खूप खंत आहे. जे मूल्य जे संस्कार मराठी शाळा मुलांना देतात ते देशातील कोणतेही नॅशनल इन्स्टिट्यूट देऊ शकत नाही, अत्यंत जबाबदारीने हे वाक्य उद्गारणारा हा तरुण आहे नागपुरातील सुप्रसिद्ध डिझाईनिंग आर्टिस्ट गजेश मिटकरी! नागपुरातील चिटणीस नगरात स्टुडिओ मोदक असे अफलातून नाव असलेला, आंब्याच्या व कडूनिंबाच्या झाडांनी वेढलेला एक डिझाईनिंग स्टुडिओ आहे. तिथे जर कधी गेलात तर एक कुरळ्या केसांचा, साधेपणातच आपले स्टाईल स्टेटमेंट मिरवणारा, एक बोलघेवडा तरुण तुमचे स्वागत करेल. डिझायनिंगच्या क्षेत्रात सध्या गजेश मिटकरी हे एक अग्रगण्य नाव आहे. तुला मोदक हेच नाव कसे सुचले रे? या माझ्या प्रश्नावर मिश्किलपणे हसत तो म्हणतो,'मी गजेश, बाबा महादेव आणि भाऊ ऋषभ तर स्टुडिओ मोदकच असणार ना!'

कस्टम डिझायनिंग हा सध्याचा लोकप्रिय ट्रेंड आहे. कस्टम डिझायनिंग म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन, त्याला भेट देण्यासाठी एखादी स्पेशल वस्तू तयार करणे. या कस्टम डिझायनिंगच्या कलेत गजेश पारंगत आहे. अमिताभ बच्चन, अंबानी यासारख्या दिग्गजांसाठी त्याने पर्सनलाईज्ड गिफ्ट्स तयार केले आहेत. अंबानींच्या लग्न सोहळ्यात भेट म्हणून देण्यात आलेले 'सातवचन' हे विवाहातील सात वचनांचा अर्थ उलगडणारे चांदीचे पुस्तक गजेशने डिझाईन केले आहे. टायटन, युनी लिव्हर, ह्युंदाई, सोनी, मास्टरकार्ड, रियल मी, नेटफ्लिक्स यासारख्या गाजलेल्या कंपन्यांसाठी त्याने काम केलं आहे. आलिया भट बरोबर असलेला त्याचा इंस्टाग्रामवरील लाजराबुजरा फोटो त्याच्या कामाची उंची सहज सांगून जातो. भारतातील वेगवेगळ्या ठिकाणांवरून आणलेल्या विविध कलाकुसरीच्या वस्तूंनी त्याचा स्टुडिओ भरलेला आहे. भिंतीच्या मध्यभागी असलेले महाराजांचे चित्र, त्याच्या आजूबाजूला विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींची तैलचित्रे, कागदांचे लॅम्प्स, लटकणारा कंदील, लोकरीचे मोदक, विविध कलाकुसर असलेल्या लाकडी वस्तू त्याच्या अभिरुची विषयी खूप काही सांगून जात होत्या. पण, सर्वात जास्त बोलत होते ते या हसऱ्या खेळकर तरुणाचे बोलके डोळे! प्राथमिक शाळेत जाणारा पोरगा जसा आपल्या अनेकविध वस्तूंचा खजिना आपल्याला दाखवतो तितक्याच निरागसतेने गजेश आपल्या विविध डिझाईन्सचा खजिना आपल्यासमोर मांडतो आणि मग आपला प्रवेश होतो तो जवळपास १५ ते ३० च्या त्या खोलीत असलेल्या अलिबाबाच्या गुहेत! 'चित्रकलेची आवड ही माझ्यासाठी एखाद्या एस्केपप्रमाणे होती. मला बाकी मुलं खेळ खेळायचे ते कधीच आवडले नाही. काही घटना लहानपणीच्या अजूनही आठवतात. कुल्फीवाला यायचा तेव्हा लोक कुल्फी खाऊन काड्या फेकून द्यायचे, मी त्याकडे जमा करायचो आणि त्यापासून कधी झोपडी बनवायचो तर कधी आणखी काही आणि मग जे काही बनवलेले असेल त्याच्यावर एखादी स्टोरी बनवायचो. एखादा कोणी जाणार येणारा भेटला की, त्याला ते काय बनवलेलं आहे? याची कहाणी रंगवून सांगायचो. गजेश बालपणात शिरलेला होता. कलाकार हा एक वेगळे मटेरियल असतो. तेव्हा एखाद्या सर्वसामान्य मुलाप्रमाणे तुझा शाळेचा अनुभव कसा होता, या माझ्या प्रश्नावर हसतच गजेश व्यक्त होतो. आज मी जे काही आहे त्याचं श्रेय फक्त नि फक्त मराठी शाळेला आहे. भविष्यात माझ्याकडे जर पुरेसा पैसा असला ना तर मी पहिलं काम हे करेन की, मराठी शाळा सुरू करीन. गजेशचे हे विधान सध्याच्या बंद पडत असलेल्या सरकारी शाळांच्या व त्याविषयी शासन दाखवीत असलेल्या अनास्थेच्या पार्श्वभूमीवर अतिशय महत्त्वाचे आहे. कॉन्व्हेंट मला कधीच आवडले नाही. याला शाळेत पाठवताना मला किती त्रास झाला आणि किती शाळा बदलवून झाल्या, हे माझं मला माहित! स्वतः श्री राजेंद्र हायस्कूल महाल नागपूर येथून उपमुख्याध्यापक या पदावरून सेवानिवृत्त झालेले त्याचे वडील महादेव मिटकरी आवर्जून सांगतात. शेवटी असे ठरले की गजेशने त्याची आई सौ सविता यांच्यासोबत सालई गोधनी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घ्यायचा. त्या शाळेतील विद्यार्थ्यांची परिस्थिती कपडे चपला वीज यासारख्या गोष्टी ज्या शहरात अगदी सहज उपलब्ध असतात त्या गोष्टींकरिता त्या मुलांचा असलेला संघर्ष, खराब रस्ते, नद्या नाल्यांना येणारे पूर यातून वाट काढत आईच्या मागे लुनावर बसून शाळेत जायचे. यातून नकळत गजेश घडत गेला. पूर असताना शाळेतच मुक्काम करायचा. लाईट नाही पंखा नाही पोत्यावर झोपायचे यातून कुठल्याही परिस्थितीत ॲडजेस्ट करण्याचा संस्कार नकळत घडत गेला. 'शहरातल्या मित्रांशी माझं पटायचं नाही. माझे मित्र गावातले खेळही गावातलेच होते. हा मातीचा संस्कार जो लहानपणापासून झाला तो अजूनही कायम आहे.' गजेशला आयुष्यात गावात सेटल होऊन आपले काम करायचे आहे. त्यानंतर त्याने शिशु ज्ञान मंदिर या शाळेत प्रवेश घेतला. 'तिथे शिकवले जाणारे मनाचे श्लोक मला अजूनही आठवतात. त्या कथा, ती गाणी, पाढे, चित्रकला स्पर्धा यांनी माझ्या मनावर कधीही न विसरता येण्यासारखे संस्कार केलेले आहेत. मराठी माध्यमाचा हा मुलगा नेहमीच चित्रकला स्पर्धा, भाषण, नृत्य नाटक यात पुढे असायचा. तो शिक्षकांच्या मदतीने नाटक लिहायला, दिग्दर्शित करू लागला. तेथील मनकानी मॅडम, कळमकर मॅडम, गोस्वामी सर यांची नावे तो आवर्जून घेतो.



एन.आय.डी मध्ये असताना मला आलेले चॅलेंजेस वेगळे होते. तिथे शिकत असताना सगळ्यात महत्त्वाची समस्या होती ती भाषेची! मराठी शाळेतून शिकलेलो असल्याने मला इंग्रजी काही तितके चांगले बोलता येत नव्हते.' गजेश प्रमाणेच भाषेचा हा प्रश्न बऱ्याच मराठी माध्यमाच्या मुलांना भेडसावतो. एनआयडी सारख्या संस्थांमध्ये देशभरातील फक्त शंभर विद्यार्थी, तसेच बाहेरचेही विद्यार्थी येत असल्यामुळे तिथे सर्व काम इंग्रजीतून चालते. अशा संस्थांमध्ये शिक्षणाचे वैशिष्ट्य असं असते की तिथे लिखित पेपर वगैरे असा काही नसतो. आपण जे काम करतो त्याचा फक्त प्रेझेंटेशन करायचं असतं. तिथे मराठी माध्यमाच्या मुलांची पंचाईत होते. काम कितीही चांगलं असलं तरी इंग्रजीतून प्रेझेंटेशन जमत नाही. मग स्कोर एकदम कमी होतो. म्हणूनच सध्या पालकांचा कल महागड्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे असतो. परंतु इच्छाशक्ती असेल, शिकण्याची तयारी असेल तर या अडचणीवरही मात करता येते. गजेशने भाषेवर भरपूर मेहनत घेतली. हिंदी, इंग्रजी या भाषा अगदी व्यवस्थित शिकून घेतल्या. सेकंड ईयरपासून माझ्या गाडीने चांगली स्पीड पकडली. तो म्हणाला,'मी तिथे पुढाकार घेऊन आपले सण समारंभ साजरे करायचो. तिथे आम्ही गणपतीही बसवला तीन दिवसांचा. तान्हा पोळा ही आपल्या विदर्भाची स्पेशालिटी! तिथे गुजरातला आम्ही तान्हा पोळा साजरा केला. आम्ही तिथे ढोलताशा पथकही तयार केलं. तिथल्या आचारी लोकांना मोदक तयार करायला शिकवले. आम्ही स्वतःच गुढी उभारायचो. वेगवेगळ्या लोककलाकारांना बोलवून त्यांचे कार्यक्रम ठेवायला लागलो. हळूहळू प्रत्येक राज्याचे सण समारंभ तिथे साजरे व्हायला लागले. कुठेही गेलो तरी आपले सण-संस्कृती सोडायची नाही, हे पक्कं ठरलं होतं. या कलाकाराचे आपल्या मातीवर असणारे प्रेम बघून मी भारावून गेले.

> **मी नेटफ्लिक्स आणि त्यासारख्या काही मोठ्या कंपन्यासोबत फ्री लान्सर म्हणून काम सुरू केले. कुठलाही कलाकार हा सहसा स्वतःमध्येच रममाण होणारा असतो. लोकांशी बोलून काम कसं मिळवायचं, पैसा कसा आणायचा हे त्याला कळत नाही. या सगळ्या कंपन्यांबरोबर काम करताना गजेश ही गोष्ट शिकला. मग बोरोसिलकडून मला ऑफर मिळाला. तिथे तो क्रिएटिव्ह मॅनेजर या पदावर रुजू झाला आणि ऑलम्पिक कॅम्पिंगसाठी काम केले. मग, त्याने 'फुल' ही कंपनी जॉईन केली. हे मंदिराचे निर्माल्य गोळा करून ते रिसायकल करून त्यापासून अगरबत्ती बनविण्याचे काम करायचे. मला ज्या प्रकारचे क्रिएटिव काम करायचे होते.**

माझी प्रोफेशनल कारकीर्द कॉलेजमध्ये असतानाच सुरू झाली. माझा पहिला प्रोजेक्ट मी अगदी पहिल्याच वर्षी घेतला. इथे जवळच एक कॅफे आहे. त्या कॅफेची भिंत पेंट करण्याचे काम मी घेतले. त्या काळात त्याचे १५ हजार रुपये मला मिळाले. एनआयडीची फी पावणेतीन लाख रुपये आहे. तेव्हा इतकी फी भरल्यावर घरी पैसे मागायची मला लाज वाटायची. आपल्या शिक्षणाचा खर्च ही पूर्णपणे आपल्या आई-वडिलांची जबाबदारी आहे अशी मानसिकता असणाऱ्या तरुणांसाठी हे उदाहरण आय ओपनर आहे. 'तिसऱ्या वर्षाला असताना मी कॉलेजचे असाइनमेंट म्हणून रजत कपूरच्या आंखो देखी नावाच्या एका चित्रपटाचे पोस्टर तयार केले. मी ते इंस्टाग्राम, फेसबुक इकडे तिकडे टाकले. ते रजत कपूरच्या टीमपर्यंत कसे पोहोचले माहित नाही. पण, मला रजत कपूरचा कॉल आला. मला वाटलं कुणीतरी मस्करी करत असेल. मी म्हटलं, अच्छा बोला बोला! त्यांनी मला त्यांच्या नवीन सिनेमाचे पोस्टर तयार करण्याची ऑफर दिली. त्या प्रोजेक्टचे मला पंधरा-वीस हजार रुपये मिळाले. दरम्यान, लॉकडाऊन सुरू झालं. मी नेटफ्लिक्स आणि त्यासारख्या काही मोठ्या कंपन्यासोबत फ्री लान्सर म्हणून काम सुरू केले. कुठलाही कलाकार हा सहसा स्वतःमध्येच रममाण होणारा असतो. लोकांशी बोलून काम कसं मिळवायचं, पैसा कसा आणायचा हे त्याला कळत नाही. या सगळ्या कंपन्यांबरोबर काम करताना गजेश ही गोष्ट शिकला. मग बोरोसिलकडून मला ऑफर मिळाला. तिथे तो क्रिएटिव्ह मॅनेजर या पदावर रुजू झाला आणि ऑलम्पिक कॅम्पिंगसाठी काम केले. मग, त्याने 'फुल' ही कंपनी जॉईन केली. हे मंदिराचे निर्माल्य गोळा करून ते रिसायकल करून त्यापासून अगरबत्ती बनविण्याचे काम करायचे. मला ज्या प्रकारचे क्रिएटिव काम करायचे होते. आपल्या संस्कृतीला धरून आपल्या कलाकारांसोबत काम करायचे होते, ती संधी मला इथे मिळाली. तिथे असताना त्याने अमिताभ बच्चनसाठी गिफ्ट बॉक्स डिझाईन केला. आनंद स्वीट्स नावाच्या बंगळुरूच्या मिठाईब्रँडसाठी त्याने होळीचे कलेक्शन डिझाईन केले. नटीग्रिटी नावाचा दिल्लीचा ड्रायफ्रूट ब्रँड आहे. त्यांच्या गिफ्ट बॉक्समध्ये त्याने मुंबई, केरळ, राजस्थान, कोलकाता येथे ज्या पद्धतीने दिवाळी साजरी केली जाते ती दाखवली. एका गिफ्ट बॉक्सवर तर गजेशने पूर्ण रामायण चित्रांच्या स्वरूपात साकारले आहे. अगरबत्तीच्या बॉक्सेसवर त्याने बद्रीनाथ-केदारनाथ मंदिरांचे सुंदर डिझाईन तयार केले. त्या अगरबत्त्याही संबंधित मंदिरातील निर्माल्यापासून तयार झाल्या आहेत.

गजेशच्या कामाची दखल घेऊन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाद्वारे त्याचा एक व्हिडिओ तयार करण्यात आलेला आहे. ही तर फक्त सुरुवात आहे. अगर आगाज ये है तो अंजाम क्या होगा... रंगरेषांच्या या किमयागाराला त्याच्या उज्वल भविष्यासाठी खूप शुभेच्छा!

---

# कुटुंब संस्थेची संक्रमणावस्था

एकविसावे शतक हेच मुळात वैज्ञानिक, तांत्रिक दृष्टिकोन वाढविणारे आहेत. आधीच्या पिढीतील विचारांच्या आणि परंपरेने चालत आलेल्या विविध गोष्टींऐवजी त्यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून नवनिर्मिती करणे ही ओढ आपल्याला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातच पाहायला मिळते. अगदी स्वयंपाक घरापासून ते राहणीमानापर्यंत खूपच बदल झालेले आहेत.

जसे मोबाईल हा मित्र व शत्रूही आहे. त्याच्या अतिक्रमणाचे व दुष्परिणामाचे चटकेही आता लागत आहेत. माणूस माणसावर अवलंबून न राहता केवळ यंत्राला महत्त्व देतोय. याचा अर्थ हे संक्रमण पचवण्याचे सामर्थ्य ही



समाजातील व्यक्तिंमध्ये असले पाहिजे.

वास्तविक पाहता संक्रमण होणारच फक्त संक्रमणासाठी जशी नवीन पिढी तयार असते तसेच दुनिया ही पिढीला हे स्वीकारूनच पुढे जावे लागते. तसे न केल्यास कुटुंबात वादविवाद वाढत जातात. कुटुंब संस्था मुळात सर्व संक्रमणांचा केंद्रबिंदू व आधारस्तंभही आहेत. या स्तंभाला वाळवी लागता कामा नये तो पूर्णपणे वास्तविक व पारंपरिक व नवीन विचारसरणीच्या कृतींच्या माध्यमातून, माध्यमांच्या खत पाण्यापासून तयार झाला पाहिजे तरच तो आधार वडाचे काम करणार ना पिंडे पिंडे मति(र): भिन्न! प्रत्येकाचा स्वभाव व प्रकृती भिन्नच असते व निसर्गाच्या नियमाप्रमाणे ती असते. तरच विविधतेत एकता निर्माण होण्याची शक्यता असते. प्राप्त परिस्थितीमधून मार्ग कसा काढायचा याचे बाळकडूही कुटुंबातून मिळत असते. आज कुटुंब संस्थेची दशा आणि दिशा या दोन्हीत आमुलाग्र बदल झालेले दिसतात. ते योग्य आहेत, याची पडताळणी ही पालकांना करता आली पाहिजे कारण, कुटुंब संस्थेच्या आचार-विचार सरणीत झालेल्या बदलांचा परिणाम समाजावर व पर्यायाने राष्ट्र व न्याय शक्तीवर होणारच. 'घरोघरी मातीच्या चुली' म्हणून आता काम भागणार नाही. सुवर्णमध्य साधण्यासाठी प्रत्येक नागरिकाला सतर्क राहणे आवश्यक आहे. 'मी आहे म्हणून सुरळीत चालते आहे', असे म्हणणे म्हणजे केवळ मूर्खपणाच!

डॉ. अचला तांबोळी/९८९०६१७५३९

### कुटुंब संस्थेची जबाबदारी

औपचारिक शिक्षणातून आपल्याला ज्ञान मिळेल का? मिळत असल्यास ते कशा प्रकारचे? याचा प्रत्यक्ष जीवनातील उपयोग काय? जीवनमूल्य जपण्यासाठी त्याची कितपत मदत मिळणार ? या सर्व गोष्टींच्या परिणामांची चर्चा हा कुटुंबातील ज्येष्ठ मंडळींच्या चर्चेचा व आवडीचा विषय असला पाहिजे. अर्थात ज्येष्ठांचे मतही विचारात घेण्याची पात्रता आजकाल लुप्त झालेली आहे, हा भाग वेगळा! याबाबत प्रत्यक्ष चर्चासत्रे व कृती द्वारास बदल घडविण्याचे स्वप्न आपण पाहू शकतो. हल्ली प्रत्येकाच्या चेहऱ्यावर चिंतेची छटा व आपल्या मुलांच्या नशिबात काय वाढून ठेवले आहे, यानेच पालकांची मने व्याप्त झालेली दिसतात. हे चित्र बदलण्याचे सामर्थ्य कुटुंबात निर्माण होणेच, काळाची खरी गरज आहे. काही गोष्टींचे मंथन आपण येथे करणार आहोतच ते यासाठी की, कुटुंब संस्थेची घडी बदलविण्याचे बळ आता प्रत्येकाच्या अंगी येणे आवश्यक बाब झाली आहे.



### पारंपरिकता

पारंपरिक गोष्टींचे महत्त्व हे एका पिढीतून दुसऱ्या पिढीत अगदी पारदर्शकतेतून झाले पाहिजे. संस्कार, परंपरा, मूल्य शिकविण्यासाठी कुटुंबाने आपल्या पारंपरिकतेला प्राधान्य देऊन घरात विविध खेळ कार्यक्रम घडवून आणले पाहिजेत. येथे अनौपचारिकरित्या सर्व शिकायला मिळाल्याने वेगळे क्लासेस लावण्याची गरजच नाही. शिवाय, मोबाईल, टीव्ही आहेच की शिकवायला... विविध माध्यमातून क्रांती घडविण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. त्यासाठी शासनाद्वारा विविध माध्यमांचे सेन्सॉर मंडळाने आपल्या परीने हे काम करणे गरजेचे आहे. 'फुला संगे मातीसही वास लागे' या नात्याने समाजातील प्रत्येक नागरिकाने विशेषतः पालकांनी पुढाकार घेऊन, आपल्या कुटुंबापासूनच श्री गणेशा केला पाहिजे. 'अति तेथे माती' या नियमाचे अगत्याने पालन करावे. नवीन व जुन्या पिढीतील सामंजस्य वाढविण्यासाठी वादविवाद, नकारात्मक भाषा टाळली पाहिजे. कुटुंबातील सदस्यांची एकंदरीतच समायोजन करण्याची शक्ती वाढविण्यास हातभार लावावा. पारंपरिकतेला नवा साज देण्याचे कार्य पालकांनीच करायचे आहे. ज्या देशातील पारंपरिक शक्तींचे संक्रमण कुटुंबाद्वारा होते. तिथेच प्रगत समाज व उज्वल राष्ट्राची निर्मिती होण्याचे बळ आहे, असे समजावे तशी वातावरण निर्मिती प्रत्येक कुटुंबातून होण्याची व करण्याची आज गरज आहे. कुटुंबाची दिशा

कुटुंबामध्ये समाविष्ट होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला काही ना काही भूमिका आपल्यासाठी अथवा कुटुंबाकरिता पार पाडावीच लागते. त्यानुसार कुटुंबाची दिशा ठरते. कुटुंब संस्थेचा आधारवड हे पालकच असल्याने कोणत्या प्रकारचे म्हणजे एक पालक असणारे, घटस्फोटीत सावत्र माता अथवा पिता, व्यसनाधीन, वाममार्गी, परिस्थितीजन्य पालकत्व, वितंडवादी, एकल किंवा बहुपालकत्व, दत्तक पालकत्व, कुमारी माता अथवा अपंग, प्रौढ पालकत्व इत्यादी प्रकारे एक, अनेक अथवा मिश्र स्वरूपाचे पालकत्व वाट्याला येऊ शकते, याचा प्रामुख्याने विचार व्हावा. अर्थात समस्याग्रस्त पालकत्व प्राप्त झाले तरीही सुजाणतेचाच आधार घ्यावा. फक्त मुलांवर योग्य ते संस्कार करूनच त्यांची वाढ समाजमान्य व धर्ममान्य होण्यास प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. कोणापासून काही शिकणे आणि आत्मसात केल्याने कुटुंबावर त्याचा नक्कीच प्रभाव पडतो. तेव्हा पालकांमध्येच विवेकबुद्धीचा विकास होणे गरजेचे आहे. म्हणजे खऱ्या अर्थाने पालक संस्कृती वाहक, संवर्धक व संरक्षक होतील. हल्ली विवाह संस्थेला व्यवसायिक रूप आल्यामुळे मुळातच आपुलकी, आपलेपणा, प्रेमाची जपणूक फारशी होताना दिसत नाही. प्रौढ पालकत्व, एकल अथवा घटस्फोटीत पालकत्वाच्या समस्या त्यामधूनच निर्माण झालेल्या आहेत. श्रद्धा, विश्वास, आत्मविश्वास, आत्मस्तुती इत्यादी आंतरिक घटकांचे पालनपोषण करताना पालकांना अतिशय जागरूक राहणे गरजेचे आहे. कोणत्याही गोष्टींचे, तत्वांचे, नियमांचे पालन हे तुलनात्मक होत असले तरी संतुलित करण्याकडे पालकांच्या प्रयत्नांची दिशा असली पाहिजे.

परिणामांच्या संघर्षातूनच पालकत्वाची भूमिका वठवली जाते व त्यानुसारच कुटुंबाची दिशा व दशा बदलते. पालकांनी संस्कारयुक्त कुटुंबाची निर्मिती करण्याकरीता स्वतःमध्ये आधी बदल घडवून आणण्याची पात्रता निर्माण करावी लागते.

---

## रिंगा रिंगा रोजेस

श्रेया सरनाईक/८६००२७७८८८

# भयकथा

**भाग - ३**

पण, त्या दोघांचं एकमेकांवर खुप प्रेम होतं. त्याला तिच्या फ्रेंच शिकवण्याविषयी खूप अभिमान होता. तसाच अभिमान तिला त्याच्या गूढविद्येविषयी असावा, अशी त्याची अपेक्षा होती. पण, रूथसाठी गूढविद्या म्हणजे मूर्खपणा होता. दोघांच्याही आयुष्यात कसलीतरी पोकळी होती. त्यावर मात करण्यासाठी ते आपापल्या विश्वात मग्न असत.

रुथला नोकरी लागल्यावर हे घर दोघांनाही पाहता क्षणी आवडले होते. घर मोठे प्रशस्त होते. सहा-आठ खोल्या, मोठा व्हरांडा आणि उतरत्या छपराचं ते घर बाहेरून अतिशय सुंदर दिसे. समोर वॉल कम्पाऊंड, लाल मातीचं अंगण आणि फुलझाडं होती. गेटमधून आत शिरले की मोठे अंगण आणि समोर व्हरांडा! व्हरांडा ओलांडला की, आत मोठा हॉल होता. उत्तम प्रकारचं जाजम, शोभिवंत देखण्या वस्तू हारीने मांडलेल्या होत्या.

हॉलला आणखी तीन दरवाजे होते. एक सरळ स्वयंपाक खोलीकडे नेणारा होता. उजव्या बाजूला त्यांची बेडरूम होती. त्याला लागूनच रुथची अभ्यासिका होती. हॉलमधून डाव्या

बाजूने उघडणारी एक खोली होती. पण, तिचा हॉल मधून असणारा दरवाजा कायम बंद असे.

व्हरांड्यातून डावीकडे वळलं की, शेवटी शेवटी या खोलीत जायला आणखी एक दरवाजा होता. रुथच्या अभ्यासिकेत पुस्तकंच पुस्तकं होती. इंग्रजी, फ्रेंच साहित्य, महाकाव्य, व्याकरण, व्युत्पत्ती शास्त्र इ. मोठमोठे ग्रंथ होते. रुथ फार देवभोळी नव्हती. पण, तरी रोज एकदा प्रेयर करण्याची तिला सवय होती. कपाटात ठेवलेल्या, तिच्या आईने गिफ्ट केलेल्या चांदीचा क्रॉस असलेल्या साखळीला ती दिवसातून एकदा तरी कुरवाळी. त्याचं चुंबन घेत कपाळाला लावत असे. ती श्रद्धा होती की आईची आठवण? व्हरांड्यात शेवटी असलेल्या या खोलीत मायकेलचाच सतत वावर असे. ही त्याची स्पेशल खोली होती.

ऐऱ्यागैऱ्यांना तिथे प्रवेश नव्हता. या खोलीच्या सर्व खिडक्या कायम बंद असत. हॉलकडून उघडणारा दरवाजासुद्धा कायम बंद असे. व्हरांड्यातून उघडणाऱ्या दरवाजातून मायकेल जाणे-येणे करत असे. घर साफ करणाऱ्या मेडला त्या खोलीत जातांना खूप भीती वाटायची. आपले मायकेल सर रोज चक्क मृतात्म्यांशी बोलतात हे कळल्यावर तिची खरं तर बोबडीच वळली होती. पण, भरपूर पगार असल्याने तिने ती खोली स्वच्छ करण्याचे काम स्वीकारले होते.

प्लँचेटच्या खोलीत ती आठवड्यातून एक-दोन वेळा सफाईला जाई. तिथे लहान-मोठे, वेगवेगळ्या रंगांचे प्लँचेट बोर्डस् ठेवलेले असत. अनेक जळलेल्या मेणबत्त्या, काडेपेटीच्या अर्धवट काड्या खूप सापडत. खोलीच्या मधोमध आखूड पायांचा चौकोनी टीपॉय होता. त्याच्या आजूबाजूला चार छोटे स्टूल ठेवलेले होते. भिंतींना टेकवून खुर्च्या ठेवलेल्या असत. खोली साफ करताना त्यांची रचना थोडीसुद्धा बदललेली, बिघडलेली मायकेलला आवडायची नाही. मधल्या टी पॉयवर प्लँचेट बोर्ड ठेवलेला असायचा.

मायकेल हा एका गुप्त चवळीचा प्रमुख होता. या चळवळीशी संबंधित लोकांना गूढ विद्यांचा अभ्यास शिकवला जाई. हे लोक समाजात फार मिसळत नसत. त्यांचे ठराविक मित्रमंडळ होते. रूथला त्याच्या संपर्कात असलेल्या अनेक मित्र- मैत्रिणींची माहिती होती. यातील काही लोक लेखक होते, काही पत्रकार, तर काही मोठया सरकारी हुद्यांवर होते, काही तर राजकारणीही होते. या सर्वांना जोडणारा एकच धागा होता तो म्हणजे प्लँचेट! या संस्थेला चर्चची मान्यता अद्याप मिळवली नव्हती.

शनिवार, रविवारी मायकेलकडे विशेष गर्दी असे. सर्वांना त्या खोलीत प्रवेश मिळायचा नाही. व्हरांड्यात खुर्च्या टाकून लोक आपला नंबर येण्याची वाट बघायचे. ज्यांचा आपल्या मृत नातेवाईकांच्या आत्म्याशी संपर्क व्हायचा ते आनंदीत व्हायचे तर, कधी काही लोक प्रियजनांच्या आठवणीने व्याकुळ होत. काहींना मृतांकडून अनेक धक्कादायक गोष्टी समजत. ऑटो रायटिंगच्या माध्यमातून अनेकदा काही घटना लिहिलेले कागद सापडत.

रुथला या सगळ्या गोष्टींची फारशी भीती वाटत नसे कारण, तिचा कोणत्याच अशा अतिंद्रिय गोष्टीवर विश्वास



> **रुथला नोकरी लागल्यावर हे घर दोघांनाही पाहता क्षणी आवडले होते. घर मोठे प्रशस्त होते. सहा-आठ खोल्या, मोठा व्हरांडा आणि उतरत्या छपराचं ते घर बाहेरून अतिशय सुंदर दिसे.**

नसे. तिला हे सर्व हास्यास्पद वाटे. रुथचा नवरा अतिंद्रिय शक्तींचा अभ्यासक आहे हे समजल्यापासून तिच्या अनेक नातेवाईकांनी तिच्याशी संपर्क तोडला होता. अर्थात त्याने रूथला काहीच फरक पडला नव्हता. ती तिच्या छोट्याशा आयुष्यात खुश होती. शाळा हेच तिचं सर्वस्व होते. अतिंद्रिय शक्तींचा अभ्यास करणाऱ्या एका सिल्व्हर सनफ्लॉवर नावाच्या संस्थेची स्थापना झाली होती. अर्थात, याला सरकारी मान्यता नव्हती.

पण तरीही हजारो लोक याचे सभासद होण्यास उत्सुक होते. रूथला हे माहित होते की, मायकेल या संस्थेचा संस्थापक आहे. या संस्थेचा मुख्य हेतूच मुळी हा होता की, प्लँचेट तंत्र शेकडो लोकांना शिकवणे, गूढ सूचनांचा योग्य अर्थ लावणे, ऑटो रायटिंगसाठी अतिंद्रिय लहरींचा उपयोग करणे, आत्म्यांना आवाहन करणे, स्पेलिंग्जचे नोट इंटरप्रिटेशन करणे वगैरे! चर्चची अशा संस्थांना परवानगी नसल्याने याच्या सभा घेतांना, कार्यशाळा घेतांना अनेक कोडवर्ड्स वापरले जात. युरोप खंडात व अमेरिकेमध्ये शेकडो केंद्र सुरू करण्याची मायकेलची इच्छा होती. (क्रमशः काल्पनिक कथा)

(पुढे कोणती विलक्षण घटना घडते की त्यामुळे त्यांचे आयुष्य अचानक कलाटणी घेते? वाचू या पुढील भागात)

क्रमशः

## रोखठोक

दिनेश गुणे

# ... ही तर नुसतीच 'हूल'?

दिवाळीचा सण आला की विशेषतः लहान मुलांमध्ये उत्साह ओसंडून वाहू लागतो. घरोघरी रांगोळ्या काढल्या जातात, पणत्या किंवा विजेच्या दिव्यांची रोषणाई होते, फराळाच्या पदार्थांची रेलचेल होते आणि सण सजून जातो. पण मुलांच्या दृष्टीने या सणाचा आनंद वेगळ्याच गोष्टीत दडलेला असतो. या सणाच्या निमित्ताने फटाक्यांची आतषबाजी अनुभवणे हा त्यांच्यासाठी अत्युच्च आनंदाचा सोहळा असतो. म्हणून मुलांना दिवाळी अधिक आवडते. सकाळी अभ्यंगस्नान वगैरे आटोपले की आपल्या वाटणीस आलेल्या फटाक्यांची खोकी उघडून त्यांचा धमाका उडविण्याचा कार्यक्रम आखण्यातला मुलांचा आनंद काही औरच असतो. दिवाळीच्या दिवसांतही अनेकदा पावसाळी वातावरण असल्याने काही फटाके मात्र, वाजतच नाहीत. एखादा अ‍ॅटम बॉम्ब घेऊन अंगणात जावे, त्याची वात पेटवावी आणि आता मोठ्ठा धमाका होणार या अपेक्षेने स्वतःचेच कान घट्ट झाकून घ्यावेत, बराच वेळ झाला तरी अपेक्षित धमाका होऊच नये आणि अ‍ॅटम बॉम्बला लावलेली वात आतल्या दारूपर्यंत पोहोचण्याआधीच विझून गेलेली असावी, अशा वेळी होणारा हिरमोडही अनेकांनी लहानपणी अनुभवलेला असतो. असे न वाजलेले फटाके गोळा करून त्यांना दुसऱ्या फटाक्यांच्या वाती लावून पुन्हा वाजविण्याचा प्रयत्नही अनेकांनी केलेला असतो. एका फटाक्याला दुसरी वात लावून तो पुन्हा वाजविण्याचे तंत्र जमले की होणारा आनंद मूळ वातीच्या फटाक्यातून निघणाऱ्या आवाजाहूनही अधिक असतो. पण मोठ्या उत्साहाने पेटविलेल्या अ‍ॅटम बॉम्बची वातच विझून जावी आणि अपेक्षित आवाज येण्याआधीच स्वतःचेच कान घट्ट झाकून घेण्याची वेळ आल्यावर अनुभवावा लागणारा हिरमोड मात्र कायम लक्षात राहतो...

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना आता तसाच काहीसा अनुभव येत असावा. आपण अ‍ॅटम बॉम्बचा धमाका उडविणार असा गाजावाजा करत त्यांनी उभ्या पक्षाला कामाला लावले. एकच अ‍ॅटम बॉम्ब तयार करण्यासाठी त्यामध्ये फटाक्याची दारू भरण्याकरिता पक्षसंघटना कामाला लागली. त्यांच्या अपेक्षेनुसार एक अ‍ॅटम बॉम्ब तयारही झाला आणि मोठ्या उत्साहाने हा बॉम्ब हातात घेऊन ते मैदानात उतरले. दोन दिवसांपूर्वी, गुरुवारी जाहीर पत्रकार परिषद घेऊन माध्यमांच्या साक्षीने त्यांनी या अ‍ॅटम बॉम्बची वातदेखील पेटविली आणि आता मोठ्ठा धमाका होणार हे सांगत स्वतःचेच कान घट्ट झाकूनही घेतले. हे करताना ते अत्यंत गंभीर होते. आपण पेटविणार असलेल्या अ‍ॅटम बॉम्बच्या स्फोटात निवडणूक आयोग नावाच्या यंत्रणेची मोठी हानी होणार असे त्यांना खात्रीपूर्वक वाटतही होते. त्यामुळेच, निवडणुकांत झालेल्या मतांच्या चोरीचा मुद्दा अधोरेखित करत त्यांनी काही निरीक्षण माध्यमांसमोर मांडले, पण माध्यमांच्या काही प्रतिनिधींच्या चेहऱ्यावर मात्र त्यांना अपेक्षित असलेल्या गांभीर्याचा आवदेखील दिसत नव्हता. उलट, राहुल गांधींच्या काही कथित गौप्यस्फोटांनंतर काही प्रतिनिधी चक्क हसत होते. हे पाहून राहुल गांधींना थोडासा रागदेखील आला असावा. मोठ्या अपेक्षेने अ‍ॅटम बॉम्बची वात पेटवावी, हाताने कान घट्ट झाकून घ्यावे आणि बॉम्बची वात विझून गेल्याने आवाजही येऊच नये, असे झाल्यावर लहान मुलांना जे वाटते, तसेच काहीसे त्यांनाही झाले असावे. राहुल गांधी यांचा तो अ‍ॅटम बॉम्ब अपेक्षेप्रमाणे वाजला असता, तर निवडणूक आयोगासह सर्वांचेच धाबे दणाणले असते. पत्रकार परिषदेत माध्यमांसमोर केलेला हाच आरोप प्रतिज्ञापत्राद्वारे स्वाक्षरी करून आयोगाकडे दाखल करा असे निवडणूक आयोगाचे आव्हान स्वीकारून या आरोपाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी त्यांनी गांभीर्याने पुढाकार घेतला असता, तर राहुल यांच्या अपेक्षेप्रमाणे निवडणूक आयोगाचे धाबे दणाणलेही असते. पण अद्याप तरी राहुल गांधी यांनी ते आव्हान स्वीकारलेले नाही. आपण संसदेत संविधानाची शपथ घेतलेली आहे, त्यामुळे पुन्हा शपथपत्र देण्याची गरज नाही असा हेका त्यांनी लावला आणि राहुल गांधी ज्या आवेशात आरोपांच्या माळा लावतात, तो आवेशच नंतर फुसका ठरतो हे पुन्हा एकदा दिसू लागल्याने त्यांचा हा नवा बॉम्बदेखील अगोदरच्या अनेक फुसक्या फटाक्यांप्रमाणेच निकामी ठरण्याचीच शक्यता जास्त आहे. याआधीही, २०१९ च्या निवडणुकीत मतचोरीचा फटका बसल्याचा कांगावा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी केल्यावर, राहुल गांधींसमवेत चर्चा करण्याची तयारी दाखवून, निवडणूक आयोगाने त्यांना निमंत्रित केले होते, पण राहुल गांधींनी त्या बैठकीस हजर राहणे टाळले होते. आता प्रतिज्ञापत्राद्वारे आरोप दाखल करण्याचे आयोगाचे आव्हान स्वीकारले नाही तर माफी मागा असेही आयोगाने बजावले आहे. राहुल गांधी हे आव्हान स्वीकारतात, माफी मागतात की आपला जुनाच हेका सुरू ठेवतात हे स्पष्ट होईल तेव्हा त्यांच्या आजवरच्या बेफाम आरोपांप्रमाणेच या आरोपाचे पितळही उघडे पडते किंवा कसे ते स्पष्ट होईल.

राहुल गांधी यांची गुरुवारची पत्रकार परिषद ऐतिहासिक वगैरे ठरल्याच्या भावनेने काँग्रेसजनांत उत्साहाचे भरते आहे. ते साहजिकही आहे. पक्षश्रेष्ठींच्या सुरात सूर मिसळण्याच्या काँग्रेसी परंपरेस ते साजेसेही आहे. काँग्रेसमध्ये टिकून राहावयाचे असेल गांधी घराण्यासमोर गुडघे टेकावेच लागतात, हा पक्षातील अलिखित आणि बंधनकारक असा नियम असल्याचे वारंवार स्पष्ट झाले आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांच्यासारखा एखादा नेता त्यास अपवाद ठरण्याचा प्रयत्न करतो, पण पहिले शब्द हवेत विरण्याआधीच या नियमाचे पालन करण्याकरिता सिद्ध होतो, हेही अलिकडेच स्पष्ट झाले आहे. गेल्या महिन्याच्या अखेरीस, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी आणि काँग्रेसच्या तेलंगणाच्या प्रभारी मीनाक्षी नटराजन् यांच्यातील सुप्त संघर्षाला तोंड फुटले आणि रेड्डी यांनी राहुल गांधी यांचा थेट नामोल्लेख टाळून त्यांच्या नेतृत्वावरच प्रश्नचिन्ह उमटविले. पक्षाने मीनाक्षी नटराजन् यांच्या पदयात्रेचा कार्यक्रम ९ ऑगस्टपासून राज्यात आयोजित केला होता. पण गेल्या बुधवारी रेवंथ रेड्डींच्या निवासस्थानी मीनाक्षी नटराजन् यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत वादाच्या ठिणग्या उडाल्या आणि रेवंथ रेड्डी यांनी पक्षाच्या परंपरेची चौकट ओलांडून थेट पक्षश्रेष्ठींनाच आव्हान दिले. पक्षश्रेष्ठी



आपल्याला गृहीत धरू शकत नाहीत आणि आपले निर्णय आमच्यावर लादू शकत नाहीत, असा थेट हल्लाच त्यांनी चढविला, तेव्हा हे थेट राहुल गांधींनाच आव्हान आहे, या जाणिवेने पक्षात अस्वस्थता माजली. आजवर कुणीच न केलेले धाडस रेवंथ रेड्डींना भोवणार अशी कुजबूजही पक्षात सुरू झाली, पण रेड्डींनी त्यालाही उत्तर दिले. आपल्या नेतृत्वावर पक्षश्रेष्ठी नाराज असतील तर त्यांनी खुशाल आपल्याऐवजी अन्य कोणास नियुक्त करावे असा पवित्रा त्यांनी घेतला. पक्षातून बाहेर पडणाऱ्या काही नेत्यांनी राहुल गांधींच्या नेतृत्वक्षमतेवर प्रश्नचिन्हे उमटविलीही असतील, पण पक्षात राहून पक्षश्रेष्ठींवर प्रश्नचिन्हे उमटविणाऱ्या रेड्डींच्या या पवित्र्याने पक्षात खळबळ माजलेली असतानाच, निवडणूक आयोगाला दिलेल्या आव्हानाचा अ‍ॅटम बॉम्ब फुसका निघाला तर कसे होणार या भीतीने त्या अस्वस्थतेत नवी भर पडली आहे.

राहुल गांधी यांची अवस्था भ्रमविचारात गुरफटलेल्या मुन्नाभाई एमबीबीएसप्रमाणे झाली असल्याने सत्य स्वीकारण्याची त्यांची मानसिकता नाही, अशा शब्दांत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या त्या कथित अ‍ॅटम बॉम्ब पत्रकार परिषदेची खिल्ली उडविली आहे. महाराष्ट्रात २०२४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांदरम्यानच्या पाच महिन्यांत पाच वर्षांहून अधिक मतदारांची नोंदणी झाली, अशा जुन्याच आरोपाचा सनसनाटी पुनरुच्चार राहुल गांधींनी गुरुवारच्या पत्रकार परिषदेत केला होता. फडणवीस यांनी एका जाहीर मुलाखतीत त्याचा पुन्हा एकदा खरपूस समाचार घेतला. गेल्या डिसेंबरातच निवडणूक आयोगाने या आरोपावर स्पष्ट उत्तर दिले होते. या कालावधीत ४० लाख मतदार वाढले, आणि नऊ लाख मतदार कमी झाले हे खरे आहे, पण फडणवीस यांनी मांडलेला मतदार नोंदणी प्रक्रियेचा तपशील ध्यानात घ्यावयास हवा. लोकसभा व विधानसभा निवडणुकांत मतदारांची नोंदणी नेहमीच वाढते, हा त्यांचा दावा सिद्ध करणारी आकडेवारी निवडणूक आयोगाच्या माहितीजालावर उपलब्ध आहे. २००९ मध्ये महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकीत ७.२९ कोटी मतदारांची नोंदणी होती. विधानसभा निवडणुकीपर्यंत त्यामध्ये सुमारे २९ लाख मतदारांची भर पडल्याचे आयोगाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले. २०१४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीदरम्यान सुमारे ४३ लाख मतदारांची भर पडली, २०१९ मध्ये याच कालावधीत सुमारे १३ लाखांची तर २०१४ मध्ये ४० लाखांची भर पडली होती. यापैकी २००९, २०१४ च्या निवडणुकांत काँग्रेस सत्तेवर होती, हा इतिहास टाळून राहुल गांधींनी गुरुवारची अ‍ॅटम बॉम्ब पत्रकार परिषद गाजविली. कदाचित त्यामुळेच, माध्यमांच्या प्रतिनिधींनी त्या वेळी ही आकडेवारी हसण्यावारी नेली असावी. फडणवीस यांनी राहुल गांधींच्या या आरोपांच्या फैरींवर नोंदविलेला आक्षेप गंभीर आहे. या देशात शहरी नक्षलवाद फोफावला आहे आणि देशातील यंत्रणांच्या विरोधात लोकांच्या मनात अविश्वास पेरण्यासाठी शहरी नक्षलवाद कार्यरत असतो, असे फडणवीस म्हणाले आणि त्यांनी या प्रयत्नांच्या गंभीर परिणामांचा इशाराही दिला. अराजकवादी शक्ती देशातील यंत्रणा खिळखिळ्या करून लोकांच्या मनात या यंत्रणांविषयी अविश्वास पेरत असून अशा शक्तींना बळ देण्याचे काम राहुल गांधी करत आहेत, असा थेट आरोप फडणवीस यांनी या मुलाखतीत केला. सत्ताधारी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जनमानसातील प्रतिमा हेच त्यांच्या लोकप्रियतेचे गमक असून मोदींचे प्रतिमाभंजन करणे हाच आपल्या पक्षाचा एककलमी कार्यक्रम राहील असे वक्तव्य २०१९ च्या निवडणुकीदरम्यान एकदा राहुल गांधींनी जाहीरपणे केले होते. आजही त्याच कार्यक्रमाचा पुढचा टप्पा गाठण्याची ही धडपड राहुल गांधींबरोबरच पक्षालाही अडचणीत आणणार या शंकेने काँग्रेसमधील अनेक नेत्यांमध्ये अस्वस्थता आहे, पण गांधी घराण्याच्या विरोधात थेट किंवा अप्रत्यक्षपणेदेखील बोलावयाचे नाही हा अलिखित नियम अनेकांच्या अस्वस्थतेला वाट करून देण्यात अडसर ठरत आहे.

अ‍ॅटम बॉम्बचा धमाका उडविण्याच्या आवेशात मैदानात उतरायचे आणि ऐनवेळी बॉम्बच फुसका निघावा हा राहुल गांधीच्या बाबतीत काँग्रेसला येणारा हा काही पहिलाच अनुभव नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरील राहुल गांधींच्या वक्तव्यांवरही न्यायालयाने राहुल गांधींना सज्जड समज दिली होती. यापुढे असे वक्तव्य केल्यास स्वतःहून त्याची दखल घेऊन कारवाई केली जाईल, असेही न्यायालयाने बजावले होते. मोदी आडनावावरून राहुल गांधी यांनी जाहीरपणे केलेल्या वक्तव्यावरही न्यायालयाने आक्षेप घेतला होता. सार्वजनिक जीवनात सक्रिय असलेल्या व्यक्तीने अशी बेलगाम वक्तव्ये करताना सावध राहावयास हवे, अशा कानपिचक्याही त्यांना दिल्या होत्या. अगदी अलिकडेच, सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींची चांगलीच कानउघाडणी केली होती. चीनने भारताचा भूभाग गिळल्याचा बेछूट आरोप राहुल गांधी वारंवार करतच असतात. अनेकदा या भूभागाचे क्षेत्र त्यांच्या मनाप्रमाणे बदलतही असते. त्यांच्या भारत जोडो यात्रेदरम्यान गांधी यांनी भारतीय सैन्याबद्दल केलेल्या एका कथित वादग्रस्त टिप्पणीवरून लखनऊ न्यायालयातील कार्यवाहीस स्थगिती देण्याच्या याचिकेवर सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींना कानपिचक्या दिल्यानंतर काँग्रेसची अवस्था केविलवाणी झाली होती. चीनने भारताचा भूभाग गिळल्याच्या आरोपाबाबत काही विश्वासार्ह पुरावे हाती नसताना बेजबाबदार वक्तव्ये कशी करता, असा स्पष्ट सवाल न्यायालयाने राहुल गांधींना केला आणि या आरोपाचा अ‍ॅटम बॉम्बदेखील फुसका ठरला.

लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात शुक्रवारी, ८ ऑगस्ट रोजी प्रश्नोत्तराच्या कामकाजादरम्यान, चीनने भारताचा किती भूभाग अनधिकृतरीत्या बळकावला आहे आणि तो नेमका कोणत्या काळात बळकावला आहे याची अधिकृत माहिती सरकारकडून दिली गेली. १९६२ च्या युद्धात चीनने भारताचा किती भूभाग ताब्यात घेतला, याबाबत संसद सदस्य राव राजेंद्र सिंह यांनी विचारलेल्या प्रश्नावरील उत्तरात सरकारतर्फे दिल्या गेलेल्या माहितीनुसार, १९६२ च्या युद्धकाळात चीनने भारताच्या सुमारे ३८ हजार चौरस किलोमीटर क्षेत्रावर अवैधपणे ताबा मिळविला आहे. चीनसोबतच्या सीमावादाचा तोडगा काढण्यासाठी गेल्या अनेक वर्षांत अनेकदा प्रयत्न झाले. जून १९८१ मध्ये चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या भारत भेटीदरम्यान या मुद्द्यावर चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या होत्या. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या डिसेंबर १९८८ मधील चीन भेटीदरम्यान वादग्रस्त सीमाप्रश्नावर तोडगा काढण्यासाठी द्विपक्षीय कृतिगट स्थापन करण्याचे उभय बाजूंनी जाहीर केले होते. त्यानंतर २००५ पर्यंत या कृतिगटाच्या तब्बल १५ बैठका झाल्या होत्या. अटलबिहारी वाजपेयी यांनी जून २००३ मध्ये चीनच्या अधिकृत दौऱ्यातही हा मुद्दा उचलून धरला होता व दोन्ही बाजूंच्या विशेष प्रतिनिधींनी यावरील तोडग्याचे मार्ग पडताळून सीमावाद संपुष्टात आणण्याच्या दिशेने पावले टाकावीत असेही ठरले होते. यासंदर्भातील अलिकडची अखेरची चर्चा बैठक १८ डिसेंबर २०२४ रोजी झाली होती, असे या उत्तरात स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे गलवान संघर्षादरम्यान चीनने भारताचा भूभाग बळकावल्याच्या राहुल गांधी यांच्या आरोपास कोणताही सबळ आधार नाही, हे सरकारच्या या उत्तरातून स्पष्ट झाले आहे.

सार्वजनिक मंचावर सनसनाटी आरोप करून सरकारविरुद्ध आणि सरकारी यंत्रणांविरुद्ध समाजामध्ये संशयाचे वातावरण निर्माण करण्याची एक सूत्रबद्ध कार्यपद्धती कामाला लागलेली आहे आणि राहुल गांधी यांच्यासारख्या जबाबदार संवैधानिक पदावरील नेत्याच्या वक्तव्यातून त्यास बळ मिळते आहे, असा थेट आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. अशा आरोपांतून राहुल गांधी यांच्या प्रतिमेभोवती गैरसमज आणि संशयाचे धुके पसरणार असून ते टाळावयाचे असेल तर सज्जड पुराव्यांसह जनतेसमोर जाणे योग्य ठरते. सरकार आणि स्वायत्त संस्थांच्या विरोधातील आरोपांची शहानिशा करण्याची एक विहित कार्यपद्धती असते. संविधानाने त्या कार्यपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. संविधानाची हमी देत या कार्यपद्धतीस नाकारून राहुल गांधी बेछूट वक्तव्ये करत असतील, तर त्यातील गांभीर्य नाहीसे होईल व राहुल म्हणजे केवळ हूल आहे, असाच लोकांचा समज दृढ होत जाईल. असे होऊ नये सासाठी काँग्रेसने काळजी घ्यायला हवी. ▮▮

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### उपेक्षितांच्या सन्मानाचा 'भटके विमुक्त दिवस'

१८७१ साली ब्रिटिश शासनाने लागू केलेल्या क्रिमिनल ट्राईब्ज अ‍ॅक्ट या अमानवी कायद्याने काही विशिष्ट जातींना गुन्हेगार जाती म्हणून घोषित केले. हा काळा कायदा भारतातील अनेक समुदायांच्या इतिहासातील एक वेदनादायक अध्याय होता. या कायद्यामुळे या जातींमधील हजारो समाजबांधवांना स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात अमानुष अत्याचार सहन करावे लागले, त्यांच्या मूलभूत मानवी हक्कांवर गदा आणली गेली आणि त्यांना सातत्याने उपेक्षा व भेदभावाला सामोरे जावे लागले. त्यांच्यावर असलेला जन्मजात गुन्हेगार हा शिक्का त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला होता, ज्यामुळे त्यांना समाजात सन्मानाने जगणेही दुरापास्त झाले होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही या समाजाला मुख्य प्रवाहात येण्यासाठी बराच संघर्ष करावा लागला. त्यांना न्याय मिळण्यास विलंब झाला आणि त्याचे दीर्घकालीन सामाजिक परिणाम या समाजाला भोगावे लागले. पिढ्यान्‌पिढ्या त्यांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपण सहन करावे लागले. ही एक अशी व्यथा होती जी स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावरही त्यांना ग्रासत होती. परंतु, स्वातंत्र्योत्तर काळात या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नांचे फलित म्हणून, ३१ ऑगस्ट १९५२ रोजी ब्रिटिशकालीन क्रिमिनल ट्राईब्ज अ‍ॅक्ट हा काळा कायदा रद्द करण्यात आला. हा केवळ एक कायद्यातील बदल नव्हता, तर ते एका मोठ्या सामाजिक बदलाचे प्रतीक होते. या कायद्यातून मुक्त झालेल्या जातींना 'विमुक्त जाती' (म्हणजे मुक्त झालेल्या) म्हणून घोषित करण्यात आले. हा दिवस त्यांच्यासाठी एक नवी पहाट घेऊन आला, एक अशी पहाट जिथे त्यांना गुन्हेगार म्हणून नव्हे तर समाजाचे अविभाज्य घटक म्हणून ओळख मिळाली.भटके आणि विमुक्त समाज महाराष्ट्राच्या आणि देशाच्या प्रगतीमध्ये नेहमीच आपले योगदान देत आले आहेत. त्यांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान असो किंवा राष्ट्र उभारणीतील सक्रिय सहभाग असो, त्यांनी आपल्या क्षमता आणि कर्तृत्वाने वेळोवेळी हे सिद्ध केले आहे की ते समाजाचा एक महत्त्वाचा आणि रचनात्मक भाग आहेत. त्यांच्या अदम्य जिद्दीने, कलेने, परिश्रमाने आणि सामाजिक सलोख्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेणे अत्यंत आवश्यक होते. त्यांच्या या योगदानाला योग्य तो सन्मान मिळावा, त्यांच्यावरील ऐतिहासिक अन्यायाची दखल घेतली जावी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक प्रेरणा मिळावी या उद्देशाने गेली पस्तीस वर्षे विविध संघटनांच्या माध्यमातून एक लढाच उभारला गेला होता.

भटके विमुक्त विकास परिषद, भटके विमुक्त कल्याणकारी परिषद, अखिल भारतीय घुमंतु, अर्ध घुमंतू विकास परिषद यांचे मोलाचे प्रयत्न सुरु आहेत.

भटके आणि विमुक्त समाजबांधवांसाठी प्रामुख्याने कार्य करणारे, पद्मश्री दादा ईदाते, पद्मश्री गिरीश प्रभुणे, श्री रेणके, उद्धवराव काळे, डॉ. संजय पुरी, सुनील पवार यासारख्या अनेक कार्यकर्त्यांचे प्रयत्न सार्थकी लागलेत. 'भटके विमुक्त दिवस' साजरा करण्याच्या या ऐतिहासिक पृष्ठभूमीवर, महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करण्यास अधिकृत मान्यता केली आहे. हा शासन निर्णय केवळ एका दिवसाची घोषणा नाही, तर भटक्या विमुक्त समाजाच्या गौरवशाली इतिहासाला, त्यांच्या संघर्षाला आणि राष्ट्र उभारणीतील त्यांच्या योगदानाला दिलेली एक आदरांजली आहे.

महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय भटक्या विमुक्त समाजाला सन्मान देण्यासाठी, त्यांच्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. 'भटके विमुक्त दिवस' हा केवळ एक उत्सव न राहता, तो सामाजिक समानतेचे, न्यायाचे आणि सौहार्दाचे प्रतीक बनावे हीच अपेक्षा! 'सब समाज को लिये साथ में, आगे हैं बढते जाना।' या गीताच्या ओळी यथार्थ ठरविणारे, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रिद्वय आणि संबंधिताचे खूप खूप आभार.

**श्रीकांत तिजारे**/९४२३३८३९६६

●● ●●

### ब्रह्म ऐक्याची उधळण घेऊन श्रींची पालखी परतली



सण दिवाळीचा आला । नामा राऊळाशी गेला ।
हाती धरोनी देवाशी । चला जावुया आपल्या घराशी ।

संत नामदेव मंदिरात गेले आणि पांडुरंगाला हाताशी धरून घरी घेऊन आले त्यावेळी त्यांनी विठ्ठलाला वरील अभंगात आग्रहाची विनवणी केली तशीच अवस्था गजानन माउलींच्या पंढरीच्या वारी निमित्ताने दोन महिन्यांच्या विरहाच्या विवंचनेने शेगावचा भक्त गजाननाला हाताशी धरून आपल्या घरी आणतो.

आनंदाची दिवाळी । घरी बोलवा भक्तमंडळी ।
घालीते मी रांगोळी गजानन माऊली ॥

आषाढीला पायीवारी करत गेलेल्या संत गजाननाच्या पालखीचे शुक्रवारी दोन महिन्यांनंतर संत नगरी शेगावमध्ये आगमन झाले. तेव्हा गेल्या ५६ वर्षांत चार पिढ्यांच्या मनामनातील ज्या भक्तिभावनांचा कल्लोळ होतो, तसाच आजही अत्यानंदाच्या भावना महाराजांच्या शेगावी परत येताना उचंबळून येत होत्या. ब्रह्म ऐक्याचा विराट लोकोत्सव थेट रजत नगरी खामगावला ते संत नगरी शेगाव या वीस किलोमीटरच्या परीघात दृष्टीस पडला जणू संपूर्ण सृष्टीतील प्राणिमात्रांच्या सद्भावना घेऊन पांडुरंगाचे भक्त गजाननाच्या रूपात एकत्रित होऊन तुझ्यात आम्ही आमच्यात तू असा प्रचंड एकात्मतेचा संदेश देऊ न गेला.

तूच आमचा आत्मा! तूच आमचा प्राण! तूच सखा, तूच दाता!

अशा सर्व आध्यात्मिक धर्मग्रंथांचा एकत्रित गोपालकाला म्हणजे संत गजाननाच्या पंढरी वारीचा संत नगरीत आगमनाचा समारोपीय सोहळा असतो.

रात्रीपासूनच आपल्या प्रिय गजानन माउलीला आपल्या घरी आणण्यासाठी शेगावीचा भक्त खामगावपर्यंत जाऊन पोहोचला व पहाटे चार वाजता आपल्या संतनगरी शेगावच्या मालकाला हात धरून विनवणी करून अट्टहासाने आग्रह करून शेगाव नगरीकडे निघाला. प्रचंड महापूर खामगाव ते शेगाव या रस्त्यावर भक्तांचा दिसला. मनामनात लाखोंच्या श्वासाश्वासात एकच हरिनाम गण गण गणात बोते हेच होते श्रावणाच्या अतिशय मन प्रसन्न करणाऱ्या नैसर्गिक वातावरणात निसर्गाने उधळण केलेल्या हिरव्यागार शेतांच्या मधून ही पालखी वारी आपल्या अंतिम टप्प्याकडे म्हणजेच संत नगरीकडे हळूहळू मार्गस्थ झाली आणि एका अत्यंत भक्तिमय वातावरणाची निर्मिती करून गेली.

दुपारी बाराच्या सुमारास पालखीचे आगमन संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या द्वारासमोर झाले. या ठिकाणी सर्व शेगाववासीयांच्या वतीने पालखीचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर पालखी हळूहळू भगवंताचा गजर करत वाटिकेजवळ आली. या ठिकाणी संत गजानन महाराज संस्थान शेगावचे व्यवस्थापकीय विश्वस्त व सर्व मान्यवरांनी संत गजानन महाराजांच्या पालखीचे भागवत धर्म प्रथेप्रमाणे स्वागत केले. ही पालखी हळूहळू मेन रोडने संत गजानन महाराज मंदिरात सायंकाळी सहा वाजता पोचली. या ठिकाणी टाळकरी भक्तांनी अत्यंत देखणी अशी पाऊले खेळून आनंद व्यक्त केला व गजानन महाराजांचा प्रचंड जयघोष करत महाआरती होऊन या दोन महिन्यांच्या सतत रात्रंदिवस मजल दरमजल करत पंढरीला पायी वारी गेलेल्या व पायीच परत आलेल्या पालखीचा आषाढी सोहळा अत्यंत सुखद पद्धतीने पूर्ण झाला.

**नंदू कुळकर्णी**/९४०५७७९१४०

●● ●●

### अमेरिकेच्या टॅरिफ धोरणास भारताचा विरोध

सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत-अमेरिका यांच्यात जे व्यापारयुद्ध भडकले आहे त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका पूर्णतः देशहिताच्या बाजूने आहे. मुळात रशियाकडून तेल खरेदी करण्याच्या भारताच्या धोरणामुळेच ट्रम्प नाराज आहेत. जागतिक व्यापारात आपले महत्त्व, आपला एकाधिकार कमी होऊ नये म्हणून अमेरिकेचा हा जळफळाट होतोय. रशिया हा भारताचा जुना आणि विश्वासू मित्र राहिला आहे. इतिहासाची पाने चाळल्यास भारतासोबत सच्ची मैत्री जोपासणारे राष्ट्र म्हणून रशियाचे नाव घ्यावे लागेल. सर्वप्रथम देशहित हीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका राहिली आहे. रशियासोबतचे व्यापारसंबंध भारताच्या विकासासाठी अनुकूल आहेत त्यामुळे अमेरिकेच्या दबावासमोर देशहिताशी प्रतारणा होणार नाही ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्पष्ट भूमिका आहे. ट्रम्पद्वारे आधी २५ टक्के कर आकारणी केल्यानंतर भारत झुकायला तयार नाही असे दिसताच अतिरिक्त २५ टक्के म्हणजे एकूण ५० टक्के टॅरिफ भारतावर लादला जातोय. आता तर भारताने अमेरिकेला चक्क ठेंगा दाखवलाय.

खरं तर ज्या टॅरिफची दहशत निर्माण करून आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेचा दबदबा निर्माण करण्याचा ट्रम्प यांचा जो प्रयत्न आहे तो आज जरी त्यांना सुखावत असला तरी दीर्घकालीन विचार करता अमेरिकेस तो नुकसानदायी ठरू शकतो. १४० कोटी लोकसंख्या असलेला भारत हा एक विशाल देश आहे, मोठी बाजारपेठ आहे आणि ही एवढी मोठी बाजारपेठ दुर्लक्षित करून चालणार नाही. या व्यापारयुद्धाच्या निमित्ताने महाशक्तीसमोर न झुकणाऱ्या स्वाभिमानी, स्वावलंबी भारताने अमेरिकेस ठेंगा दाखवत संपूर्ण जगास एकप्रकारे संदेशच दिलाय की, देशहितासाठी रशिया सोबतची ही दोस्ती तुटायची नाय... ▮▮

**अखिल देशपांडे**/अकोला

# ट्रम्प यांच्या ५० टक्के टॅरिफचा भारतावर परिणाम : भारत-रशिया-चीन समीकरणाची शक्यता?

## प्रासंगिक

समाधान वाघमारे

डोनाल्ड ट्रम्प यांनी ६ ऑगस्ट २०२५ रोजी भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयात कर (टॅरिफ) लादण्याची घोषणा केली, ज्यामुळे एकूण टॅरिफ ५०% झाला आहे. हा निर्णय भारताच्या रशियन तेल खरेदीमुळे घेण्यात आला आहे, ज्याला ट्रम्प यांनी अमेरिकेच्या हिताविरुद्ध म्हटले आहे. या टॅरिफमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर, विशेषतः औषधे, कापड आणि रत्न-दागिने यासारख्या निर्यातीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. याचबरोबर, यामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील आर्थिक आणि रणनीतिक संबंधांवरही परिणाम होऊ शकतो. पण यामुळे खरंच या तिन्ही देशांमध्ये एक ठोस त्रिपक्षीय समीकरण तयार होईल का? याचा आढावा घेऊया.

**टॅरिफचा आर्थिक परिणाम**

भारताने २०२४ मध्ये अमेरिकेला ६३.५ अब्ज किमतीचा माल निर्यात केला, ज्यामध्ये औषधे, कापड, रत्न-दागिने आणि यंत्रसामग्री यांचा समावेश आहे. ५०% टॅरिफमुळे या निर्यातीची किंमत वाढेल, ज्यामुळे भारतीय उत्पादने अमेरिकन बाजारपेठेत स्पर्धात्मकता गमावू शकतात. यामुळे भारताला पर्यायी बाजारपेठा शोधाव्या लागतील, जसे की युरोप, आशिया किंवा रशिया. भारत सरकारने या टॅरिफला अन्याय्य आणि अवाजवी म्हटले असून, राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी पावले उचलण्याची घोषणा केली आहे. याम ध्ये परस्पर टॅरिफ लादणे किंवा विश्व व्यापार संघटनेत तक्रार दाखल करणे यांचा समावेश असू शकतो.

**भारत-रशिया-चीनः संभाव्य सहकार्य**

ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे भारताला रशिया आणि चीन यांच्याशी व्यापारी संबंध बळकट करण्याची संधी मिळू शकते. भारत आणि रशिया यांच्यात आधीच मजबूत संबंध आहेत, विशेषतः संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रात. रशियाकडून स्वस्त दरात तेल खरेदीमुळे भारताला ऊर्जा सुरक्षेत फायदा झाला आहे. युक्रेन युद्धानंतर रशियावर पाश्चात्य देशांनी लादलेल्या निर्बंधांमुळे रशियाला भारत आणि चीन यांसारख्या देशांवर अवलंबून राहावे लागत आहे. दुसरीकडे, भारत आणि चीन यांच्यात सीमावाद आणि भू-राजकीय तणाव असले तरी, BRICS आणि SCO सारख्या व्यासपीठांवर ते एकत्र काम करतात. ट्रम्प यांनी चीनवर फक्त ३०% टॅरिफ लादला आहे, जो भारतावरील टॅरिफपेक्षा कमी आहे. यामुळे भारताला असे वाटू शकते की त्याला जास्त लक्ष्य केले जात आहे, ज्यामुळे तो रशिया आणि चीन यांच्याशी जवळीक साधण्याचा विचार करू शकतो.

BRICS व्यासपीठावर भारत, रशिया आणि चीन यांच्यात व्यापारी सहकार्य वाढण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ, भारत रशियाकडून तेल खरेदी वाढवू शकतो आणि चीनसोबत व्यापारी करार करू शकतो. रशियाला भारत आणि चीन यांना एकत्र आणण्यात रस आहे, कारण यामुळे पाश्चात्य दबावाला तोंड देण्यासाठी एक मजबूत आर्थिक गट तयार होऊ शकतो.

**समीकरणाच्या मर्यादा**

तरीही, भारत-रशिया-चीन यांच्यात ठोस युती होण्यास अनेक अडथळे आहेत. पहिले म्हणजे, भारत आणि चीन यांच्यातील सीमावाद (उदा. लडाखमधील तणाव) आणि व्यापारी स्पर्धा यामुळे दीर्घकालीन युती अवघड आहे. दुसरे, भारत बहुध्रुवीय धोरण (multi-alignment) अवलंबतो, ज्यामध्ये तो अमेरिका, रशिया, युरोप आणि इतर देशांशी संतुलित संबंध ठेवतो. अमेरिकेशी भारताची रणनीतिक भागीदारी, विशेषतः क्वाड (Quad) आणि संरक्षण क्षेत्रात, खूप महत्त्वाची आहे. त्यामुळे भारत पूर्णपणे रशिया-चीन युतीकडे झुकण्याची शक्यता कमी आहे.

**भारताची रणनीती**

भारताला या टॅरिफच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी बहुआयामी रणनीती अवलंबावी लागेल. पहिल्यांदा, भारत अमेरिकेशी व्यापारी कराराद्वारे हा तणाव कमी करण्याचा प्रयत्न करू शकतो. दुसरे, भारत रशिया आणि इतर देशांसोबत व्यापार वाढवू शकतो, विशेषतः ऊर्जा आणि संरक्षण क्षेत्रात. तिसरे, भारत युरोप आणि आशियाई देशांसारख्या पर्यायी बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करू शकतो. भारताने स्वतःची रणनीतिक स्वायत्तता कायम ठेवली आहे आणि भविष्यातही ती कायम ठेवण्याची शक्यता आहे.

**निष्कर्ष**

ट्रम्प यांच्या ५०% टॅरिफमुळे भारताला आर्थिक आव्हानांना सामोरे जावे लागेल, परंतु यामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील व्यापारी सहकार्य वाढण्याची शक्यता आहे. तरीही, भारत-चीनमधील तणाव आणि भारताची बहुध्रुवीय धोरणे यामुळे एक ठोस त्रिपक्षीय समीकरण तयार होण्याची शक्यता कमी आहे. भारत आपली रणनीतिक स्वायत्तता कायम ठेवत, अमेरिकेशी चर्चा करत आणि पर्यायी बाजारपेठा शोधत या संकटावर मात करण्याचा प्रयत्न करेल. या घडामोडींमुळे जागतिक व्यापार आणि भू-राजनीतीत नवे बदल घडू शकतात, ज्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ■■

### रक्षाबंधन; नारी सुरक्षा पर्व

भारतीय संस्कृतीत प्रमुख सणामध्ये रक्षाबंधन हा सण भाऊ-बहिणीचा स्नेह व उत्सवाचे पर्व म्हणून साजरा केला जातो. देशभरात या सणाची वेगवेगळ्या नावाने ओळख आहे. उत्तर भारतात कजरी-पौर्णिमा, पश्चिम भारतातात नारळी पौर्णिमा या नावाने तो साजरा केला जातो. रक्षाबंधन हा संपूर्ण भारतात साजरे होते. इतर सणांपेक्षा हा एक आगळा वेगळा उत्सव आहे. जो उत्सव आपल्यासोबत अखंड प्रेम, उत्साह, स्नेहभाव, संबंधामध्ये मधुरता आणि पावित्र्य घेऊन येतो. या सणाची प्राचीन काळापासून अशी समजूत आहे की, बहीण ही आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्याकडे, प्रत्येक बिकट परिस्थितीत येणाऱ्या समस्यांच्या वेळी मदतीची आणि सहानुभूतीची आशा ठेवते आणि जीवनात कधीही जर बहिणीच्या अब्रूवर किंवा तिच्या जीवनात काहीही संकटे आली तर त्यावेळी तो तिच्यासोबत खंबीरपणे उभा राहील. म्हणूनच तर या उत्सवाचे नाव 'रक्षाबंधन' असे आहे. आपणा सर्वांना माहितीच आहे की, श्रावणी पौर्णिमेच्या या दिवशी बहीण ही आपल्या लाडक्या भावाला राखी बांधते. या दिवशी प्रत्येक बहिणीच्या मनात आपल्या प्रिय भावाबद्दल शुभभावना आणि शुभकामना याचा जणू सागरच उसळत असतो. या वातावरणात सगळीकडे प्रसन्नता आणि प्रफुल्लितपणा जाणवत असतो. सर्वांचे चेहरे आनंदाने चमकत असतात. या उत्सवामुळे जरी भावा-बहिणीमध्ये काही मतभेद झाले असले तरीही या दिवशी सगळी दुःखे, भांडणे विसरून भाऊ-बहीण पुन्हा एकत्र यावे. भारतीय संस्कृतीमधील ही काही क्षणांची परंपरा लहानपणापासूनच एक भाऊ आणि बहीण यांना एका निरागस बंधनामध्ये घट्ट बांधून ठेवते आणि त्यांच हे नातं अतूट आणि परम पवित्र मानले जाते. आजचे आधुनिक तांत्रिक युग आणि माहिती संवादाच्या युगाचा राखीसारख्या सणांवरही परिणाम झाला आहे. आजकाल बरेच भारतीय परदेशात किंवा देशातील अन्यत्र भागांत राहतात आणि त्यांचे कुटुंबीय (भाऊ आणि बहीण) अजूनही भारतात किंवा इतर देशांमध्ये आहेत. इंटरनेटच्या आगमनानंतर, अनेक ई-कॉमर्स साईट उघडल्या आहेत, ज्या ऑनलाईन ऑर्डर घेतात आणि दिलेल्या पत्त्यावर पोहोचवतात. अशाप्रकारे, आजच्या आधुनिक विकासामुळे, दूरवर राहणारे बंधू आणि भगिनी, ज्यांना राखीवर भेटता येत नाही, त्यांनी आधुनिक पद्धतीने एकमेकांना पाहून आणि बोलून हा सण साजरा करतात. ▮▮

**पवनकुमार लड्ढा**/९४२१४९४८१२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादकः प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयात प्राणिशास्त्र व मत्स्यशास्त्र विभागातर्फे जैवविविधता व तिचे संरक्षण या विषयावर वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेत बी.एस्सी.पदवी व एम.एस्सी. पद्व्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

सदरील स्पर्धेत वैभवी कुलकर्णी व शेख सानिया या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक मिळविला, तर सुमैया शेख व भिसे संजना या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक मिळविला.भुरे ऋतुजा या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक मिळविला.


सदरील वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा घेण्यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व विभाग प्रमुख डॉ.आर.व्ही.सोळुंके यांचेही मार्गदर्शन लाभले.या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.शितल पाटील व प्रा.अश्विनी कांबळे यांनी काम पाहिले. यावेळी डॉ. रत्ना कीर्तने, डॉ.सुरज कोल्हे, डॉ.अमोल ठोसर, प्रा.शिलेश गावित,प्रा.प्रतिका धरणे, प्रा.आगलावे मनाली, बालाजी चित्ते,गोविंद सांगवे,नाना काळुंखे, सुजित अपसिंगेकर यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.





## संक्षिप्त वृत्त...

### जिल्ह्यात राखी पौर्णिमा उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** लातूर जिल्ह्यातील सर्वत्र बहिण - भावाच्या पवित्र नातेसंबध जपणारा राखी पौर्णिमा सण उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी बहिण आपल्या भावाला राखी बांधून त्याला दिर्घ आयुष्य मागते. शनिवारी सर्वत्र हा सण उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

### श्री काशी विश्वेश्वर मंदिरात संगीतमय शिवकथेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** शहरातील विशालनगर येथील श्री काशी विश्वेश्वर मंदिरात जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी व जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रेरणेने आणि शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज, औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली १० ते १७ ऑगस्ट या कालावधीत संगीतमय शिवकथा होणार आहे.

अमृतेश्वर शिवाचार्य महाराज, जिंतूरकर हे दररोज दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत शिवकथा सादर करणार आहेत. या संगीतमय शिवकथेत गायक दीपक महाराज, तबलावादक दत्त महाराज व सिल वादक श्रीधर महाराज हे साथ देणार आहेत. या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज पहाटे ५.३० ते सकाळी ७ या वेळेत रुद्राभिषेक, सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत परमरहस्य पारायण होणार आहे. रविवार, १७ ऑगस्ट रोजी श्री काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात या शिवकथेचा समारोप होणार आहे. दुपारी १ ते ४ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या संगीतमय शिवकथेचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री काशी विश्वेश्वर मंदिर देवस्थान समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

### कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात एस.आर. रंगनाथन यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे ग्रंथालय शास्त्राचे जनक एस.आर. रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ग्रंथपाल डॉ. महावीर कटके यांनी रंगनाथन यांच्या जीवनचरित्र आणि कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी स्टाफ सचिव प्रा. चंद्रकांत मोरे, डॉ.शाहूराज मुळे, डॉ.नरेंद्र देशमुख, डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ.कांतराव पोले, प्रा.हरिहर गायके, डॉ. अभिजीत बादाडे, डॉ.अंगद कोते, डॉ.अजित भांजी, डॉ. रणजित जाधव, प्रा.संदिपान चेवले, प्रा.महारूद्र बिडवे, प्रा. विवेक गोस्वामी, डॉ.वैशाली माढेकर, डॉ.जयदेवी पवार, प्रा.नंदा खरटमल, प्रा.शितल खोत, डॉ माधव गायकवाड, डॉ पांडूरंग मुंढे यांची उपस्थिती होती.

### कांचनताई जवळगेकर यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील सेवानिवृत्त मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवाजीराव जवळगेकर यांच्या पत्नी सौ. कांचनताई जवळगेकर यांचे ८ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता हृदयविकाराच्या धक्क्याने लातूरच्या गॅलॅक्सी हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्या ६४ वर्षाच्या होत्या.



त्यांच्या पश्चात पती, दोन मुली एक डॉक्टर व एक शिक्षिका, एक मुलगा असा परिवार आहे. कांचनताई जवळगेकर ह्या हरंगुळ बु. येथील जि. प. शाळेवर केंद्र प्रमुख म्हणून सेवा करून निवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पाच वाजता लातूर येथील खाडगाव स्मशानभूमी येथे विधिवत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## ‘त्या’ टोळीकडून २५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** नागरिकांच्या सतर्कतेमुळे औसा व भादा पोलिसांनी ३ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास अटक केलेल्या दरोड्याच्या तयारीत असलेल्या बीड जिल्ह्यातील पाचजणांच्या अट्टल दरोडेखोरांच्या टोळीला घातक शस्त्रासह अटक केली होती. तपासादरम्यान, त्यांच्याकडून चोरीचा २४ लाख ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, यातून ९ गुन्ह्यांची उकल झाली आहे. या टोळीतील अन्य एका आरोपीलाही अटक करण्यात आली आहे.



औसा तालुक्यातील शिवली मोड व सिंदाळा येथे एक चारचाकी मालवाहू वाहन संशयितरित्या औसा-तूळजापूर रोडवर फिरत आहे, अशी माहिती मिळाल्याने ३ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास औसा व भादा ठाण्याच्या रात्रग्रस्तवरील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदारांनी सदरचे संशयित वाहन नागरिकांच्या मदतीने शिवली मोड परिसरातून ताब्यात घेतले. यावेळी अंधाराचा फायदा घेऊन तीन आरोपी पळून गेले. तर रिहान मुस्तफा शेख, अन्वरखॉ जलालखॉ पठाण (दोघेही रा. गौतमनगर, परळी, जि. बीड), हाफिज मुमताजोद्दीन शेख (रा. आझादनगर, परळी, जि.बीड), सादेक मोहम्मद यासिन मोहम्मद (रा. जुना बाजार, बीड) आणि फारुख नबी शेख (रा. बार्शी नाका, बीड) यांना अटक केली. आरोपींच्या ताब्यातील चारचाकी मालवाहू अशोक लिलँड टेम्पोची (एमएच ४४ यू ३२९८) झडती घेतली असता, त्यामध्ये दरोड्यासाठी लागणारा एक लोखंडी कोयता, एक धारदार चाकू, दोन लाकडी दांडके, एक लोखंडी पहार, दोन लोखंडी कटावणी, तीन बनावट रेडीयमचे वाहनांचे नंबर प्लेट, एक टेम्पो व चार मोबाइल आदी एकूण ७ लाख ७१ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.

न्यायालयाने या आरोपींना दहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान, आरोपींनी लातूर जिल्ह्यातील औसा, किल्लारी, भादा, रेणापूर, चाकूर, अहमदपूर तसेच शेजारील राज्यांमध्ये घरफोडीचे गुन्हे केल्याचे कबूल केले. आरोपींकडून चोरलेला २४ लाख ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, यातून ९ गुन्ह्यांची उकल झाली आहे. या टोळीतील फरार आरोपी समीर शमशुद्दीन शेख (रा. मोमीनपुरा, खाजानगर, बीड) याला अटक करण्यात आली असून, अन्य दोघांचा पोलीस शोध घेत आहेत.

## बसच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** तालुक्यातील गाधवड येथील फिर्यादी मोहम्मद जाफर तालीम हुसेन व त्यांचा चुलत भाऊ मोहम्मद सादीक हे दुचाकी (एम.एच. २४, ए.एन. ५६९०) वरुन मुरूडहून गाधवडकडे निघाले होते.

ते करकट्टा पाटीजवळ आले असता समोरून येणाऱ्या बस (एमएच २४, एव्ही ७७३३) चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून दुचाकीस धडक दिली. या अपघातात फिर्यादी व फिर्यादीचा चुलत भाऊ गंभीर जखमी झाले. याप्रकरणी मुरुड पोलिस ठाण्यात शुक्रवारी बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोहेकॉ. बोईनवाड हे करीत आहेत.

## शेळ्या चारण्यावरून बाप-लेकाला काठीने मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** सोयाबीनच्या पिकात शेळ्या चारण्याच्या कारणावरून तिघांनी बाप-लेकास काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना उमरगा हा. येथे घडली. याप्रकरणी निलंगा पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, निलंगा तालुक्यातील उमरगा हा. येथील ज्ञानोबा ममाळे व अन्य दोघांनी संगनमत केले. त्यांनी फिर्यादी गोविंद देवराव जाधव (रा. मुबारकपूर तांडा, ता. निलंगा) यांच्यासोबत सोयाबीनच्या पिकात शेळ्या चारण्याच्या कारणावरून तक्रार करण्यास सुरुवात केली. दरम्यान, आरोपींनी फिर्यादी व फिर्यादीच्या मुलास शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी, काठीने मारहाण केली. तुम्ही जर पुन्हा आमच्या नादाला लागलात तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी गोविंद जाधव यांच्या फिर्यादीवरून निलंगा पोलिस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पो.हे.कॉ. शिंदाळकर हे करीत आहेत

## हेमंत रामढवे यांचा जालना येथे सन्मान



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** रोटरी परिवाराचा सामाजिक कार्यात हिरीरीने सहभाग राहत असतो, ही बाब सर्वज्ञात आहेच. जालना येथे नुकत्याच पार पडलेल्या रोटरी परिवाराच्या आनंद उत्सव सोहळ्यात लातूर रोटरी परिवारातील रो. हेमंत रामढवे यांचा सन २०२४ - २५ शाळांचा डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये उत्कृष्ट असिस्टंट गव्हर्नर म्हणून सन्मान करण्यात आला.

रोटरीचे डीजे डॉ. सुरेश साबू यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन हेमंत रामढवे यांच्या कार्याचा, संघटन कौशल्याचा गौरव करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना हेमंत रामढवे यांनी रोटरी परिवाराच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याकामी लातूरचा नेहमीच सिंहाचा वाटा राहिला आहे. समाजोपयोगी उपक्रमासोबतच गरजूंच्या मदतीसाठीही रोटरी परिवाराचे योगदान नेहमीच अतुलनीय असे राहत आले आहे व भविष्यातही रोटरी परिवार सतत विविध सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवेल ,असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे, लक्ष्मीकांत गौड, गिरीश ब्याळे, मिलिंद आंबेकर, मेहुल कामदार, राजगोपाल मुंदडा, स्वामी, मुंडे , साहेबराव मोरे, गिरीश गारटे यांसह मान्यवरांची उपस्थिती होती. या सर्वांचा या आनंद उत्सवात उत्कृष्ट कार्याबद्द्ल सन्मान व गौरव करण्यात आला.

## थकीत कर एकरकमी भरल्यास व्याजात शंभर टक्के सवलत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** रक्षाबंधन व स्वातंत्र्य दिनानिमित्त महापालिकेच्यावतीने मालमत्ता करावर सवलतीची योजना जाहीर करण्यात आली आहे. ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत आपल्याकडील थकीत कर एकरकमी भरल्यास आकारण्यात आलेल्या व्याज, शास्तीत शंभर टक्के सूट देण्यात येत आहे.

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने वर्षाच्या सुरुवातीपासून मालमत्ताधारकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारची सूट योजनाही लागू केली होती. त्याचा १७हजारांहून अधिक जणांनी लाभ घेतला. अद्यापही काही थकबाकीदारांनी कर भरणा केला नाही. थकबाकी धारकांसाठी मनपाने रक्षाबंधन व स्वातंत्र्य दिनानिमित्त विशेष योजना लागू केली आहे. या योजनेचा मालमत्ताधारकांनी लाभ घेऊन आपल्याकडील देय कराचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मानसी यांनी केले आहे.

## ‘केशवराज’च्या विद्यार्थिनींचे अनोखे रक्षाबंधन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाच्या विस्तार सेवा कार्य समिती अंतर्गत शनिवारी रक्षाबंधनाचे औचित्य साधून शहरातील पोलीस कर्मचारी, रुग्णालयातील कर्मचारी, शालेय विद्यार्थ्यांना सोडणाऱ्या वाहनांचे चालक व कामगार यांना त्यांच्या कार्यस्थळी भेट देऊन इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थिनींनी तयार केलेल्या राख्या बांधण्यात आल्या. या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे तसेच पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, पर्यवेक्षक राम जोशी, धनंजय कुलकर्णी व विस्तार सेवा कार्य समिती संस्था प्रमुख जितेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील विस्तार सेवा कार्य समिती प्रमुख नरेंद्र कोष्टगावकर, महादेव गोंदरकर, प्रल्हाद माले, प्रयागराज गरुड, रंजना साकोळे, प्रज्ञा नाईक, कांचन तोडकर, मेघा सूर्यवंशी, रोहित कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.



## अंध - दिव्यांगांना देवदर्शनासाठी अर्थसहाय्य

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने अंध व दिव्यांग व्यक्तींना देवदर्शन सहलीसाठी पंधरा हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले.

यात्रा आणि देवदर्शन करण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला आहे. श्रावण मासाचे औचित्य साधून अनेक मंडळी विविध धार्मिक स्थळांना भेटी देऊन दर्शनासोबतच पर्यटनाचाही आनंद घेताना दिसतात. या आनंदापासून अंध आणि दिव्यांग व्यक्ती वंचित राहू नयेत, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने अंध व दिव्यांगांना देवदर्शन सहलीसाठी पंधरा हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले. या सहकार्याबद्द्ल अंध - दिव्यांगांनी शतशः ऋण व्यक्त केले आहेत. या प्रसंगी रोटरी क्लब लातूर सेंट्रल च्या वतीने रोटरी क्लबचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे, मेहुल कामदार, राजगोपाल मुंदडा, स्वामी, मुंडे , साहेबराव मोरे, गिरीश गारटे यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

## शहरातील युनिपोल परवाना तत्काळ रद्द करा

### काँग्रेस पक्षाचे महापालिका आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** शहरातील मुख्य रस्त्यांवर लावण्यात आलेल्या महाकाय जाहिरातीच्या युनिपोलमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन अपघात होत असल्याचा आरोप करत, शहर काँग्रेसने या युनिपोलचा परवाना तत्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. नुकताच छत्रपती शाहू महाराज चौकातील एका युनिपोलच्या एका कठड्याला धडकून दुचाकीस्वाराला आपला जीव गमवावा लागला होता. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने महापालिका आयुक्त मानसी मीना यांना निवेदन दिले आहे.



उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार हे युनिपोल लावण्यात आले आहेत का, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. जर युनिपोल उभारणीमध्ये कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित एजन्सीचा परवाना तत्काळ रद्द करावा. शहरात लावलेल्या युनिपोलची तपासणी करावी. हे युनिपोल उभारताना प्रशासनाच्या नियमांचे पालन झालेले नाही. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. तसेच, जड वाहनांच्या धडकेने हे युनिपोल कोसळून नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. शिष्टमंडळाने आयुक्त मानसी मीना यांची भेट घेऊन निवेदन दिले.

या शिष्टमंडळात काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, माजी उपमहापौर कैलास कांबळे, ॲड. फारुक शेख, प्रा. प्रवीण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, डॉ. बालाजी सोळुंके, गोरोबा लोखंडे, तबरेज तांबोळी, नागसेन कामेगावकर, आयुब मणियार, दत्ता सोमवंशी, विजय गायकवाड, राजकुमार कत्ते, गिरीश ब्याळे, विजय गायकवाड, राहुल डुमणे, कुणाल वागज, ॲड. गणेश कांबळे, राजू गवळी, मैनुद्दीन शेख, पिराजी साठे यांच्यासह शहर काँग्रेसचे विविध सेलचे पदाधिकारी, सदस्य सहभागी होते.

## ‘हर घर तिरंगा’ मोहिमेला शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -** नागरिकांत देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढविणे यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार लातूर शहरात ‘हर घर तिरंगा’ मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

भारताच्या राष्ट्रध्वजासोबत वैयक्तिक बंध निर्माण करण्यावर हा उपक्रम आधारित आहे. २०२२ पासून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून राबविली जाणारी ही मोहीम लोक चळवळ बनली आहे. या अंतर्गत लातूर शहरात तीन टप्प्यात विविध उपक्रम होत आहेत. पहिल्या टप्प्यात शुक्रवारी सिध्दार्थ सोसायटीतील बौध्द विहार येथे रांगोळी स्पर्धा पार पडली. एलआयसी कॉलनी येथे रांगोळी स्पर्धा व प्रतिज्ञा तर महापालिकेच्या मुख्यालयात तिरंगा थीमवर आधारित वस्तू प्रदर्शन व विक्री सुरू आहे. दुसऱ्या टप्प्यात सोमवार, ११ रोजी महापालिकेच्या सर्व १६ शाळांमध्ये शिक्षण विभागातर्फे तिरंगा रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तसेच प्रश्नमंजुषा स्पर्धाही होणार आहे. मंगळवार, १२ ऑगस्ट रोजी तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. परिवहन विभागाच्यावतीने आयोजित या रॅलीस भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यापासून प्रारंभहोणार आहे. रि शिवाजी चौक, राजीव गांधी चौक, परत शिवाजी चौक, गांधी चौक, गंजगोलाई, तेथून परत महानगरपालिका कार्यालयात या रॅलीचे विसर्जन होणार आहे. बुधवार, १३ ऑगस्ट रोजी तिसऱ्या टप्प्यात भांडारपाल व शिक्षण विभागाच्यावतीने तिरंगा ट्रिब्यूट आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये स्वातंत्र्यसैनिक व शहीद जवानांचे स्मरण तसेच सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका आयुक्त मानसी मीना यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मातोश्री रमाबाई नगर येथे विविध विकास कामाचे आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते उद्घाटन

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

मातोश्री रमाबाई नगर येथे ऐतिहासिक करुणा बुद्ध विहार इथे विविध विकास कामाचा उद्घाटन जालन्याचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले आहे यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख पंडित भुतेकर शहरप्रमुख विष्णू पाचफुले, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते,दिनकर घेवंदे, नगरसेवक निखिल पगारे, संजय डुकरे पाटील , आदींची उपस्थिती होती. यावेळी जालनाचा विकासासाठी शिवसेना पक्षाच्या वतीने येणाऱ्या मनपि निवडणूक मध्ये *विष्णू पाचफुले पहिले महापौर* पदाचे उमेदवार म्हणून राहणार आहेत. दिवाळीनंतर जालनेकरांना रोज पाणी देण्याची जबाबदारी आमची आहेअसुन यासंदर्भात काम सुरु आहे. असे प्रतिपादन आमदार खोतकर यांनी केले आहे. येणाऱ्या जालना महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेचा झेंडा फडकणार आहे. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या ओट्याचे सुशोभीकरण, रंगरंगोटी, झाडे लागवड, खुले सभागृह अशा विविध विकास कामाचं उद्घाटन आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन दिनकर घेवंदे यांनी केले होते. यावेळी शंकरराव घेवंदे, विनोद खरात, कैलास सराफ, संजय डुकरे, लक्ष्मण साबळे, अजमद भाई, रहमान भाई दीपा म्हस्के, ज्योती घेवंदे, ज्योती जाधव,सिंधू खरात, लक्ष्मी सरकटे, माया घेवंदे, मंगल बनकर, वैशाली बनसोडे, सनी घेवंदे, शुभम घेवंदे, अभिषेक घेवंदे आदींसह स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जालना नांदेड समृद्धी महामार्गासाठी गेल्या शंभर दिवसापासून देवमूर्ती येथे आंदोलन सुरू आहे या आंदोलनासाठी व जालना शहराच्या महात्मा फुले मार्केट पुनर्बांधणी ,जालना सिडको, शहरातील झोपडपट्टी धारकांना पि. आर. कार्ड देणे बाबत आमदार अर्जुनराव



खोतकर यांनी तीन दिवसापूर्वी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महसूल मंत्री

## जालना नांदेड समृद्धी महामार्ग व महात्मा फुले मार्केट पुनर्बांधणी संदर्भात मंगळवारी होणार बैठक – आ. अर्जुनराव खोतकर

चंद्रशेखर बावनकुळे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती .मात्र काही कारणास्तव ही बैठक रद्द करण्यात आली होती .आता सदरील बैठक कॅबिनेटच्या दिवशी दिनांक १२/०८/२०२५ रोजी मंगळवारी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे ,महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार अर्जुनराव खोतकर व सर्व संबंधित अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक मंत्रालय मुंबई आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला जालना नांदेड समृद्धी महामार्गाचे शेतकरी आंदोलक दिलीप राठी यासह शेतकरी व्यापारी उपस्थित राहणार आहे, यानंतर बैठक होणार नाही अशी माहिती आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली आहे ३५ हजार मताने मी निवडून आलोय जालन्याच्या जनतेचा मूड आम्हाला माहिती आहे असा टोला आमदार अर्जुन खोतकर यांनी माजी आ. कैलास गोरंट्याल यांच्यावर लगावला आहे. महानगरपालिका ताब्यात घेण्यासाठी लोकशाहीमध्ये बोलण्याचा अधिकार आहे आमदार खोतकर यांनी दिली आहे यावेळी शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले शिवसेना संपर्कप्रमुख पंडित भुतेकर दिनकर घेवंदे या सह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मैनपुरी आग्रा विभाग राज्य उत्तर प्रदेश येथुन १६ वर्ष अल्पवयीन मुलीस पळवणा- या दोन आरोपींना चंदनझिरा पोलीस ठाणे व उत्तर प्रदेश पोलीसांनी ठोकल्या बेड्या



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

पोलीस ठाणे कोतवाली जिल्हा मैनपुरी आग्रा विभाग राज्य उत्तर प्रदेश येथे दिनांक ०९/०७/२०२५ रोजी गु.र.नं.५०६/२०२५ कलम १३७(२), ३७ भा. न्या. संहिता २०२३ नुसार फिर्यादी नामे ध्रुव सिंह लखन सिंह व्यवसाय पोलीस उपनिरीक्षक पोलीस लाईन मैनपुरी राज्य उत्तर प्रदेश यांनी त्यांची अल्पवयीन मुलगी ही आरोपी नामे १) आयाज अन्सांरी २) मक्सुद अन्सांरी ३) फैजान अन्सांरी सर्व रा. गोलाबाजार मैनपुरी यांनी १६ वर्ष अल्पवयीन मुलीस फुस लावुन बळजबरीने पळवुन नेल्याचे गुन्हा दाखल केला होता. आज रोजी उत्तर प्रदेश येथील कोतवाली पोलीस ठाणे व चंदनझिरा पोलीस स्टेशनचे पोउपनि/मारियो स्कॉट व टिम यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शाखाली गुन्ह्याचे गांभिर्य ओळखुन चंदनझिरा भागात बातमीदार नेमुन खात्रीशीर माहिती प्राप्त करुन अत्यंत गुप्त पद्धतीने नियोजनबध्दरित्या आरोपींचा मार्ग काढत गुन्ह्यातील आरोपी नामे १) फैजान मकसूद अन्सांरी २) आयाज मकसूद अन्सांरी रा. गोलाबाजार मैनपुरी राज्य उत्तर प्रदेश यांना चंदनझिरा भागात ताब्यात घेवुन व त्यांच्याकडे गुन्ह्याबाबत सखोल चौकशी करुन पोलीस खाक्या दाखवुन त्यांच्यासोबत फुस लावुन पळवुन आणलेल्या १६ वर्ष वय असलेल्या अल्पवयीन मुलीचाही शोध लावला. पुढील योग्य त्या कायदेशीर कार्यवाही कामी दोन्ही आरोपी व अल्पवयीन मुलीस कोतवाली पोलीस ठाणे मैनपुरीचे पोलीस उपनिरीक्षक दिनेश कुमार यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक अजय बंन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शानाखाली पोलीस ठाणे चंदनझिराचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, पोलीस उपनिरीक्षक मारियो स्कॉट, पोउपनि/रवि देशमाने, पोहेकॉ/राजेंद्र ठाकुर, कृष्णा तंगे, मपोहेकॉ/सिधुं खरजुले, जया जैस्वाल, चालक पोहेकॉ/काकासाहेब बोटवे तसेच कोतवाली पोलीस स्टेशनचे दिनेश कुमार पोलीस उपनिरीक्षक व गिरेंद्र सिंह, शैलंद्र सिंह यांचे टिमने केली.

# बदनापुर येथे औद्योगिक वसाहत स्थापन करावी!

## शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची उद्योग मंत्री सामंत यांच्या कडे मागणी

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

बदनापुर तालुक्यात रोजगार निर्मितीसह विकासाला चालना देण्यासाठी बदनापुर येथे औद्योगिक वसाहत स्थापन करावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी उद्योग मंत्री ना. उदय सामंत यांच्या कडे केली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे शिवसेना पदाधिकारी बैठकीनिमित्त ना. सामंत आले असता जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी उद्योग मंत्र्यांची भेट घेऊन बदनापुर च्या रखडलेल्या औद्योगिक विकासाबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन दिले. यावेळी शिवसेना उपनेते, विधान मंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर, शिवसेनेचे सचिव संजय मोरे, भाऊसाहेब चौधरी, खा. राहुल शेवाळे युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, फेरोजलाला तांबोळी, ॲड. सुनील किनगावकर, ए. जे. बोराडे, ॲड. भास्कर मगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भाऊसाहेब घुगे यांनी बदनापुरचा अनुशेष भरून काढण्या बाबत ना.सामंत यांच्याशी चर्चा करतांना सांगितले की, बदनापुर तालुका निर्माण होऊन ३३ वर्षे उलटली तरी अद्याप ही औद्योगिक वसाहत स्थापन झाली नसल्याने तालुक्यातील युवकांना रोजगारासाठी जालना आणि छत्रपती संभाजी नगर कडे धाव घ्यावी लागते. असे भाऊसाहेब घुगे यांनी उद्योग मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. तथापि बेरोजगारांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध व्हावा तसेच नव उद्योजकांना उद्योग उभे करता यावे यासाठी बदनापुर येथे जलदगतीने औद्योगिक वसाहत स्थापन करावी अशी मागणी भाऊसाहेब घुगे यांनी केली. यावेळी शिवसेनेचे बदनापुर तालुकाध्यक्ष कल्याणराव अवघड ,तालुका संघटक भगवानराव मदन, विधानसभा संघटक कैलास दुधानी युवासेना तालुकाप्रमुख ईश्वर पाटील जुंबड, प्रवीण पाटील फुके, तालुका संघटक अमोल दाभाडे, शहर प्रमुख अंबादास कोळसकर, महिला आघाडी तालुका संघटक छायाताई जऱ्हाड, युवासेना विभाग प्रमुख रामभाऊ दराडे ,सोशल मीडिया प्रमुख देवा ढाकणे आदींची उपस्थिती होती.

# नळगेंच्या नेतृत्वाखाली माजी सरपंचासह अनेकांनी घेतली हाती मशाल !



तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

आज परतुर येथे शिवसेनेचे (उबाठा) गटाचे जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून माजी सरपंचासहित मतदार संघातील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेची मशाल हाती घेत शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश घेतला. महेश नळगे हे जिल्हाप्रमुख झाल्यानंतर परतुरमंठा विधानसभा मतदारसंघाला रोखठोक असा युवा नेता म्हणून मतदार संघातील प्रत्येक मतदार पाहत आहे. जिल्हा प्रमुख महेश नळगे यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांचे घोळके पहायला मिळत आहेत. मतदारसंघातील अनेकजन आपआपली अडीअडचणीत असलेले प्रश्नांचे गाऱ्हाने आता नळगे यांच्याकडे मांडू लागले आहेत. त्यांच्या रोखठोक भुमिकेमुळे जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या नेतृत्वाखाली परतुर मंठा मतदार विधानसभा मतदारसंघातून आजी माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य हे शिवसेनेत पक्ष प्रवेश करित आहे. शिवसेनेत पक्ष प्रवेश करित आसताना शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख माधराव कदम यांच्या उपस्थितीत आष्टी सर्कल काऱ्हाळा येथील माजी सरपंच रामदास सोळंके व बाळासाहेब सोळंके यांच्यासहित अनेक कार्यकर्त्यांचा जाहीर पक्षप्रवेश केला .

अशोक सोळंके, केशव सोळंके, कार्तिक सोळंके, राजाभाऊ सोळंके, यांच्यासोबत अनेकांनी जाहीर पक्षप्रवेश केला आहे. यावेळी उपस्थित उपजिल्हाप्रमुख माधवराव मामा कदम, तालुकाप्रमुख भारत पंडित, उपतालुकाप्रमुख विठ्ठलराव वटाणे, सर्कल प्रमुख विठ्ठलराव लिपणे, सोशल मीडिया प्रमुख भागवत चव्हाण, बाबुलतारा येथील उपसरपंच दीपक काळे, बळीराम सोळंके, इब्राहिम कायमखानी, पिंप्रुळा ग्रामपंचायत संदस्य अशोक साबळे व इतर शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते .

# जालना पोलिसांचे विशेष नाकाबंदीचे आयोजन नाकाबंदी दरम्यान ३८८ केसेस तर ०३,४९,२५० रू . दंड वसुल!

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना जिल्हयात विशेष नाकाबंदीचे आयोजन, नाकांबदी दरम्यान ३८८ केसेस मध्ये एकुण ०३,४९,२५०/- रु.दंड वसुल

मा.श्री. अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, व श्री. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना यांनी दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे दि.०७/०८/२०२५ रोजी १७:०० ते २१:०० वाजेच्या दरम्यान जालना जिल्हयात विशेष नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते. नाकाबंदी दरम्यान जालना जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी यांचेसह दुय्यम अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी प्रभावी नाकांबदी केली आहे.



विशेष नाकाबंदी दरम्यान वाहनावर नंबरप्लेट न लावणे, फॅन्सी नंबदप्लेट, ट्रिपलसिट वाहन चालविणे, वाहन चालवितांना मोबाईल फोनवर बोलणे, काचांवर काळया फिल्मचा वापर, याविरुध्द एकुण ३८० केसेस करण्यात येवुन एकुण ३,४९,२५०/- रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच दारु पिवुन धोकादायकरित्या वाहन चालविणाऱ्या ०८ वाहन चालकांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येवुन गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

आगामी काळात सुध्दा विशेष नाकाबंदी मोहिम राबवण्यिात येणार असुन, वाहनावर नंबरप्लेट न लावणे, फॅन्सी नंबरप्लेट, ट्रिपलसिट वाहन चालविणे, वाहन चालवितांना मोबाईल फोनवर बोलणे, वाहनांच्या काचांवर काळया फिल्मचा वापर करणे, अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देणे याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. सर्व नागरिकांनी मोटारवाहन कायद्यातील तरतुदींचे पालन करणे बाबत मा. पोलीस अधीक्षक जालना यांचेकडुन आवाहन करण्यात आले आहे.

# संक्षिप्त

## चित्रकूट निवासस्थानी सदिच्छा भेट दिली – महसूल मंत्री ना. चंद्रशेखरजी बावणकुळे



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष महसूल मंत्री मा.ना. श्री. चंद्रशेखरजी बावणकुळे हे जालना जिल्हा शासकीय दौऱ्यानिमित्त आले असता त्यांनी चित्रकूट निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे यांनी त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन मन:पूर्वक यथोचित स्वागत केले. याप्रसंगी मा.केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब दानवे,आ.संतोष दानवे,प्रतिक दानवे व सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांसह इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जळगाव सपकाळ येथील आश्रम शाळेत जागतिक आदिवासी दिवस उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा
भोकरदन / प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील जळगाव सपकाळ येथील आदिवासी आश्रम शाळेत आदिवासी दिन, क्रांती दिन व रक्षाबंधना निमत्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक अनिल सोनवणे तर प्रमुख अतिथी प्राचार्य ए.बी चोरमारे , प्रशासकीय अधिकारी चव्हाण मेडम छ. शिविजी विद्यालयचे मु. अ. सुभाष बावस्कर होतै. याप्रसंगी जळगाव सपकाळ येथील डॉक्टर विद्या मॅडम तसेच नितेश सपकाळ व इतर यांची टीम यांनी विद्यार्थ्यांना बिस्किट वाटप केले.

या वेळी राजाराम दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी नृत्य, आदिवासी नाटिका, आदिवासी गित व आदिवासी समुदायचे संस्कृती बद्दल विद्यार्थ्यांनी भाषना मधुन आपले विचार व्यक्त केले. या मध्ये सचिन सोनुने, यश दांडगे, भगत सिंग ऋषिकेश,अनिकेत बावस्कर, इ. विद्यार्थानी सहभाग घेतला कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुनिल रोजेकर यांनी केले. वेळी तर आभार विजय पंडित यांनी केले सुनिल लोखंडे, जनार्दन कराड, संजय कोरडे, मोहन चित्ते प्रविण वाघमारे , अर्चना देशमुख, राजेन्द्र भोपळे, ज्ञानेश्वर दानवे, रामेश्वर रोजैकर, शरद जोशी, शुभम जाधव, सपकाळ मेडम, सोनुने मेडम ज्ञानेश्वर तिडके, गजानन रावळकर, सुनिल कानडजे, रोहिदास सोनुने, गणेश मुंढे उपस्थित होते.

## मांजरगाव प्रकरण दोन शाळकरी मुलांच्या भांडणातूनच; धार्मिक वादाचा आधार खोटा – पोलीस निरीक्षक मछिंद्र सुरवसे यांची स्पष्टोक्ती

### कायदा हातात घेणाऱ्यांवर होणार कठोर कारवाई



तभा वृत्तसेवा
बदनापूर/प्रतिनीधी

बदनापूर तालुक्यातील मांजरगाव येथे ८ ऑगस्ट रोजी संध्याकाळी झालेल्या दोन गटांतील वादामुळे गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. घटनेनंतर सोशल मीडियावर धार्मिक स्थळावरून दोन समाजात वाद अशी बातमी वाऱ्यासारखी पसरली. मात्र, ही माहिती पूर्णपणे चुकीची असून हा वाद फक्त दोन लहान शाळकरी मुलांच्या भांडणातून उफाळल्याचे पोलीस निरीक्षक मछिंद्र सुरवसे यांनी स्पष्ट केले आहे. घटना कळताच बदनापूर पोलिसांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना पाहताच जमलेला जमाव पळून गेला. या वेळी २० ते २५ मोटारसायकली घटनास्थळी सोडून दिल्याने त्या पोलिसांनी जप्त केल्या. दोन्ही गटांकडून तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, काही जण जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक सुरवसे म्हणाले, धार्मिक वादाचा कुठलाही संबंध नाही. ही घटना दोन शाळकरी मुलांच्या भांडणातून घडली आहे. चुकीच्या बातम्या सोशल मीडियावर पसरवल्या जात आहेत. कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, कोणालाही वाचवले जाणार नाही.

रात्री उशिरा हल्लेखोरांपैकी चार जण पोलिसांनी ताब्यात घेतले असून, उर्वरित आरोपींचा शोध व्हिडीओ फुटेजच्या आधारे सुरू आहे. यापूर्वी ८ ऑगस्ट रोजीच धार्मिक स्थळावरील भोंग्याचा वाद पोलीस निरीक्षक सुरवसे यांनी शांततेने मिटवला होता. विशेष म्हणजे, सोशल मीडियावरील अफवांना छेद देत पोलिसांनी गावात पुन्हा शांतता प्रस्थापित करण्यात यश मिळवले आहे.

# ईन्नरव्हील क्लबने प्रशिक्षणार्थी पोलिसांसाठी राबविला रक्षाबंधनाचा हृदयस्पर्शी उपक्रम

## चौदाशे जवानांना बहिणीच्या नात्याचा सन्मान देत हातात बांधला स्नेहधागा

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

उपक्रम ईन्नरव्हील क्लब जालना आणि दानकुंवर विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी शुक्रवार दि. ८ ऑगस्ट रोजी कुटुंबियांपासून लांब राहून कर्तव्याचे धडे गिरवणाऱ्या १४०० पोलीस प्रशिक्षणार्थ्यांसाठी रक्षाबंधनाचा दिवस अविस्मरणीय करण्याचा आगळावेगळा उपक्रम राबवला. बहिणीच्या प्रेमाचा स्पर्श आणि घरच्या सणाचा माहोल निर्माण करण्यासाठी क्लबने पोलीस प्रशिक्षण विद्यालयात जाऊन प्रशिक्षणार्थ्यांना राख्या बांधल्या.

कार्यक्रमास पोलीस प्रशिक्षण विद्यालयाचे प्राचार्य अशोक बनकर, क्लबच्या अध्यक्षा काजल पटेल, सचिव राखी जेथलिया यांच्यासह सुवर्णा करवा, मनीषा गणात्रा, छाया हंसोरा, कल्पना गोसरानी, सरला अग्रवाल, सुनिता अग्रवाल, राजश्री झंवर आदींची उपस्थिती होती. विद्यार्थिनींनी आणि क्लब सदस्यांनी एकेकाला राखी बांधत प्रेम, आपुलकी आणि शुभेच्छांचा वर्षाव केला. या कार्यक्रमामुळे प्रशिक्षणार्थी पोलिसांना घरच्या सणाची आठवण आणि बहिणीच्या हाताने राखी बांधल्याची अनुभूती आली.

यावेळी बोलताना ईन्नरव्हील क्लबच्या अध्यक्षा काजल पटेल म्हणाल्या की, या विद्यालयात राज्यभरातून प्रशिक्षण घेत असलेले भावी पोलीस घरापासून दूर राहतात. रक्षाबंधनासारख्या सणाला त्यांना त्यांच्या बहिणी आणि कुटुंबीयाची आठवण येणे साहजिक आहे. त्यांना थोडाफार घरचा माहोल देण्याचा आमचा हा छोटा प्रयत्न आहे. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि आनंदी सर्वांसोबत रक्षाबंधन साजरे करण्याच्या समाधानामुळे आम्ही भारावून गेलो आहोत. हा उपक्रम केवळ रक्षाबंधन



साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता, पोलीस दल आणि समाजातील नाते अधिक घट्ट करणारा आहे, असे त्या म्हणाल्या. प्रशिक्षणार्थ्यांनी बहिणींसारख्या आलेल्या पाहुण्यांचे मनापासून आभार मानले, तर पदाधिकाऱ्यांनीही त्यांच्यासाठी भविष्यात अशा प्रकारचे भावनिक आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्याचा मनोदय व्यक्त केला.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गोमांस तस्करी वाहनाचा पाठलाग करताना पोलीसांची गाडी उलटली

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १० ऑगस्ट -**

गोमांसची तस्करी करण्याऱ्या एका चारचाकी वाहनाचा पाठलाग करत असताना पोलिसांची गाडी उलटून तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. मुदखेड तालुक्यातील बारड येथील तोरणा तांडा परिसरात काल शनिवारी ही घटना घडली. दादाराव श्रीरामे, परमेश्वर श्रीमंगले आणि जिनेवाड असं जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. दरम्यान, घटनेच्या काही वेळातच पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने ते संशयित वाहन जप्त केलं. यावेळी पोलिसांना कारमध्ये ठेवलेल्या पाणाच्या जारमध्ये गोमास आढळून आले. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे.

बारड महामार्गावर पोलीस टॅब आहे. या महामार्गावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची पोलिसांकडून तपासणी केली जाते. शनिवारी दुपारी तेलंगणा पासिंग असलेली कार नंबर टी. एस १६ ईपी २००२ हे वाहन बारड महामार्गावरून जात होती. पोलिसांना सदरील कार संशयित आढळून आल्याने चालकास वाहन बाजूला लावण्यास सांगितलं. कारच्या पाठीमागील डिक्कीमधून रक्त गळत असल्याचं निदर्शनास आलं. पोलिसांनी विचारणा करताच चालकाने गाडी घेऊन पळ काढला. यावेळी बारड मदत केंद्रावर कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी दादाराव श्रीरामे, परमेश्वर श्रीमंगले आणि जिनेवाड यांनी तात्काळ पोलिसांच्या गाडीतून त्या वाहनाचा पाठलाग केला. पाठलाग करत असताना



तोरणा तांडा मार्गावर पोलिसांची गाडी उलटली. या अपघातात पोलीस कर्मचारी जखमी झाले. त्यांना गंभीर दुखापत झाली असून रुग्णालयात उपचार सुरु आहे.

दरम्यान, तोरणा तांडा येथे असलेल्या नागरिकांच्या मदतीने पोलिसांनी ती संशयित कार ताब्यात घेतली. यावेळी तपासणी केली असता कारमध्ये असलेल्या पाच ते सहा पाण्याच्या जारमध्ये सव्वाशे क्विंटल गोमांस आढळून आलं. पोलिसांनी वाहनासह दोन आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. या प्रकरणी बारड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गो-हत्येवर बंदी असताना गोमांसची तस्करी सुरु आहे. कोणालाही संशय येऊ म्हणून तस्कराकडून वेगवेगळी शक्कल लढवली जात आहे. याचाच प्रत्यय कालच्या घटनेवरून पाहायला मिळत आहे. दरम्यान या घटनेनं एकच खळबळ उडाली आहे.

# स्थागुशाच्या कारवाईत दिड लाखाचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० ऑगस्ट -**

ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत आज नांदेडच्या स्थानिक गुन्हा शाखेने मारतळा ते कलंबर रोडवर दोन संशयित इसमांना अटक करुन त्यांच्याकडून नायगाव आणि रामतिर्थ येथील चोरीतील १ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर व वेगवेगळ्या भागात झालेल्या घरफोड्यांच्या संदर्भात पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी स्थानिक गुन्हा शाखेला समांतर तपास करुन सदरच्या गुन्ह्यांचा तपास करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आज सकाळी स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी मारतळा ते कलंबर रोडवर जाणाऱ्या रस्त्यावर पाळत ठेवली. त्याठिकाणी दोन संशयित इसम आढळले. बळीराम कुसळकर रा.अंबानगर सांगवी व राहुल रमेश मुदाळे रा.संजयनगर उदगीर या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची उलट तपासणी केली असता त्यांनी नायगाव आणि रामतिर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोऱ्या केल्याचे कबूल केले. या चोऱ्यामधील एक चांदीचे ब्रासलेट, चांदीचे वाळे, चांदीचे लॉकेट, एक सोन्याची अंगठी व सोन्याचा नेकलेस असा ऐवज त्यांच्याकडून जप्त केला. त्याची किंमत एक लाख ६१ हजार रुपये एवढी आहे. यातील आणखी त्यांचे दोन साथीदार फरार असून, त्यांच्यासोबत या चोर्या केल्याचे त्यांनी कबूल केले. यासंदर्भात या दोघाविरुध्द ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, तो तपास झाल्यानंतर या दोन्ही आरोपींना रामतिर्थ व नायगाव पोलिसांकडे सुपूर्द करण्यात येईल, असे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी सांगितले. उदय खंडेराय यांच्यासोबत पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड, पोलीस कर्मचारी मिलिंद नरबाग, संदीप घोगरे, इम्रान शेख, बालाजी कदम, प्रमोद जोंधळे आदींनी हि कामगिरी केली.

रत्नेश्वरी माध्यमिक विद्यालय, वडेपुरी या शाळेमध्ये आज संस्थापक अध्यक्ष प्रताप पाटील चिखलीकर आणि संस्थेचे सचिव प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम करण्यात आला.या कार्यक्रमास अधिकारी अंजली कापसे उपस्थित होत्या.

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त महिला सबलीकरण सोहळा उत्साहात

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १० ऑगस्ट -**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट यांच्या वतीने विरांगणा राणी दुर्गावती महिला सबलीकरण व सक्षमीकरण सोहळा (ता.०९) रोजी किनवट शहरात आमदार भीमराव केराम यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमास आदिवासी सेवक नारायणराव सिडाम, भिमराव तुमराम, बापुराव शिरडे, दादाराव टेकाम, उत्तम मेसराम, आनंद मच्छेवार, तसेच बोरगावकर , एच. जे. सुरजुसे, पी. बी. आडे, आर. बी. दोडके, एस. एस. कदम, आर. एस. भंगारे, प्रा. किशनराव मिरासे, नामदेवराव केंद्र, तसेच आमदार केराम यांचे स्वीय सहायक संतोष मरस्कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाला परिसरातील विविध शाळांमधील विद्यार्थी, पालक व महिला मंडळे मोठ्या संख्येने उपस्थित होती. या प्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात आ. भीमराव केराम साहेब म्हणाले,

जागतिक आदिवासी दिन हा आपल्या ओळखीचा, अभिमानाचा आणि हक्कांच्या जाणीवेचा दिवस आहे. आजच्या महिलांनी फक्त घरापुरते मर्यादित न राहता शिक्षण, रोजगार, उद्योग, राजकारण आणि सामाजिक नेतृत्व या सर्व क्षेत्रात पुढे यायला हवे. विरांगणा राणी दुर्गावती यांचा पराक्रम हा आदिवासी समाजातील महिलांसाठी प्रेरणादायी आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक आदिवासी



कुटुंबापर्यंत पोहोचवणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे.

कार्यक्रमादरम्यान विविध महिला बचत गट व उद्योजक महिलांचा सन्मान, तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. महिलांसाठी सबलीकरण, आरोग्य, स्वावलंबन व सरकारी योजनांबाबत मार्गदर्शनपर व्याख्यान घेण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी आदिवासी संस्कृती, परंपरा व विकासाच्या वाटचालीबद्दल विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी एच. जे. सुरजुसे यांनी केले तर आभारप्रदर्शन सहाय्यक प्रकल्प अधिकारी पी. बी. आडे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### मुदखेड येथील बौद्ध प्रशिक्षण केंद्रात डॉ.आंबेडकर पुतळ्याचे भूमिपूजन

**मुदखेड** - मुदखेड शहरातील बौद्ध प्रशिक्षण केंद्र येथे श्रावण पौर्णिमा व वर्षावासाचे औचित्य साधून दि. ९ ऑगस्ट रोजी माजी नगरसेवक मारोती संभाजी चौदंते यांच्या परिवाराच्या वतीने भोजनदान व बोधिवृक्षाचे वर्धापन दिन साजरा करण्यात आला आहे.



१९९० साली भारतीय जनता पक्षाची मुदखेड नगरपालिकेवर एकहाती सत्ता होती त्या काळात माजी नगराध्यक्ष राम चौधरी व माजी नगरसेवक मारोती चौदंते यांच्या प्रयत्नातून बौद्ध समाजाला बौद्ध विहारासाठी जागा उपलब्ध करून दिली होती त्याच काळात माजी नगरसेवक मारोती चौदंते यांच्या वतीने त्या जागेत बोधिवृक्षाचे रोपटं लावण्यात आले होते त्या बोधिवृक्षाला आज जवळपास ३५ वर्ष पुर्ण झाले आहे व श्रावण पौर्णिमा वर्षावास या निमित्ताने त्यांच्या परिवाराच्या वतीने भोजनदान कार्यक्रम ठेवण्यात आला होता. व तसेच भंत्ते शिलरत्न थेरो, भंते गगनबोधी, भंते सत्यानंद थेरो (हैदराबाद), भदंत पट्टीसेना (कामठा), आणि भिख्खू संघ यांच्या संकल्पनेतुन बौद्ध प्रशिक्षण केंद्रात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णकृती पुतळयाचे भुमीपुजन भिकू संघाच्या उपस्थितीत माजी नगराध्यक्ष राम चौधरी, माजी नगरसेवक मारोती चौदंते, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महामाया महिला मंडळ,माजी नगराध्यक्ष राम चौधरी, माजी नगरसेवक मारुती चौदंते, भीमशाहीर आनंद कीर्तने, मधुकर अटकोरे, प्रसेनजित चौदंते, डीजी चौदंते, चंद्रकांत हौसरे, बाळकृष्ण चौदंते, दादाराव चौदंते, सुभाष चौदंते, कुणाल चौदंते,महेंद्र चौदंते,शिवानंद देवके, रावसाहेब चौदंते, अमोल चौदंते, राहुल आप्पा चौदंते, सावते सर, माजी सैनिक सुनिल चौदंते, बजरंग खोडके, प्रवीण चौदंते, यासह बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### दिव्यांग विद्यालयात रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा

**बाऱ्हाळी**-येथिल जिव्हाळा निवासी दिव्यांग विध्यालयात दिव्यांग विद्यार्थांना राखी बांधुन रक्षाबंधनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी रक्षाबंधनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो विद्यालयात मागील ३० वर्षपासूनची रक्षाबंधन साजरा करण्याची परंपरा आहे. बहीण भावाच्या पवित्र व सुंदर नात्याला समर्पित असलेल्या रक्षाबंधनाला प्रतीवर्षी प्रमाणे निवासी विद्यार्थ्यांना राखी बांधण्याचा उपक्रम शाळेचे मुख्याध्यापिका कमल नरवाडे यांनी सुरु केला . निवासी दिव्यांग विद्यालयात येथील दिव्यांग मुलींनी शिक्षकांना व मुलांना औक्षण करत राखी बांधून रक्षाबंधन हा सण साजरा केला. रक्षाबंधन हा सण भावा -बहिणीच्या नात्यातील प्रेम, विश्वास आणि आपुलकीचा समजला जात. आणि तो जोपासण्याचे काम येथिल विद्यार्थ्यांकडून केले जात आहे. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापिका कमल नरवाडे ी, व्यंकट रेनगुंटवार, नूरखाँ पठाण , नळगीरे अविनाश, देविदास सूडके, बाबुराव पांचाळ, शिवाजी कदम, शिंदे माधव आदी कर्मचारी व विध्यार्थी उपस्थित होते.

### विविध ८६ पदांच्या भरतीसाठी ऑनलाईन परीक्षेचे यशस्वी आयोजन

**नांदेड** -डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी, नांदेड येथे वर्ग-४ मधील विविध ८६ रिक्त पदांच्या भरतीसाठी २५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात आली. या भरती प्रक्रियेसाठी महाराष्ट्रातील विविध भागांतून १७,१४६ उमेदवारांनी अर्ज सादर केले होते, त्यापैकी ११,८६८ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षेत सहभाग घेतला.

# आ.बोंढारकर यांच्या कार्यालयावर दिव्यांगाचा मोर्चा

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १० ऑगस्ट -**

दिव्यांग बांधवांनी दिव्यांगासाठी असलेल्या शासकीय विविध मागण्यांसाठी दिनांक ९ ऑगस्ट २०२५ रोजी दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढून विविध मागण्यांची पूर्तता शासन दरबारी लवकरात लवकर करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

नांदेड शहर व परिसरातील दिव्यांग बांधवांनी दिनांक ९ अगस्ट २०२५ रोजी दक्षिणचे कर्तव्यदक्ष आमदार आनंदराव पाटील भांडारकर यांच्या कार्यालयावर दिव्यांग बांधवांनी मोर्चा काढून दिव्याच्या मागण्या पूर्ण करण्याचे मागणी करण्यात आली. यावेळी दिव्यांग कर्मचारी यांच्या धर्तीवर आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गतच्या निधीतील दिव्यांगांच्या दरवर्षीच्या राखीव निधीतून बेरोजगार दिव्यांगांना तीनचाकी स्कुटीसह इतर प्रवर्ग



निहाय अत्याधुनिक उपकरणे/साहित्य वितरीत करण्यात यावे यासह दिव्यांगांना स्वयंरोजगार पुरक साहित्य जसे झेरॉक्स मशीन, कंप्युटर, कलर प्रिंटर, रोजगार उपलब्ध करण्यासाठी विविध मशिनरी उपलब्ध करून देणे संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या मानधन दरमहा ५ तारखेच्या आत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणे

आरपीडब्ल्युची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. केंद्र सरकारच्या एडीआयपी योजनेतील दिव्यांगांना वितरीत करण्यात येणाऱ्या बॅटरीवर चालणा-या निकृष्ट दर्जाच्या तीनचाकी सायकली ऐवजी इलेक्ट्रीक स्कुटी वितरित करण्यात यावे यासह दिव्यांग प्रवर्ग निहाय अत्याधुनिक साहित्य उपकरणे या योजनेतून दिव्यांगांना वितरीत करण्यात यावे यासाठी पाठपुरावा करून निकृष्ट दर्जाचे साहित्य वितरणापासून रोखावे.आमदार दिव्यांगांच्या दारी उपक्रम राबवून मतदारसंघातील तळागाळातील दिव्यांगांच्या समस्या जाणुन घेत त्यांचे पुनवर्सन करण्यासाठी प्रयत्न करावेत.दिव्यांगांचे विविध प्रश्न समस्या सभागृहात मोडून न्याय मिळवून द्यावे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या धर्तीवर रेल्वे प्रवासात अंध आणि मुकबधीर दिव्यांगांना सुद्धा ४० टक्के दिव्यांगत्वावर वनफोर्थ तिकिट उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावे अशा प्रकारच्या विविध मागण्या करण्यात आल्या यावेळी दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंडारकर यांनी दिव्यांगाच्या वरील सर्व मागण्या लागू करण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करीन असे आश्वासन दिले. त्यानंतर अल्पउपहारा नंतर मोर्चा मागे घेण्यात आला.

## श्री दत्त शिखर संस्थान येथील अखंड दत्त नाम सप्ताहाची सांगता

# गर्दीचा उच्चांक आणि प्रशासनाचे कोलमडलेले नियोजन, प्रशासनासमोर आगामी यात्रोत्सवासाठी कळीचे मुद्दे

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १० ऑगस्ट -**

श्री दत्तात्रेय संस्थान दत्त शिखर,माहूरगड येथे परीक्रमा यात्रोत्सवनिमित्ताने रविवार दिनांक ०३ ऑगस्ट रोजी सकाळी ०६ वाजल्यापासून सुरू झालेल्या अखंड दत्त नाम सप्ताहाची आज रविवार दि.१० ऑगस्ट रोजी सकाळी ०६ वाजता प्रभु श्री दत्तात्रेय स्वामी यांच्या त्रिमुखी मूर्तीची श्री श्री श्री प.पु. १००८ महंत मधुसुदन भारती महाराज यांच्या हस्ते विधीवत पूजा करून काकड आरतीने रितसर सांगता झाली.

शुक्रवारी दि.०८ रोजी दुपारी ४ वाजता निघालेला परीक्रमा यात्रेचा वेढा पंचक्रोशीत जवळपास ३६ किलोमीटर पायी चालत प्रदक्षिणा करुन दुसऱ्या दिवशी ०९ रोजी सायंकाळी ०६ वाजता दत्त शिखर येथे परत आला.

**गर्दीचा उच्चांक आणि प्रशासनाचे कोलमडलेले नियोजन**

माहूर शहरापासून दक्षिणेस साधारणपणे ०७ किलोमीटर अंतरावर सह्याद्रीच्या उंच पर्वत रांगा कुशीत वसलेल्या व कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या भगवान श्री दत्तात्रेय स्वामींची तपोभूमी म्हणून श्री दत्तात्रेय संस्थान दत्त शिखर,माहूरगड हे भारतात सर्वदूर ओळखली जाते. याठिकाणी ०८



ते ०९ ऑगस्ट या कालावधीत नारळी पौर्णिमेला भरलेल्या परीक्रमा यात्रेने यावर्षी मागील सर्व परीक्रमा यात्रेच्या भाविकांच्या गर्दीचे उच्चांक मोडीत काढत नवीन उच्चांक प्रस्थापित केला. जवळपास पाच लाख भाविकांची उपस्थिती नारळी पौर्णिमेला वेढा निघण्याच्या ८ रोजी असण्याचा प्रशासकीय अंदाज यात्रा नियोजनाच्या सर्वच प्रशासकीय विभागा कडून वर्तविण्यात आला आहे.

पंचक्रोशी वेढा निघण्याच्या कालावधीत वरुणराजाची मेहरबानी झाल्याने जरी भाविकांचा वेढा निर्विघ्नपणे पार पडला हे एकीकडे भाविकांच्यादृष्टीने जरी समाधानाची बाब ठरली तरी मात्र दुसरीकडे भाविकांच्या अपकर्मींग संख्येचे सर्व अंदाज चुकलेल्या यात्रा नियोजन प्रशासनासाठी मात्र तारेवरची कसरत ठरला. यंदा परीक्रमा यात्रेत कोलमडलेल्या नियोजनावरुन पुढील काळात माहूरगडावर साजरे करण्यात येणाऱ्या विविध महत्त्वाच्या यात्रोत्सवात तरी आता जिल्ह्यासह तालुका व संस्थान नियोजन प्रशासनाने धडा घेण्याची गरज या निमित्ताने निर्माण झाली आहे. विशेषकरून वाढत असलेल्या भाविकांच्या संख्येमुळे भाविकांच्या वाहनांच्या पार्किंग जागेचा व अपुऱ्या बस व्यवस्थेबाबतचा प्रश्न अग्रक्रमाने सोडवणे हे प्रशासनासमोर आगामी यात्रोत्सवाच्या दृष्टीने कळीचे मुद्दे ठरणार असून ते सोडवणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

# मन्याबाई पाटील नागराळकर यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**देगलुर, दि. १० ऑगस्ट -**

तालुक्यातील नागराळ येथील रहिवाशी प्रतिष्ठित, जेष्ठ महिला कै. श्रीमती मन्याबाई विठ्ठलराव पाटील भक्तापुरे यांचे वर्धापकाळाने रविवार दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी ११: २५ वाजता नागराळ येथे दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय १०४ वर्षे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, नातू पंणतू असा मोठा परिवार आहे. श्रीमती मन्याबाई पाटील यांच्यावर सोमवार ता. ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता नागराळ येथील शेतात अंत्यसंस्कार केला जाणार आहे. ते येथील अडत व्यावसायिक संग्राम पाटील नागराळकर यांच्या त्या मातोश्री होत.

# तामसा येथे आदिवासी दिनानिमित्त आदिवासी संस्कृतीचे दर्शन

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. १० ऑगस्ट -**

तामसा येथे जागतिक आदिवासी दिनाच्या औचित्याने आदिवासी समाजाकडून आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले. येथील नवीन बसस्थानक परिसरात आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या हस्ते आदिवासी समाजाचे जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. जुन्या बसस्थानकापर्यंत शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी आदिवासी समाजाची ओळख असलेल ढेमसा नृत्यसह पारंपरिक पेहराव आकर्षणाचे केंद्र होते . येथील जिल्हा परिषद शाळेत आदिवासी दिनाचा समारोप कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी स्वातंत्र्य सैनिक पुंडलिकराव भिसे होते.प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य संभाजी लांडगे, आदिवासी पँथर संघटनेचे धनराज सोनटक्के, प्रा.के.के. वानोळे, माजी उपसभापती मनोहर माहुरे हे होते. यावेळी निसर्गपूजक समाजाची ओळख जपणाऱ्या महिलांचा रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव झाडे यांनी केले.



आभार नामदेव भिसे यांनी मानले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सहदेव खेडकर, सहाय्यक फौजदार अशोक सिंगनवाड, निवृती धुमाळे, रामप्रसाद हुरदुखे, जनार्धन ढोले,प्रशांत अंभोरे, सरपंच तानाजी गायकवाड, सरपंच हेमंत नरवाडे, सरपंच जिगाजी वानोळे, सरपंच सुरेश ठाकरे, सरपंच माधव धनवे, सरपंच पारसराम नाईक, सरपंच सुदाम डोकले, सरपंच सुभाष गारोळे, विश्वम्भर मेटकर मनोहर मूरमुरे,प्रल्हाद मेटकर, गोकुळ पांडे, चंद्रकांत हुरदुखे,अविनाश ढोले आदी मान्यवरांसह अनेक गावातील समाज बांधव उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या सचिवांना माहूर भेटीचे निमंत्रण

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १० ऑगस्ट -**

माहूरगडावरील आनंद दत्त धाम मठाचे मठाधिपती दभप राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर यांची महाराष्ट्र राज्याचे ब्रँड अँबेसिडर स्वच्छता दूत म्हणून निवड करण्यात आली या निवडीचे सार्थक करत साईनाथ महाराजांनी राज्यभर तसेच राज्याच्या बाहेर जाऊन स्वच्छता अभियान राबवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याचे स्वच्छता मंत्री गुलाबराव गावंडे पाटील यांनी केलेली ब्रँड अँबेसिडर म्हणून केलेली ही निवड सार्थक ठरवत साईनाथ महाराज यांनी दि. ०५ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सचिव ओएसडी अमोल बाबुराव पाटणकर यांची सौजन्य पूर्ण कृतज्ञता भेट घेऊन त्यांना



माहूर भेटीचे सादर निमंत्रण दिले.

स्वच्छता दूत साईनाथ महाराज यांनी दि. ५ .८ .२५ रोजी मुंबई येथील मंत्रालयास महत्त्वपूर्ण प्रशासकीय भेट दिली. यावेळी त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सचिव अमोल बाबुराव पाटणकर यांची सौजन्यभेट घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शासनाचे स्वच्छता दूत म्हणून त्यांची निवड केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.या भेटीत विविध महत्त्वपूर्ण प्रशासकीय, सामाजिक विषयांसोबतच विशेषत्वाने माहूरगडावरील श्री रेणुका देवी मंदिर येथे होत असलेल्या स्कायवॉकच्या विकासात्मक कामासंदर्भात महत्वपूर्ण सविस्तर चर्चा करण्यात आली.

तसेच स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांची भेट देऊन त्यांना कार्य अहवाल सादर करण्यात आला आणि पुढील वर्षीच्या अधिक मासाच्या शुभारंभ प्रसंगी आपण माहूरगडी उपस्थित रहावे, असे आग्रही निमंत्रणही देण्यात आले.

या भेटीच्या वेळी महाराष्ट्राचे स्वच्छ्ता दूत ब्रँड ॲम्बेसेडर साईनाथ महाराज वसमतकर यांनी स्वच्छता दूत महाराष्ट्राचे प्रतिक ,तसेच त्यामागील उद्दिष्ट्ये आणि प्रेरणा याविषयी सखोल माहिती दिली.अमोल पाटणकर यांनी साईनाथ महाराज यांची स्वच्छता दूत ब्रँड अँबेसिडर म्हणून निवड होताच स्वच्छता अभियानाला आणखी गती प्राप्त होऊन महाराज ह्या अभियानाला महास्वच्छता अभियानाचे स्वरूप देऊन यशस्वीरित्या राबवित असल्याने त्यांच्या कार्याची मनापासून प्रशंसा केली.जनतेमध्ये जनजागृती निर्माण करणे हे निश्चितच कौतुकास्पद कार्य असल्याचे यावेळी त्यांनी विशेषत्वाने नमूद केले. यावेळी मंत्रालयातील इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोरही साईनाथ महाराजांच्या संकल्पनेची विस्तृत मांडणी करण्यात आली.

ही भेट महाराष्ट्रातील सांस्कृतिक, सामाजिक आणि स्वच्छता अभियानातील कलात्मक योगदानाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा ठरली असून ,साईनाथ महाराज यांनी सचिव अमोल पाटणकर यांना माहूर येथे भेट देण्याचे यावेळी निमंत्रण दिल्याने त्यांनी याला लगेच प्रतिसाद देत ,लवकरच माहूरला भेट देऊ !असे आश्वासन साईनाथ महाराज यांना दिले. यावेळी प्रल्हाद देवडे, सुरेश नाना जगाडे ,संजय घोगरे यांचेसह मान्यवर उपस्थित होते.

**भोकर नगरपरिषद, भोकर जि. नांदेड**
मुख्य प्रशासकीय इमारत
साईबाबा पेट्रोलपंप समोर, नांदेड रोड, ओकर ता. ओकर जि. नांदेड-४३१८०१

Email: - cobhokargmail.com    दुरध्वनी क्रमांक कार्यालय (०२४६७) २२२२९९-२२३३९९

जा.क्र. ७ ऑगस्ट २०२५/३८८२    दिनांक : ७ ऑगस्ट २०२५

**ई-निविदा सूचना**

मुख्याधिकारी, नगर परिषद भोकर जि. नांदेड यांच्या वतीने भोकर नगरपरिषद अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत भोकर नगरपरिषद भुयारी गटार योजना जि. नांदेड या कामाचे प्रकल्प अहवाल तयार करणे व सुपरव्हिजन करणे करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणे कामाकरिता ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत दि. ११/०१/२०२५ ते दि २३/०८/२०२५ पर्यंत मागविण्यात येत आहेत. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना सदरील निविदा पाहता व डाउनलोड करता येईल.

दिनांक ०७/०८/२०२५

**मुख्याधिकारी**
**भोकर नगर परिषद**
**ता. भोकर, जि. नांदेड**

# अंधारी मध्यम प्रकल्पात १ टक्के पाणीसाठा, पाच गावांना पाणीपुरवठा

## अजिंठा येथील अंधारी धरण परिसरात गतवर्षी चांगला पाऊस पडल्याने अंधारी मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो झाले होते

**तभा वृत्तसेवा / उल्हास शेजवळ**

अजिंठा दि, १० ऑगस्ट - सिल्लोड तालुक्यातील अजिंठा येथील अंधारी मध्यम प्रकल्पातून अजिंठा , अनाड ,शिवणा , अमसरी वाघेरा या पाच गावांना पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जातो. ऑगस्ट महिन्यात अंधारी मध्यम प्रकल्पात १ टक्के जलसाठा आहे. समानधारक पाऊस नसल्याने धरणाच्या पाणी पातळीत वाढ झाली नाही . पावसाळ्याचे प्रमुख दोन महिने उलटल्यानंतरही अंधारी मध्यम प्रकल्प निम्मेही न भरल्याने सध्या चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे.

धरण परिसरात मोठ्या पावसाची गरज आहे.उर्वरित ऑगस्ट व संप्टेबर मध्ये परिसरामध्ये पाऊस न बरल्यास पिण्याच्या पाण्या गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे .

अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्प परिसरात गतवर्षी चांगला पाऊस पडल्याने अंधारी मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो झाले होते. जून ते जुलैयमहिन्याच्या दुसऱ्या आठवडयात धरणात तब्बल ४५ टक्के वाढ झाली होती . तर सप्टेंबर महिन्यात अजिंठ अंधारी मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो झाला होता .

सध्या पावसाळ्यातील आणखीण दोन महिने शिल्लक असून या काळात अजिंठा अंधारी



प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे .

अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पात १ टक्के पाणीसाठा आहे .पाणी उपसा थांबवला नाही तर पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. - अजिंठा परिसरात - दरवर्षीच्या तुलनेत पाऊस कमी :- पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्धभवण्याची शक्यता :- - पावसाळा होऊन दोन महिने उलटले तरीही पुरेसा पाऊस नसल्याने अजिंठा , अनाड, शिवणा, अमसरी, वाघेरा या पाच गावाची तहान भागवणाऱ्या अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पात केवळ एक टक्के पाणीसाठा शिल्लक आहे .त्यामुळे, पिण्याच्या पाण्याची सोय लक्षात घेऊन पाणी उपसा थांबवणे गरजेचे आहे. - पावसाने दाडी मारवल्याने धरणातील पाणी उपसा सुरु असल्याने धरणातील पाणी पातळी कमी होत असल्याची नागरिकांनी सांगितले आहे . - मागील दोन महिन्यात अजिंठा परिसरात समाधानकारक पाऊस झालेला नाही . - भविष्यात पावसाची अशीच परस्थिती राहीलीतर पाणी टंचाईचा सामना करावा लागू शकतो .

### पावसाची प्रतीक्षा

**सध्या अंधारी मध्यम प्रकल्पात सद्या १ टक्के पाणी साठा उपलब्ध आहे. परिसरात मोठे पाऊस पडले नसल्याने धरणातील पाणीसाठ्यात वाढ झालेली नाही. धरणाच्या परिसरात मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे.**

**प्रितम राठोड प्रकल्प शाखा अधिकारी सिल्लोड**

## कन्नड जि.प. प्रशाला अंधानेरचा उपक्रम; सैनिक, पोलिस, आरोग्य व स्वच्छता कर्मचाऱ्यांना राख्या



कन्नड -दि.०९ ऑगस्ट - जिल्हा परिषद प्रशाला, अंधानेर (ता. कन्नड) येथे रक्षाबंधनानिमित्त 'पर्यावरणाची राखी - देशरक्षकांना समर्पण' हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये कला, स्वावलंबन, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी, या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला.

५ वी ते ९ वीतील विद्यार्थ्यांनी विविध झाडांच्या बिया आणि अन्नधान्य वापरून पर्यावरणपूरक राख्या तयार केल्या. या राख्या सैनिक, पोलिस, आरोग्य व स्वच्छता कर्मचाऱ्यांना भेट देण्यात आल्या. छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर येथील सैनिकांना स्पीड पोस्टने राख्या पाठवण्यात आल्या. कन्नड ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिरुद्ध गायकवाड, ग्रामीण पोलीस ठाण्यात निरीक्षक रामचंद्र पवार, शहर पोलीस ठाण्यात निरीक्षक रघुनाथ सानप,फौजदार चांद मेंडके, तर कन्नड नगर परिषद अधीक्षक प्रशांत देशपांडे व रमेश थोरात यांनी राख्या स्वीकारल्या. उपक्रम प्रशालेचे मुख्याध्यापक राजीव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली, चित्रकला विभाग प्रमुख दीपक सोनवणे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. सर्व शिक्षकांनी उत्साहाने सहकार्य केले.

## माजी पोलीस स्व.सिध्दार्थ कांबळे यांच्या स्मरणार्थ लता कांबळे यांनी दिले पोलीस स्टेशनला फुलाच्या रोपाची भेट



सोयगाव,दि.१० ऑगस्ट - सोयगाव पोलीस स्टेशनला पोलीस म्हणून निवृत्त पोलीस कर्मचारी कै.सिध्दार्थ कांबळे यांच्या स्मरणार्थ त्याच्या पत्नी लता सिध्दार्थ कांबळे यांनी पोलीस स्टेशन सोयगावला विविध रंगीबेरंगी फुलाची २१ रोपे भेट म्हणून दिली.यावेळी सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,पोलीस उपनिरीक्षक रज्जाक शेख,महीला पोलीस कर्मचारी प्रियांका बोडखे,सादिक तडवी,संजय सिंगल,कृषी भूषण अरुण सोहनी उपस्थित होते.

## सोयगाव येथील निखिलकुमार काटोलेचे यश



सोयगाव,दि.१० ऑगस्ट - सोयगाव येथील निखिलकुमार हरिदास काटोले यांने एल.एल.बी.परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश मिळवले.सोयगाव शहरातील शिक्षक असलेल्या हरिदास काटोले यांनी मुलाला संस्कार व शिक्षण दिले.निखिलकुमार ने देखील जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवले निखिलकुमार यांचे नातेवाईक,नगरसेवक,बाल मित्र,व्यापारी,मित्रपरिवार,हितचिंतकानी त्याचा सत्कार करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी ग्रामसेवक सत्यनारायण पुल्लेवाड,हॉटेल न्यू मुरलीचे मालक रवींद्र सोनवणे,प्रणव सोनवणे,स्वप्निल पाटील,आदींसह मित्रपरिवार उपस्थित होते.

## भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था संस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

# पतसंस्था चालवणारे चांगले असले की कोणतीही पतसंस्था बुडत नाही - चेअरमन प्रभाकर काळे

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१० ऑगस्ट

सोयगाव येथील भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था मर्यादित सोयगाव यांची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१० रविवार रोजी सोयगाव येथील मराठी नॅशनल शाळा येथे सकाळी १०:०० वाजता सभा सुरू करून पतसंस्थेचे जेष्ठ सभासद रवींद्र काळे,शांताराम चौधरी,चंद्रकांत कुलकर्णी,किशोर काळे,भास्कर चौधरी यांच्या हस्ते भैरवनाथ महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सभेला सुरुवात करण्यात आली.यावेळी संस्थेचे सर्व सभासद,प्रमुख अतिथी उपस्थित होते.यावेळी संस्थेचे व्यवस्थापक धनराज औंरगे यांनी सभे पुढे येणारे विषय वाचून दाखवले.मे अध्यक्ष यांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे बाबतचे सर्व वाचून सभासदांना माहिती दिली,संस्थेचे सभासद ज्येष्ठ मार्गदर्शक संजय शहापूरकर



यांनी संस्थेला २७ वर्षे पूर्ण झाले त्यानिमित्ताने त्यांनी पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर काळे व कर्मचारी यांना फुलगुच्छ देऊन सत्कार केला.तसेच पतसंस्थेच्या वतीने आलेले प्रमुख पाहुणे यांचे सत्कार करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले संजय शहापूरकर,कृषी भूषण अरुण सोहनी,भगवान वाघ,यांनी आपल्या भाषणेतून पतसंस्थेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व काही सूचना ही पतसंस्थेला यावेळी दिल्या.सोयगाव शहरातील समाजसेवक,कृषी भूषण,कवी,अशा अनेक विषयी सोयगाव शहराचे नाव उंच पर्यंत नेणारे यांचा पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे यांच्या हस्ते शाल,श्रीफळ,गुलाब देऊन सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेचे चेअरमन यांनी सभासदांना मार्गदर्शन करताना पतसंस्था चालवणारे चांगले असले की कोणतीही पतसंस्था बुडत नाही व सभासदांनी असेच सहकार्य पतसंस्थेला कायम ठेवावे ही अपेक्षा व्यक्त पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे यांनी बोलताना सांगितले.यावेळी ज्येष्ठ सभासद एकनाथ महाजन,रवींद्र काळे,मुकुंद तळेले,कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे व्हा.चेअरमन योगेश बोखारे,राजू एलीस,कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे मॅनेजर सिताराम गोतमारे,स्वामी समर्थ पतसंस्थेचे सुनील सैंदाणे,तिरुपती अर्बनचे मॅनेजर विकास देसाई,अमोल पाटील,समाजसेवक विष्णू मापारी,कृषी भूषण अरुण सोहणी,कवी माणिक सोनवणे,कवी गोपाळ इंगळे,समाजसेवक दत्तू रोकडे, विवेक महाजन,तुकाराम तायडे,भगवान वाघ,भागवत थोटे,महेश राऊत,दत्तू निकम, दत्तू सोनवणे,रवींद्र मंडवे,सुरेश राठोड,योगेश दुसाने,उत्तम पाटील,सुनिल काळे,संजय जावळे,डिंगाबर वाघ,रमेश गावंडे,पिनू पाटील वामने,सुनिल निकम,आनिल काळे,सुभाष सोहनी,गणेश तैली,आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.यावेळी पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे,व्हा. चेअरमन संतिष कोलते,संचालक नारायण घनघांव,मच्छिंद्र तेली,पांडुरंग बारी,कदीर शहा,मोतीराम पंडित,दामोधर निकम,निर्मलाबाई महाजन,सुवर्णा दुसाने,सुनिता औरंगे, व्यवस्थापक धनराज औरंगे,लिपिक विजय जावळे,शिपाई योगेश काळे,गोकूळ रोकडे,वसंत पठाडे,संध्या जगताप उपस्थित होते.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनराज औरंगे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे यांनी केले.

## अमरावतीच्या अधिकाऱ्याकडून सिल्लोड आगाराची पाहणी

सिल्लोड प्रतिनिधी : स्वच्छ व सुंदर बसस्थानक २०२५ अंतर्गत सिल्लोड बसस्थानकाची सर्वांगीण तपासणी शुक्रवारी (दि८) रोजी अमरावती प्रादेशिक विभागाचे व्यवस्थापक राहुल पलंगे व वरिष्ठ संख्यागिक अधिकारी राजेश पवार यांनी केली व सिल्लोड बसस्थानकात असलेल्या सुखसोयी बाबत समाधान व्यक्त केले.

बसस्थानकात स्वच्छता,ओला व सुका कचरा विलीनीकरण, सार्वजनिक स्वच्छता करावयाची व्यवस्था, प्रवासी आसन व्यवस्था, कचरा संकलन डबे, गाड्यांचे वेळापत्रक, या सर्व बाबींची सुमारे तासभर तपासणी केली. या वेळी त्यांच्या समवेत दैनिक देशोन्नती चे तालुका प्रतिनिधी संजय कुलकर्णी, पत्रकार गजानन मरकड व सामाजिक कार्यकर्ते अवचित कटारिया यांची प्रमुख उपस्थिती होती या वेळी १०० गुणांची अभिप्राय प्रश्नावली भरून घेण्यात आली.गत दोन वर्षांपासून राज्य शासनाने बाळासाहेब ठाकरे स्वच्छ अभियान अंतर्गत विविध बक्षीसं ठेवण्यात आली आहे. सध्या सिल्लोड बसस्थानक परिसरात कॉंक्रीटीकरणाचे काम सुरू असून सोबतच वृक्षारोपण व वाहन व्यवस्था व्यवस्थित करण्याचा सुचना त्यांनी दिल्या.या वेळी आगारप्रमुख विजय काळवंडते, सहाय्यक वाहतूक अधिक्षक विकास चव्हाण, वाहतूक निरीक्षक संजय राठोड यांच्या सह राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिडकीन येथिल ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये क्रांती दिन उत्साहात साजरा



बिडकीन दि १० ऑगस्ट - ९ ऑगस्ट १९४२ मध्ये या दिवशी महात्मा गांधींनी 'भारत छोडो' आंदोलनाची सुरुवात केली होती. या अंदोलनामुळे इंग्रजांविरुध्दच्या लढ्याला नवीन दिशा मिळाली ज्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी मोठी मदत झाली. हा दिवस लक्षात ठेवण्यासाठी '९ ऑगस्ट' हा ऑगस्ट क्रांती दिवस म्हणून साजरा केला जातो. याच निमित्ताने आज रोजी पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये क्रांती दिन साजरा करण्यात आला. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते स्वातंत्र्य मिळवुन देशासाठी बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यविरांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार घालुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. स्वातंत्र्यविरांबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांनी आपल्या भाषणाद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्याचबरोबर शाळेतिल विद्यार्थ्यांनीही भाषणे केली. सुभाष चंद्र बोस, भगत सिंग, पंडीत जवाहरलाल नेहरु, लोकमान्य टिळक, वल्लभभाई पटेल अशा अनेक स्वातंत्र्यविरांच्या वेशभुषा परिधान करुन विद्यार्थी शाळेमध्ये आले होते. इंडियन कलच्चर, ऑपरेशन सिंदुर, माय कंट्री. या विविध विषयांवरती निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेतिल विद्यार्थीनी सेजल राठोड, विद्या पाटील यांनी केले या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक - शिक्षिका, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगितेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जिल्हाधिकारी स्वामींकडून टापरगावच्या भगिनींना शैक्षणिक भेट

तभा वृत्तसेवा

कन्नड -दि.१० ऑगस्ट - महसूल दिनानिमित्त आयोजित महसूल सप्ताहाच्या सांगता समारंभात, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी कन्नड तालुक्यातील टापरगाव ग्रामस्थांना आणि विशेषत: तेथील भगिनींना रक्षाबंधनाचा अनमोल शैक्षणिक भेटवस्तूचा लाभ दिला.



दि.०८ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील रुक्मिणी हॉल येथे झालेल्या या कार्यक्रमास विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी जिल्हाधिकारी जनार्दन विधाते, पोलीस अधीक्षक राठोड, कन्नडचे उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार विद्याचरण कडवकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात जिल्हाधिकारी स्वामी यांनी टापरगावच्या सरपंच रूपाली मोहिते, बाबासाहेब मोहिते, शालेय व्यवस्थापन समितीच्या माजी अध्यक्षा उषा औटे, विद्यमान अध्यक्ष राहुल मोहिते, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा पाटील आणि सहशिक्षिका छाया माळवाळ यांना विशेष आमंत्रण दिले. गेल्या सहा वर्षांपासून महामार्गाच्या विस्तारामुळे शाळेच्या जागेचा निर्माण झालेला प्रश्न त्यांनी मार्गी लावत, शासकीय दहा गुंठे जागेवर नवीन शाळा बांधकामाचा आदेश दिला.

या निर्णयामुळे कन्नड तालुक्यातील टापरगावच्या शैक्षणिक वाटचालीस नवे बळ मिळाले. रक्षाबंधनाच्या या शुभ प्रसंगी वरील महिलांनी जिल्हाधिकाऱ्यांना राखी बांधून कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यासाठी कन्नड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मनीष दिवेकर, शिक्षण विस्तार अधिकारी लईक सोफी आणि केंद्रप्रमुख सिताराम आहेर यांनीही महत्त्वपूर्ण पाठपुरावा केला होता.

रक्षाबंधनाचा सण केवळ भावाबहिणींच्या प्रेमाचे प्रतीक नसून, समाजहितासाठी दिलेली अशी अनमोल भेट भविष्यातील पिढ्यांना शिक्षणाच्या उज्ज्वल मार्गावर नेणारी ठरणार आहे.

## बिडकीन येथिल ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये रक्षाबंधन सण उत्साहात साजरा

बिडकीन दि १० ऑगस्ट - दरवर्षी श्रावण महिन्यातील पौर्णिमेला रक्षाबंधन सण साजरा केला जातो. या दिवशी बहिण आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची समृध्दीसाठी देवाकडे प्रार्थना करतात. भाऊ देखील आपल्या बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देतो. याच निमित्ताने आज दि. ९ ऑगस्ट रोजी. पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतिलाल शैक्षणिक संस्था संचलित ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये या कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. विद्यार्थीनींनी - विद्यार्थ्यांना औक्षण करुन हातावर राखी बांधुन विद्यार्थ्यांनी आपल्या बहिणीला गिफ्ट देवुन रक्षाबंधन हा सण शाळेमध्ये साजरा केला. ज्योती राठोड, रेखा चव्हाण, नंदिनी चव्हाण, कविता मढिकर. तसेच विद्यार्थी व कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



## महाराष्ट्र वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीत देशात अग्रेसर

मुंबई - जागतिक आदिवासी लोक दिनानिमित्त, कांची कोहली आणि श्यामा कुरियाकोस यांनी लिहिलेल्या यूएनडीपी इंडिया च्या नव्या अभ्यासात, वनहक्क कायदा (फॉरेस्ट राईट्स ॲक्ट), २००६ ची अंमलबजावणी आणि मजबूत आदिवासी शासनासाठी मार्ग तयार करण्यामध्ये महाराष्ट्राच्या अग्रेसर भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला आहे. आदिवासी समुदायांचे ताबा हक्क हे शासन परंपरा, वर्तमानातील सामाजिक-वैधानिक संघर्ष आणि भविष्यासाठी सहकार्यपूर्ण उपाय शोधण्यासाठी महत्त्वाचे आहेत. वनहक्कांशी निगडित काम ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे ज्यासाठी संस्थात्मक आणि पद्धतशीर अडथळे मोडून काढणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिक ते जागतिक धोरणांमध्ये एकात्मता साधणारी कल्पनाशक्ती आवश्यक आहे, असे या अहवालाच्या सहलेखिका कांची कोहली यांनी सांगितले.

## प्रीमियम प्लेला चालना देण्यासाठी बोल्टने 'गोबोल्ट' ' ही नवी ओळख

पुणे : भारतातील सर्वात वेगाने वाढणारा वेअरेबल्स ब्रँड, बोल्ट, विस्ताराचा पुढचा टप्पा सुरू करणार असून यात 'गोबोल्ट'' हे नवीन ब्रँड नाव आणि एक नवीन लोगो, अधिक केंद्रित व्यवसाय धोरण आणि तंत्रज्ञान, डिझाइन आणि रिटेल वाढीमध्ये लक्षणीय गुंतवणूक यांचा समाविष्ट आहे. हे अभियान आर्थिक वर्ष २५ च्या मजबूत आर्थिक वर्षानंतर आले आहे, जेव्हा ब्रँडने वर्षाचा शेवट ८०० कोटींसह केला, ज्यामुळे दोन वर्षांत त्याचे उत्पन्न जवळजवळ दुप्पट झाले. गोबोल्ट आर्थिक वर्ष २६ मध्ये १,००० कोटींचे लक्ष्य आहे. आजचे डिजिटल-प्रथम ग्राहक जलद आयुष्य जगतात, भविष्याचा विचार करतात आणि परवानगीची वाट न पाहता कृती करतात. ते त्यांच्या वेगाने पुढे जाणाऱ्या ब्रँडची मागणी करतात आणि गोबोल्ट यासाठी उत्कुष्ट आहे.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता, देशभक्तीचा संगम

## 'स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग' मोहीम ८ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबविणार - आनंद भंडारी

अहिल्यानगर, दि.१० - सांस्कृतिक मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून देशभरात 'हर घर तिरंगा' ही मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम आता राष्ट्रीय अभिमान व लोकसहभागाचा उत्सव ठरली आहे. यावर्षीच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त 'हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' ही मोहीम 'स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग' या टॅगलाइनअंतर्गत पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय (नवी दिल्ली), सांस्कृतिक मंत्रालय व राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने ८ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.

'हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' या मोहिमेची संकल्पना लोकसहभागातून उत्सव व नागरी एकतेच्या भावनेवर आधारित असून स्वातंत्र्याची भावना स्वच्छता व सुजलतेशी जोडली आहे. पंतप्रधानांच्या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी ग्रामीण भागात स्वच्छ पाणीपुरवठा, शाश्वत स्वच्छता व आरोग्य सुनिश्चित करण्यासाठी थरडक (पाणी, स्वच्छता व आरोग्य) या मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोहिमेचा शुभारंभ ८ ऑगस्ट रोजी जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर करण्यात येणार असून 'स्वच्छ सुजल गाव' ही प्रतिज्ञा नागरिक व शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घेतली जाणार आहे.

९ ते ११ ऑगस्ट या कालावधीत सार्वजनिक स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असून यामध्ये सार्वजनिक ठिकाणे, जलकुंभ, पाणी व स्वच्छता सुविधांची स्वच्छता केली जाणार आहे. गावातील विद्यार्थी व युवक यांच्या स्वच्छता रॅली, वैयक्तिक घरांमध्ये रांगोळी व रंगकाम, नाल्यांची स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, पाणीगळती शोधून ती थांबविणे, सार्वजनिक शौचालये, घनकचरा व्यवस्थापन केंद्रे, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन यामध्येही सहभाग घेण्यात येणार आहे. तसेच 'आझादी का श्रमदान' उपक्रमाअंतर्गत सार्वजनिक ठिकाणे व रस्त्यांची साफसफाई केली जाणार आहे.

१२ ऑगस्ट हा पायाभूत सुविधा स्वच्छता दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये जल जीवन मिशनअंतर्गत पाणी टाक्या, नळजोडण्या, पंप हाऊस इ. स्थळांची स्वच्छता व सजावट करण्यात येणार आहे. देशभक्तीपर थीमसह पाणी व स्वच्छता स्थळांचे रंगकाम व सजावट केली जाणार आहे. पायाभूत घटकांवर तिरंगी धागे बांधण्याचे कार्यक्रम होणार आहेत.

१३ ऑगस्ट रोजी स्वच्छता संवाद व जागरूकता दिन साजरा केला जाईल. यामध्ये कचरा व्यवस्थापन तांत्रिक प्रात्यक्षिके (वर्गीकरण, कंपोस्टिंग), शौचालय देखभाल, जलसंवर्धन, भूजल पुनर्भरण, जलस्रोत संरक्षण, एकल वापराचे प्लास्टिक टाळणे यासंदर्भात जनजागृती केली जाणार आहे. ग्रामस्थांच्या सहभागातून वैयक्तिक शौचालय स्वच्छता उपक्रमही राबविण्यात येणार आहे.

१४ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाची तयारी म्हणून सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, चौक, बाजारपेठा व पाणी-स्वच्छता स्थळांची अंतिम स्वच्छता व सजावट केली जाईल. ध्वजारोहणासाठी ठिकाण निश्चित करून त्या परिसराची साफसफाई केली जाणार आहे.

१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात येईल. यावेळी स्वच्छता वीर व स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात येणार असून, जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती व नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले यांनी केले आहे.

## भगवती विद्यालय मुख्याध्यापकपदी रायभान रकटे



बिडकीन दि १० ऑगस्ट पु. अ. शिक्षण प्र. मंडळसंचलित (पैठण) अंतर्गत पैठण तालुक्यातील बिडकीन येथील भगवती विद्यालय, बिडकीन शाळेचे मुख्याध्यापक पदी रायभान रकटे यांची नियुक्ती झाल्याबद्दल सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी सत्कारकरून अभिनंद केले या प्रसंगी श्रीधर जऱ्हाड, रामनाथ धनवे ,कमलाकर काळे, सुनील पवार ,अप्पासाहेब किसवे, विश्रांती सलगरे ,सुभाष राठोड ,आशुतोष झारगड, तसेच शाळेतील विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## जय भद्राच्या गजराने, खुलताबाद नगरी दुमदुमली

खुलताबाद प्रतिनिधी - भाविकांच्या नवसाला पावणारा भद्रा मारुती निद्रा अवस्थेत असलेल्या स्थळ म्हणून प्रसिद्ध असून या ठिकाणी शुक्रवारी संध्याकाळपासूनच राज्यभरातून येण्यास सुरुवात होते श्रावणच्या तिसऱ्या शनिवारी अनेक भाविक च्या दिंड्या दाखल होतात प्रमुख्याने छत्रपती संभाजी नगर. जालना अहिल्यानगर शिर्डी .नाशिक.शहादा .चाळीसगाव.सह अनेक ठिकाणचे भाविक भक्त येतात आलेल्या भाविकांसाठी संस्थांच्या वतीने महाप्रसाद फिल्टर पाणी ची व्यवस्था केली असून अभिषेक व्ही आय पी दर्शन बंद करून येणाऱ्या सर्व भाविकांचे दर्शन लवकर व्हावे यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या सर्व नियमाचे पालन करून सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याची माहिती संस्थांचे वतीने महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल मोरेश्वर सावे खा. चंद्रकांत खैरे अध्यक्ष मिठू पाटील बारगळ जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे यांच्या सह संस्थांच्या वतीने देण्यात आली आहे

